शोधप्रकाशन ग्रंथमाला- ६८

# श्रीसिद्धान्तशिखामणी
## अभंगगाथा

रचना

**शेषनारायण देवाप्पा पसारकर**

**शैवभारती शोधप्रतिष्ठान**

डी. ३५/७७, जंगमवाडी मठ,

वाराणसी (उत्तर प्रदेश) २२१ ००१

---

प०पू० श्रीकाशीजगद्गुरू डॉ० चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या
पंचविसाव्या पीठारोहण-वर्धापनदिनाच्या निमित्ताने
हा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे.

---

श्रीसिद्धान्तशिखामणी अभंगगाथा (मराठी)
रचना : शे० दे० पसारकर

Shree Siddhant Shikhamani Abhang Gatha (Marathi)
By S. D. Pasarkar

ISBN : 978 - 93 - 82639 - 08 - 4

प्रकाशक : शैवभारती शोधप्रतिष्ठान, जंगमवाडी मठ, वाराणसी
स्थिरभाष : (0542) 2450546

अक्षरसंयोजन : शिवशक्ती कम्प्यूटर प्रोसेस
जंगमवाडी मठ, वाराणसी (उत्तर प्रदेश) २२१ ००१

© प्रकाशक

मुद्रक : मित्तल ऑफसेट,
सुंदरपूर, वाराणसी

प्रथमावृत्ती : जुलै २०१४

प्रती : २०००

मूल्य : १०० रुपये

श्रीमद् रंभापुरी वीरसिंहासनाधीश्वर

## श्री १००८ जगद्गुरू प्रसन्नरेणुक वीरसोमेश्वर शिवाचार्य महास्वामीजी

वीरसिंहासन महापीठ, बाळेहोन्नूर, जि॰ चिक्कमगळूर (कर्नाटक) यांचे

## शुभाशीर्वचन



श्रीकाशीजगद्गुरू डॉ॰ चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी 'श्रीसिद्धान्तशिखामणी' या संस्कृत ग्रंथाचे कन्नडमध्ये रूपांतर करून पारायणग्रंथ सिद्ध केला होता. त्यानंतर त्यांनी अनेक भाषांतील विद्वानांकडून या ग्रंथाचा विविध भाषांत अनुवाद करवून घेऊन ते ग्रंथ प्रकाशित केले. त्यांच्याच आग्रहपूर्वक आदेशावरून सोलापूरचे मराठीचे प्राध्यापक डॉ॰ शे॰ दे॰ पसारकर यांनी 'श्रीसिद्धान्त-शिखामणी'वर ओवीभाष्य रचून मराठी वीरशैवांना एक उत्तम पारायणग्रंथ तयार करून दिला. त्या ग्रंथाच्या अर्ध्या लाखापेक्षा अधिक प्रती महाराष्ट्रात सर्वत्र वितरित झाल्या. लोकांनी त्या ग्रंथाचे अत्यंत उत्साहाने स्वागत केले.

त्यानंतर श्रीकाशीमहास्वामीजींनी श्री॰ पसारकर यांना 'श्रीसिद्धान्तशिखामणी' हा ग्रंथ अभंगबद्ध करण्याची आज्ञा दिली. त्यानुसार पसारकरांनी काशीमध्ये सपत्निक वास्तव्य करून प्रस्तुत अभंगगाथा सिद्ध केली आहे. याबद्दल आम्हाला अत्यंत आनंद वाटत आहे. ओवी आणि अभंग या छंदांबद्दल मराठी लोकांना अत्यंत आकर्षण आहे. त्यामुळे भजन-कीर्तनात गाण्यासाठी या ग्रंथातील अभंगांचा निश्चित उपयोग होणार आहे. ओवी आणि अभंग अशा दोन्ही छंदांत हा ग्रंथ सिद्ध करणारे डॉ॰ पसारकर व त्यांच्या धर्मपत्नी व कुटुंबीय यांना जगद्गुरू पंचाचार्यांचे अनंत मंगलाशीर्वाद.

**इत्याशिष:**



श्रीमद् उज्जयिनी सद्धर्मसिंहासनाधीश्वर

## श्री १००८ जगद्गुरू सिद्धलिंगराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी

सद्धर्मसिंहासन महापीठ, उज्जयिनी, जि॰ बळ्ळारी (कर्नाटक) यांचे

## शुभाशीर्वचन



भगवान शिवाच्या मुखारविंदातून प्रकट झालेल्या २८ शिवागमांचे संपूर्ण सार म्हणजे 'श्रीसिद्धान्त-शिखामणी' हा ग्रंथ होय. मूळ संस्कृत भाषेमधील हा ग्रंथ श्रीकाशीमहास्वामीजी यांच्या आदेशावरून सोलापूरचे डॉ॰ शे॰ दे॰ पसारकर यांनी 'श्रीसिद्धान्त-शिखामणितत्त्वामृत' या नावाने याआधी ओवीबद्ध करून महाराष्ट्रातील वीरशैव भाविकांच्या भक्ति-भावनेला अधिष्ठान प्राप्त करून दिले. त्या ग्रंथाची लोकप्रियता पाहून श्रीकाशीजगद्गुरू महास्वामीजींनी डॉ॰ पसारकरांना हा ग्रंथ अभंगबद्ध करण्याचा आदेश दिला. तो शिरसावंद्य मानून पसारकरांनी काशीत वास्तव्य करून या ग्रंथावर सारांशरूपाने ४०५ अभंगांची रचना केली. त्यांचे हे कार्य पाहून आम्हाला अतिशय संतोष झाला आहे. त्यांनी आधी या ग्रंथावर ३८११ ओव्या लिहिल्या आणि आता ४०५ अभंग लिहिले. ओवी व अभंग या दोन्ही मराठी छंदांवर कवीचे प्रभुत्व आहे, हे यावरून सिद्ध होते. भाविकांना भजन करण्यासाठी आणि कीर्तनकारांना तत्त्वप्रतिपादन करण्यासाठी या अभंगांचा अतिशय उपयोग होणार आहे. या प्रासादिक ग्रंथाचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा व आपले जीवन सफल करून घ्यावे. जगद्गुरू पंचाचार्यांनी पसारकरांना उत्तम आयुरारोग्य देऊन त्यांच्याकडून वीरशैव साहित्याची यापेक्षाही अधिक सेवा करून घ्यावी. त्यांना आणि त्यांच्या परिवाराला अनंत मंगलाशीर्वाद!

**इत्याशिष:**

श्रीशैलसूर्यसिंहासनाधीश्वर

## श्री १००८ जगद्गुरू डॉ० चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी

श्रीसूर्यसिंहासन महापीठ, श्रीक्षेत्र श्रीशैल, जि० कर्नूल (आंध्रप्रदेश) यांचे

## शुभाशीर्वचन



मराठी वीरशैव साहित्याचे व्यासंगी अभ्यासक, समीक्षक, लेखक व कवी डॉ० शे० दे० पसारकर यांनी या आधी श्रीकाशीजगद्गुरू महास्वामीजींच्या आदेशावरून ‘श्रीसिद्धान्तशिखामणी’वर ओवीबद्ध भाष्य रचले आहे. त्या ग्रंथाच्या प्रचार-प्रसारासाठी आम्ही श्रीकाशीजगद्गुरूंसोबत महाराष्ट्रभर ग्रंथदिंडी अभियानात सहभागी झालो. त्या ग्रंथाला वीरशैव भाविकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला हे पाहून आम्हाला अत्यंत आनंद झाला. आता श्रीकाशी-जगद्गुरू महास्वामीजींच्या आज्ञेप्रमाणे डॉ० पसारकरांनी ‘श्रीसिद्धान्तशिखामणी’वर अभंगरचना केली आहे. भजन-कीर्तनासाठी ही रचना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. मराठी लोकांना मुळातच ओवी आणि अभंग या दोन्ही छंदांबद्दल अत्यंत प्रेम वाटते. महाराष्ट्रातील संतांनी या दोन छंदांतूनच आपला विचार लोकांपर्यंत पोहोचविला आहे. त्यामुळेच श्रीकाशीमहास्वामीजींनी पसारकरांच्याकडून आधी ओवीभाष्य करवून घेतले आणि आता अभंगगाथा करवून घेतली. या दोन रचनांमुळे मराठी वीरशैव साहित्याचे दालन समृद्ध झाले आहे. श्रद्धाळू भक्तांनी ओवीग्रंथाप्रमाणेच या अभंगगाथेचेही पारायण करून भोग व मोक्ष प्राप्त करून घ्यावेत. श्रीजगद्गुरू पंचाचार्यांनी डॉ० पसारकर व त्यांच्या परिवाराला उत्तम आरोग्य व आयुष्य देऊन त्यांच्याकडून उत्तरोत्तर वीरशैव साहित्याची सेवा करून घ्यावी हा मंगलाशीर्वाद!

**इत्याशिष:**



श्रीमत्काशीविश्वाराध्यज्ञानसिंहासनाधीश्वर

## श्री १००८ जगद्गुरू डॉ० चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी

जंगमवाडी मठ, श्रीक्षेत्र काशी (वाराणसी) यांचे

## शुभाशीर्वचन



‘श्रीसिद्धान्तशिखामणी’ हा २८ शिवागमांवर आधारित वीरशैव सिद्धान्तग्रंथ आहे. वेदागमपारंगत योगिकुलचक्रवर्ती श्रीशिवयोगी शिवाचार्यांनी रेणुक-अगस्त्य यांच्या संवादरूपाने सुमारे १४०० वर्षांपूर्वी संस्कृत भाषेमध्ये या ग्रंथाची रचना केली आहे. वीरशैव सिद्धान्त अतिशय सुगम व स्पष्टपणे प्रतिपादन करणारा हा अपूर्व व अद्वितीय असा ग्रंथ आहे. या ग्रंथातील शिवाद्वैतसिद्धान्ताचे रहस्य महाराष्ट्रातील सर्व भाविक भक्तांना सुलभ रीतीने कळावे या उद्देशाने शिवभक्त कवी शेषनारायण देवाप्पा पसारकर यांनी या ग्रंथावर ‘श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत’ या नावाने ओवीबद्ध भाष्य रचून ते श्रीकाशीपीठाला समर्पित केले. ते भाष्य पाहून आम्हाला अतिशय संतोष झाला. आम्ही आमच्या पीठाच्या शैवभारती शोधप्रतिष्ठान या संस्थेतर्फे तो ग्रंथ मुद्रित केला. त्यानंतर सोलापूरपासून ते नागपूरपर्यंत महाराष्ट्रभर गावोगावी ग्रंथदिंडी काढून तो ग्रंथ वीरशैव भाविकांपर्यंत पोहोचविला. केवळ ७-८ महिन्यांत या ओवीबद्ध ग्रंथाच्या ६०,००० पेक्षा अधिक प्रती मुद्रित होऊन वितरित झाल्या आहेत. अजूनही या ग्रंथाचे मुद्रणकार्य चालूच आहे. महाराष्ट्रात सर्वत्र वीरशैव भाविक या ग्रंथाचे नित्य पारायण करीत असतात.

भाविक भक्तांचा हा अभूतपूर्व प्रतिसाद पाहून हा ग्रंथ अभंगबद्ध झाला पाहिजे असे आम्हाला वाटले. हा विचार वीरशैव मराठी साहित्याचे व्यासंगी अभ्यासक व कवी डॉ० शे० दे० पसारकर यांच्याजवळ बोलून दाखविला आणि त्यांना या ग्रंथावर सारांशरूपाने अभंगरचना करण्यास सांगितले. अनेक कीर्तनकारांना अभंगांचा कीर्तनासाठी उपयोग होण्यासारखा आहे. आम्ही पसारकरांना सांगितल्यानंतर त्यांनी त्याचा स्वीकार

केला आणि २० फेब्रुवारी ते २४ मार्च २०१४ या काळात काशीक्षेत्री वास्तव्य करून श्रीजगद्गुरू विश्वाराध्यांच्या कृपाशीर्वादाने 'श्रीसिद्धान्तशिखामणी'च्या १०१ स्थलांवर साररूपाने अभंगरचना करून त्यांनी हा ग्रंथ पूर्ण केला. विशेष म्हणजे ग्रंथरचना होत असतानाच महाशिवरात्रीच्या पर्वकाळी काही महिला भक्तांनी त्यांतील निवडक अभंगांचे गायन करून सर्व सद्भक्तांना आनंदित केले. हे पाहून आम्हालाही अत्यंत आनंद झाला. डॉ० पसारकर हे मुळातच कविमनाचे असल्यामुळे त्यांची कवितारचना अत्यंत प्रवाही व सुंदर झाली आहे. ओवीबद्ध ग्रंथाचे सद्भक्तांनी जसे स्वागत केले आहे तसेच, भजन-गायन करणारे भक्त व कीर्तनकार या अभंगगाथेचेही स्वागत करून उपयोग करून घेतील असा आम्हाला विश्वास आहे.

'श्रीसिद्धान्तशिखामणी' हा ग्रंथ साक्षात् भगवान शिवाचाच प्रसादरूप संदेश असल्यामुळे ज्या ज्या रीतीने लोकांना उपयुक्त ठरेल त्या त्या रीतीने या ग्रंथावर नवनिर्मिती करून ते अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्याचे कार्य श्रीकाशीपीठाने अंगीकारले आहे. पूज्य श्रीकाशीमहास्वामीजींच्या पीठारोहणाच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने 'श्रीसिद्धान्तशिखामणी'वरील विविध ग्रंथांचे प्रकाशन करण्याची योजना काशीपीठाने आखली आहे. प्रस्तुत 'श्रीसिद्धान्तशिखामणी अभंगगाथा' हा ग्रंथदेखील या योजनेमध्ये प्रकाशित होणार आहे. 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत' या ओवीबद्ध ग्रंथाचे भाविक भक्तांनी जसे उत्स्फूर्तपणे स्वागत केले तसेच या अभंगाथेचेही ते स्वागत करतील असा आम्हाला विश्वास वाटतो.

डॉ० शे० दे० पसारकर हे आधीपासूनच वीरशैव साहित्यनिर्मितीत अग्रेसर होते. श्रीमन्मथचरितामृत, श्रीरमतेरामकथामृत, अभंग सिद्धायन, श्रीसिद्धरामायण, चंद्रसावली इ० काव्यरचनेबरोबरच त्यांनी कादंबरी, नाटक, स्पष्टीकरण-भाष्य, संशोधनलेखसंग्रह; श्रीलक्ष्मणगाथा, श्रीसिद्धरामेश्वरांची वचने, श्रीमन्मथशिवलिंगकृत परमरहस्य इ० ग्रंथांची संपादने असे विपुल लेखन केले आहे. महाराष्ट्रातील भाविक भक्तांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणारा 'जन्म हा अखेरचा' यासारखा बृहद् अनुवादग्रंथही त्यांनी सिद्ध केला. 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत' हा ओवीबद्ध ग्रंथ लिहून त्यांनी मराठी वीरशैव भाविकांना अपार आनंद दिला आहे. आता त्यांच्याकडून 'श्रीसिद्धान्तशिखामणी अभंगगाथा' या ग्रंथाची रचना झाली आहे. त्याचाही आस्वाद भाविक भक्त आपापल्या



परीने घेणार आहेत. यापुढेही त्यांच्याकडून अशीच उत्कृष्ट धर्मसाहित्यसेवा घडावी. श्रीजगद्गुरू विश्वाराध्य आणि काशीविश्वनाथ अन्नपूर्णा आणि सर्व पंचपीठाधीश्वरांचा कृपाशीर्वाद त्यांच्यावर निरंतर राहावा हा मंगलाशीर्वाद!

डॉ० पसारकरांच्या सुविद्य पत्नी सौ० उषा पसारकर यांनी पसारकरांनी लिहिलेल्या बहुतेक सर्व वाङ्मयाचे संगणकीय अक्षरलेखन करून आपण त्यांच्या केवळ लौकिक सहधर्मिणी नसून साहित्यिक सहधर्मिणीसुद्धा आहोत हे सिद्ध केले आहे. साहित्यक्षेत्रामध्ये पूर्णवेळ रममाण होणारे असे दांपत्य दुर्लभ असते. भविष्यकाळात सुद्धा या दांपत्याकडून भगवान शिवाने उत्कृष्ट साहित्यसेवा करवून घ्यावी.

या अभंगगाथेसाठी श्रीरंभापुरी, श्रीउज्जयिनी आणि श्रीशैल जगद्गुरूंनी आशीर्वचन देऊन लेखक दंपतीला आशीर्वाद दिल्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. ग्रंथमुद्रणासाठी सहकार्य करणारे चिदानंद ओ० हिरेमठ व डॉ० जी० सी० केदंडमठ यांना मंगलाशीर्वाद.

**इत्याशिष:**

# मनोगत

प॰पू॰ श्रीकाशीजगद्गुरू डॉ॰ चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींच्या आदेशावरून ‘श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत’ हा ओवीबद्ध ग्रंथ लिहून झाला. त्याला महाराष्ट्रातील शिवभक्तांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. प॰पू॰ श्रीशैलजगद्गुरू व प॰पू॰ श्रीकाशीजगद्गुरू या भगवद्पादांच्या दिव्य सान्निध्यात महाराष्ट्रातील गावागावांत ग्रंथदिंडी निघून ग्रंथलोकार्पण-सोहळा साजरा झाला. वर्षभराच्या आतच ग्रंथाच्या अर्ध्या लक्षापेक्षा अधिक प्रती मुद्रित होऊन भक्तांपर्यंत पोहोचल्या. हा अनुभव अत्यंत सुखद होता. आपले काम आता संपले, ह्या विचारात रमलो असतानाच प॰पू॰ महास्वामीजींनी पुन्हा आज्ञा केली- ‘‘आता ‘श्रीसिद्धान्तशिखामणी’ अभंगबद्ध करा.’’

गुर्वाज्ञा झाली की उडी घ्यायची हे ठरलेलेच होते. २० फेब्रुवारी २०१४ रोजी पत्नीसह काशीला आलो आणि गुरुकृपेच्या बळावर महिन्याभरात ही अभंगगाथा सिद्ध झाली. ‘जन्म हा अखेरचा’ आणि ‘श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत’ या ग्रंथलेखनाच्या निमित्ताने ग्रंथविषय डोक्यात पक्का रुजलेला होता. बालपणापासून ओवी, अभंग हे छंद मनात रुंजी घालत होते. जगद्गुरू विश्वाराध्य आणि प॰पू॰ श्रीकाशीजगद्गुरू यांचे आशीर्वाद पाठीशी होते. त्यामुळे अवघ्या महिन्यात संकल्पाला सिद्धीचे फळ लाभले.

अभंग हे वृत्त आहे, तशीच ‘वृत्ती’ही आहे. संतांच्या अभंगांत त्यांचा भावावेग प्रतिबिंबित झाला आहे. एका संपूर्ण ग्रंथविषयाला अभंगरूप द्यायचे असल्यामुळे येथे भावाविष्काराला अवसर नव्हता. अभंगछंदात विषय स्पष्ट करण्याचे बंधन होते. म्हणून संतकवींचे भावोत्कट अभंग आणि विषयाचा हात धरून चाललेला या ग्रंथातील अभंग यांमधील अंतर चोखंदळ वाचकाला सहज जाणवेल. या ग्रंथात अभंग ‘वृत्त’ म्हणून योजिले आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

या गाथेत चारचरणी व दोनचरणी अशा दोनही अभंगांचा उपयोग केला आहे. काही ठिकाणी निर्यमक रचनाही आढळेल. ‘श्रीसिद्धान्तशिखामणी’ हा संस्कृत ग्रंथ सुमारे चौदाशे वर्षांपूर्वी रचलेला आहे. त्यामुळे आधुनिक काळातील वाचकांच्या भुवया उंचावतील अशा काही कल्पना येथे आढळतील. उदा॰:-

**शिवाविण अन्य गृहात ज्या देव। तेथे कधी पाय ठेवू नये॥**
**अन्य देवा पुजी करितो पाखंड। त्याचे कधी तोंड पाहू नये॥**
**शिवनिंदा करी दुराचारी कोणी। जीभ मुळातूनि हासडावी॥**

अशा ठिकाणी भक्तिक्षेत्रातील एकनिष्ठाच अधोरेखित झाली आहे याची जाणीव ठेवली पाहिजे. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी सुद्धा दरदिवशी देव बदलणाऱ्या अज्ञानी भक्ताची



संभावना ‘अवघेन गांवद्वारीं। अहेव जैसी॥ (ज्ञानेश्वरी, १३.८२२)’ अशा शब्दांत केली आहे, याची जाणकारांना कल्पना आहेच.

महिनाभर काशीवास्तव्यात प॰पू॰ श्रीकाशीमहास्वामीजींचे संजीवक सान्निध्य लाभले. प॰पू॰ श्रीउज्जयिनीजगद्गुरू व प॰पू॰ श्रीशैलजगद्गुरू यांच्या दर्शनाचे भाग्यही लाभले. नाथषष्ठी उत्सवाच्या निमित्ताने पू॰ गुरुबाबा महाराज व पू॰ गहिनीनाथ महाराज औसेकर यांचाही सहवास लाभला. त्यामुळे धन्यता वाटली. श्रीमती नलिनी चिरमे वहिनी, मठाचे व्यवस्थापक श्री॰ पंचाक्षरी लिगाडे, श्री॰ भीमाशंकर जंगम, श्री॰ प्रवीण स्वामी व त्यांचे सहकारी, श्री॰ जगदीश व सौ॰ जयश्री सरूर दंपती आणि गुरुकुलातील विद्यार्थी यांच्या सहवासात दिवस आनंदात गेले. मुद्रणकार्यात शैवभारती शोधप्रतिष्ठानचे कार्यवाह डॉ॰ जी॰ सी॰ केंडदमठ व श्री॰ चिदानंद हिरेमठ कसगी यांचे सहकार्य लाभले. ग्रंथाचे संगणकीय अक्षरलेखन माझी पत्नी सौ॰ उषा हिने नेहमीप्रमाणे निर्दोष रीतीने केले. श्रीमती सुरेखा नागलमे (नांदेड) आणि सौ॰ जयश्री दिवटे (अहमदनगर) यांनी या ग्रंथातील काही अभंगांचे गायन करून आम्हाला आनंदित केले. सर्वांचे मन:पूर्वक आभार.

बालपणापासूनच ओवी-अभंग हे छंद मनात रुजलेले होते. प॰पू॰ श्रीकाशी-महास्वामीजींच्या कृपेने त्यांचा उपयोग करण्याची संधी लाभली हे माझे अहोभाग्य! शस्त्र वापरात नसेल तर ते गंजून जाते म्हणतात. कवित्वशक्तीचेही तसेच असावे. संधीविना तीदेखील कोमेजून जात असेल. माझे भाग्यच बलवत्तर! त्यामुळे प॰पू॰ श्रीकाशी-महास्वामीजींचा कृपाशीर्वाद लाभला आणि माझ्या मराठी बांधवांसाठी हा तत्त्वबोधाचा माल ओवी-अभंगांच्या गोणीत वाहून आणायचे भाग्य मला लाभले. कृतार्थता यापेक्षा वेगळी कोणती असते?

**धन्याचा हा माल आणला वाहून। तेवढाच क्षण माझा आहे॥**
**माल वाहायास निवडिले मला। गौरवच झाला जणू माझा॥**
**ग्रंथपाठकांचा अखेरचा जन्म। ठरावाच, पण माझा नको॥**
**पुन्हा गर्भवास हवा याचसाठी। घडावी कामाठी लेखनाची॥**
**शिखरी जाण्यात नाही समाधान। पायरीचा मान माझ्याकडे॥**

ही अभंगसेवा श्रीकाशीविश्वाराध्य व प॰पू॰ श्रीकाशीमहास्वामीजींच्या चरणकमली भक्तिभावपूर्वक समर्पित...!

**- शे॰ दे॰ पसारकर**

जंगमवाडी मठ, वाराणसी,
३१ मार्च २०१४, गुढी पाडवा

‘उषास्वप्न’ १२६ ब, मार्कंडेय नगर, सोलापूर (महाराष्ट्र)
स्थिरभाष : (0217) 2602301
चरभाष : 9420780570 / 8087559904

# विषयानुक्रमणिका


**पूर्वपीठिका** पृ॰क्र॰ १-१६

## अंगस्थले

**भक्तस्थल** पृ॰क्र॰

१. पिंडस्थल १७
२. पिंडज्ञानस्थल १९
३. संसारहेयस्थल २०
४. गुरुकारुण्यस्थल २२
५. लिंगधारणस्थल २५
६. भस्मधारणस्थल २८
७. रुद्राक्षधारणस्थल २९
८. पंचाक्षरीजपस्थल ३१
९. भक्तमार्गक्रियास्थल ३४
१०. उभयस्थल ३८
११. त्रिविधसंपत्तिस्थल ४०
१२. चतुर्विधसारायस्थल ४१
१३, १४, १५. सोपाधि-
निरुपाधि-सहजदानस्थले ४२

**माहेश्वरस्थल**

१६.माहेश्वरप्रशंसास्थल ४४
१७. लिंगनिष्ठास्थल ४५
१८. पूर्वाश्रयनिरसनस्थल ४६
१९. सर्वाद्वैतनिरसनस्थल ४७
२०. आह्वाननिरसनस्थल ४८
२१. अष्टमूर्तिनिरसनस्थल ४९
२२. सर्वगतनिरसनस्थल ४९
२३. शिवजगन्मयस्थल ५०
२४. भक्तदेहिकलिंगस्थल ५१

**प्रसादिस्थल**

२५. प्रसादमाहात्म्यस्थल ५३
२६. गुरुमाहात्म्यस्थल ५४
२७. लिंगमाहात्म्यस्थल ५५
२८. जंगममाहात्म्यस्थल ५६
२९. भक्तमाहात्म्यस्थल ५७
३०. शरणमाहात्म्यस्थल ५९
३१. शिवप्रसादमाहात्म्यस्थल ६०

**प्राणलिंगिस्थल**

३२. प्राणलिंगिस्थल ६२
३३. प्राणलिंगार्चनस्थल ६३
३४. शिवयोगसमाधिस्थल ६४
३५. लिंगनिजस्थल ६६
३६. अंगलिंगस्थल ६७

**शरणस्थल**

३७. शरणस्थल ६९
३८. तामसनिरसनस्थल ७०
३९. निर्देशस्थल ७२
४०. शीलसंपादनस्थल ७३

**ऐक्यस्थल**

४१. ऐक्यस्थल ७४
४२. आचारसंपत्तिस्थल ७६
४३. एकभाजनस्थल ७७
४४. सहभोजनस्थल ७९

## लिंगस्थले

**भक्तस्थल**

४५. दीक्षागुरुस्थल ८२
४६. शिक्षागुरुस्थल ८३
४७. ज्ञानगुरुस्थल ८४
४८. क्रियालिंगस्थल ८५
४९. भावलिंगस्थल ८६
५०. ज्ञानलिंगस्थल ८७





५१. स्वयस्थल ८८
५२. चरस्थल ८९
५३. परस्थल ९०

**माहेश्वरस्थल**

५४. क्रियागमस्थल ९२
५५. भावागमस्थल ९३
५६. ज्ञानागमस्थल ९५
५७. सकायस्थल ९६
५८. अकायस्थल ९८
५९. परकायस्थल ९८
६०. धर्माचारस्थल १००
६१. भावाचारस्थल १०१
६२. ज्ञानाचारस्थल १०३

**प्रसादिस्थल**

६३. कायानुग्रहस्थल १०५
६४. इंद्रियानुग्रहस्थल १०६
६५. प्राणानुग्रहस्थल १०७
६६. कायार्पितस्थल १०८
६७. करणार्पितस्थल १०९
६८. भावार्पितस्थल ११०
६९. शिष्यस्थल १११
७०. शुश्रूषुस्थल ११२
७१. सेव्यस्थल ११३

**प्राणलिंगिस्थल**

७२. आत्मस्थल ११४
७३. अन्तरात्मस्थल ११७
७४. परमात्मस्थल ११८
७५. निर्देहागमस्थल ११९
७६. निर्भावागमस्थल १२०
७७. नष्टागमस्थल १२०
७८. आदिप्रसादिस्थल १२१
७९. अन्त्यप्रसादिस्थल १२२
८०. सेव्यप्रसादिस्थल १२३

**शरणस्थल**

८१. दीक्षापादोदकस्थल १२५
८२. शिक्षापादोदकस्थल १२५
८३. ज्ञानपादोदकस्थल १२६
८४. क्रियानिष्पत्तिस्थल १२७
८५. भावनिष्पत्तिस्थल १२९
८६. ज्ञाननिष्पत्तिस्थल १३०
८७. पिंडाकाशस्थल १३१
८८. बिंद्वाकाशस्थल १३२
८९. महाकाशस्थल १३३
९०. क्रियाप्रकाशस्थल १३४
९१. भावप्रकाशस्थल १३५
९२. ज्ञानप्रकाशस्थल १३६

**ऐक्यस्थल**

९३. स्वीकृतप्रसादैक्यस्थल १३८
९४. शिष्टोदनस्थल १४०
९५. चराचरलयस्थल १४१
९६. भांडस्थल १४३
९७. भाजनस्थल १४४
९८. अंगालेपस्थल १४५
९९. स्वपराज्ञस्थल १४६
१००. भावाभावलयस्थल १४७
१०१. ज्ञानशून्यस्थल १४८

**उपसंहार** १५१

**परिशिष्ट** १५९

श्रीमत्काशीविश्वाराध्यज्ञानसिंहासनाधीश्वर

**श्री १००८ जगद्गुरू**

**डॉ० चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी**

जंगमवाडी मठ, श्रीक्षेत्र काशी (वाराणसी) यांच्या

**पीठारोहण रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त**

**श्रीजगद्गुरू विश्वाराध्यांच्या श्रीचरणकमली**

**हा ग्रंथ समर्पित**

## ग्रंथदानी

**श्री० गंगाधर म्हातारदेव हिंगमिरे,** पुणे
**सौ० सुमन गंगाधर हिंगमिरे**

व

**श्री० भरत रामचंद्र उंबरकर,** पुणे
**सौ० मंगल भरत उंबरकर**

व

**श्री० भीमाशंकर राजाराम जंगम,** अंबरनाथ, मुंबई
**सौ० उषा भीमाशंकर जंगम**

व

**लिंगैक्य ताराबाई गणपतअप्पा साखरे**
यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ
**सौ० नंदिनी जगन्नाथ टाले,** तळेगाव दाभाडे
**श्री० राजेंद्र गणपतअप्पा साखरे,** नासिक

# श्रीसिद्धान्तशिखामणी

## अभंगगाथा

# श्रीसिद्धान्तशिखामणी अभंगगाथा

## पूर्वपीठिका

### मंगलाचरण

।। श्रीगणेशाय नम: ।। श्रीसरस्वत्यै नम: ।। श्रीजगद्गुरु पंचाचार्येभ्यो नम: ।।
।। श्रीउमामहेश्वराभ्यां नम: ।। श्रीमन्मथस्वामिने नम: ।।

१

ॐकारस्वरूप सर्व विद्यानिधी। नमितो मी आधी गणेशाला।।
अभंगलेखन देवा पूर्ण व्हावे। कृपेने करावे कार्य सिद्ध।।
तुझा कृपाहस्त असता मस्तकी। बोलेल मुका की शब्दब्रह्म।।
कार्यारंभी तुला विनविती संत। आणि कलावंत कलाप्रेमी।।
वाटचाल आता येथे आरंभिली। चालू दे चावळी शेषाची ह्या।।

२

विश्वसंमोहिनी शारदे चित्कळे। वंदितो स्नेहाळे मनोभावे।।
तुझ्या कृपास्पर्शे साहित्याची वेल। गाठते आभाळ सहजचि।।
तुझ्या कटाक्षाने अक्षरचांदणे। विश्वा देते देणे प्रकाशाचे।।
नाही रसवृत्ती, लेखणीत बळ। तरी पाझरेल विश्वास हा।।
शेषहृदयीचे बीज अंकुरावे। आत्मानंदी न्हावे भक्तलोक।।

३

भक्तजनसख्या शिवपरब्रह्मा। स्फूर्तीची पौर्णिमा होई आज।।
तुझ्या प्रेरणेने हलते ब्रह्मांड। भ्रमते अखंड जीवसृष्टी।।
लेखणीत माझ्या भरून सामर्थ्य। तुझे तूच तत्त्व प्रकाशवी।।



दृश्यादृश्य अंतर्बाह्य जगतात। तूच ओतप्रोत भरलेला।।
शेषाच्या वाणीत भरूनिया रंग। करवी अभंगगाथा सिद्ध।।

४

मूल पंचाचार्य आणि विद्यमान। सर्वांना वंदन मनोभावे।।
जगद्गुरू चंद्रशेखरा साष्टांग। सर्वदा अभंग नमस्कार।।
त्यांच्या प्रेरणेने अभंगलेखन। आरंभिले, पूर्ण होईल हे।।
पलसिद्ध स्वामी सद्गुरू समर्थ। त्यांच्या पदी नत सदा आहे।।
शेष म्हणे गुरू सिद्धलिंग स्वामी। त्यांना नमिले मी आदराने।।

५

बसवादी शिवशरणा नमन। निर्मिले वचनकाव्य ज्यांनी।।
ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम। संतांना प्रणाम सर्व माझा।।
मन्मथादी सर्व शिवसंतकवी। त्यांच्या पायी डोई ठेविली मी।।
सर्व संत-भक्तकवींना वंदिले। त्यांचेच तान्हुले बालक मी।।
शेष म्हणे सर्व श्रोत्यांना वंदन। द्यावे अवधान श्रवणास।।

### शिवस्तुती

६

त्रैलोक्यवैभव रेखावे चित्रात। त्यास आधारभिंत शिव एक।।
सच्चिदानंद तो परशिवब्रह्म। त्याचे पदयुग्म नमितो मी।।
वेदान्ती म्हणती परब्रह्म त्याला। सर्व जगताला तोच मूळ।।
छत्तीस तत्त्वे ही बुडबुडे नि लाटा। ज्यावरी तो मोठा शिवसिंधू।।
त्याच्या प्रकाशाने विश्व प्रकाशते। जग आनंदते त्याच्यामुळे।।
छत्तीस तत्त्वांचा करी जो विकास। निर्मल शंभूस नमस्कार।।
निर्गुण तो असे आणि निराकार। घेई अवतार भक्तांसाठी।।

इच्छा-ज्ञान-क्रियायुक्त शूलधारी। त्याला नमस्कारी वारंवार।।
शेष म्हणे शिव ब्रह्मांडी व्यापिला। तोच नटलेला विश्वरूपे।।

## शक्तिस्तुती

७

त्रैलोक्याचे असे निर्मितिकारण। शिवाशी अभिन्न परशिवा।।
सहधर्मिणीस शंभूच्या नमितो। नामरूपांत तो तिच्यामुळे।।
षट्कलांची माता कल्याणी मंगला। समर्थ शक्तीला नमस्कार।।
शिवासवे राहे प्रकाशे विश्वाला। शक्तीच्या रूपाला वंदितो मी।।
अमृतत्वासाठी आले जे शरण। करिते प्रदान ज्ञान त्यांना।।
शिवाचे रंजन करिते सर्वदा। नम्र तिच्या पदांवरी शेष।।

## ग्रंथकार-वंशवर्णन

८

श्रीसिद्धान्तशिखामणी ग्रंथ थोर। त्याचे ग्रंथकार शिवयोगी।।
'शिवयोगी शिवाचार्य' या नामाने। त्यांना आदराने संबोधिती।।
त्यांच्या वंशी पूर्वी झाले एक सिद्ध। लोकांत प्रसिद्ध 'शिवयोगी'।।
मूर्तिमंत शिवज्ञानाचे सागर। अंगी सदाचार बाणलेला।।
वाणी रसवंती ऐकताच चित्ती। जागे शिवभक्ती मनामध्ये।।
चंद्रदर्शनाने सागर उधाणे। पडता चांदणे फुले पद्म।।
शेष म्हणे तशी श्रोतयांची मने। त्यांच्या वक्तृत्वाने प्रफुल्लित।।

९

वंशी त्या जन्मले शिवयोगियांत। श्रेष्ठ ज्ञानवंत 'मुद्ददेव'।।
वंशगर्भी जन्मलेल्या मोत्यासम। कांती अनुपम तेज:पुंज।।
शरण आलेल्या भक्तांची सु-मने। ज्ञानोपदेशाने संतोषती।।



तेणे 'मुद्ददेव' नामे अन्वर्थक। ओळखिती लोक सर्व त्यांना।।
त्यांना 'सिद्धनाथ' नामे एक पुत्र। अत्यंत पवित्र एक होता।।
रागद्वेषमुक्त, शिवरूपज्ञाता। सिद्धान्तनिर्णेता प्रबोधक।।
शेष म्हणे वीरशैवशिखामणी। असे त्यांना मुनी प्रशंसिती।।

१०

आचार्यकुळात झाल्याने जनन। शिवभक्ती पूर्ण बाणलेली।।
सिद्धनाथा झाला बुद्धिवंत सुत। 'शिवयोगी' ख्यात नामे जगी।।
चंद्राला पाहता सागर आनंदे। तसा पित्याला दे आनंद तो।।
शिवज्ञानामुळे त्यांचा कीर्तिगंध। दरवळे मंद चहुकडे।।
शिवसिद्धान्ताला बाधक जी मते। खंडन पुरते त्यांचे केले।।
कामिकापासून वातुलापर्यंत। शिवागमग्रंथ अभ्यासिले।।
वेदमार्गास न करिता विरोध। शिवाचारसिद्ध करायास।।
एकोत्तरशत स्थलांनी जे युक्त। शुद्ध शिवाद्वैत प्रवर्तिले।।
श्रीसिद्धान्तशिखामणी या ग्रंथात। तेचि अभिव्यक्त शेष म्हणे।।

## सृष्टिनिर्मिती

११

परशिवतत्त्व स्वयंप्रकाशित। सर्वव्यापी शांत सर्वज्ञ ते।।
सृष्टिनिर्मितीच्या आधी एकमेव। होते शिवतत्त्व विद्यमान।।
सद्-चिदानंदरूपी विमर्श ती। शक्ती लीन होती शिवातच।।
आपण अद्‌भुत व्हावे विश्वरूप। उद्‌भवे संकल्प शिवतत्त्वी।।
तत्काळ विमर्शशक्ती उपादान-। कारण होऊन विश्व निर्मी।।
षड्‌गुणैश्वर्यसंपन्न शिवाने। निर्माया भुवने प्राणी सर्व।।
प्रथम निर्मिला सुत ब्रह्मदेव। त्याला विद्या सर्व बोधियेल्या।।

शेष म्हणे शिवाज्ञेने ब्रह्मदेव। आरंभी तो विश्व निर्मायास।।

१२

प्रयास करूनि विधाता थकला। अक्षम ठरला निर्मितीस।।
विश्वनिर्मितीचा सुचेना उपाय। मग शिवपाय दृढ धरी।।
म्हणे 'उमापती अज्ञ मी संपूर्ण। विश्वाचे निर्माण झाले नाही।।
तुम्हीच करावी विश्वाची निर्मिती। त्यानुसार मग ती निर्मिन मी'।।
शेष म्हणे अशी करूनि प्रार्थना। बसे दीनवाणा ब्रह्मदेव।।

१३

मग शंकराने आपल्यासमान। असंख्य निर्माण गण केले।।
सर्वशक्तियुक्त ज्ञानानंदपूर्ण। विश्वाचे निर्माण-संहारक्षम।।
रेणुक, दारुक तसे घंटाकर्ण। आणि धेनुकर्ण, विश्वकर्ण।।
पंच शिवगण त्यामध्ये प्रमुख। हेच होती देख पंचाचार्य।।
वीर, नंदी, भृंगी, वृषभ नि स्कंद। पंच हे प्रसिद्ध शिवगण।।
गोत्रपुरुष हे यांच्याचपासून। जहाले उत्पन्न वीरशैव।।
त्यामध्ये रेणुक दारुक हे दोन। शंकराला पूर्ण प्रिय होते।।
शेष म्हणे त्यांना द्वारपाल केले। रक्षिती सगळे अंत:पुर।।

## कैलासवर्णन

१४

रुपेरी शिलांनी सजला कैलास। दिसे ते लोभस रूप त्याचे।।
गंधर्व स्त्रियांना जणू क्रीडायाला। मोतियांचा केला दर्पणचि।।
पुष्प-फलभारे तरू लहडले। भ्रमर गुंगले पुष्परसे।।
पक्ष्यांच्या कूजने भरे आसमंत। दिशा सुगंधित वायूमुळे।।
किन्नर स्त्रियांच्या गायने मधुर। घुमते कंदर पर्वताचे।।



नि:शब्द निगूढ गुहांच्या मधून। शिवयोगी लीन शिवध्यानी।।
कमळकळयांचा स्रवे गंधरस। गंधित मानससरोवर।।
कैलासशिखरे निळे अंतराळ। भेदिती तेजाळ स्तंभ जणू।।
माणिक-दीपांनी गेले उजळून। अंत:पुर पूर्ण कैलासाचे।।
शेष म्हणे तोरणस्तंभ महाद्वारी। शोभले त्यावरी शंख, पद्म।।

१५

विशाल वस्त्राने मंटपाचे छत। झाले अलंकृत मोतियांनी।।
शोभती मंटपभिंती वैडूर्यांनी। प्रवाळरत्नांनी शोभे छत।।
प्रमथ-नुपूरध्वनी मंटपात। घुमे अनाहत नाद जसा।।
देवमुकुटांत मंदाराची फुले। त्यांचा दरवळे मंद गंध।।
शिवशंकराचे रत्नसिंहासन। गेले दर्वळून परिमळे।।
शोभे शिव मध्ये देवांनी वेष्टित। कमलवनात हंस जसा।।
शेष म्हणे चक्रवर्ती राजासम। शिवपरब्रह्म विराजले।।

## शिववर्णन

१६

पुष्परसास्वादी भ्रमर तल्लीन। तसे शिव मग्न आत्मानंदी।।
सहस्र चंद्रांची प्रकटावी द्युती। तशी देहकांती तेज:पुंज।।
देवमुकुटांची फाके रत्नप्रभा। तेणे खुले आभा वसनाची।।
भाळी चंद्रकला कर्णी पुष्पकळी। कंठात शोभली मुंडमाळ।।
कमळासारखे त्रिनेत्र प्रफुल्ल। अधरी कोमल मंदस्मित।।
रुळती कुंडले शोभती कपोल। कंठ दिसे नीलपद्मासम।।
कल्पतरुसम भुजा शोभिवंत। कंकणे करात रत्नमय।।
गौरीवक्षस्पर्शे वक्ष:स्थल धन्य। तलम रेशीम वस्त्र अंगी।।

मोतीमाळ रुळे स्पर्शे नाभिस्थान। जणू आलिंगन देई गंगा।।
चौरंगावरी ते ठेविलेले पद। त्यात तेज, नाद नूपुरांचा।।
शेष म्हणे दुजे पद अंकावर। बैसले शंकर दुमडूनी।।

## भवानीवर्णन

१७

विश्वाचे कारण सौंदर्याची खाण। उमा विद्यमान वामभागी।।
इच्छा-ज्ञान-क्रिया शक्तींनी संपन्न। पार्वती अभिन्न शंकराशी।।
वेणीत माळली मोगऱ्याची फुले। त्यांच्यासवे डोले भृंगथवा।।
पूर्णचंद्रासम मुख कांतियुक्त। नासिकेत नथ, हास्य ओठी।।
कर्णी नीलरत्न कुंडले डुल्लती। तेणे निळी दीप्ती नेत्रांवरी।।
कर्णकुंडलाच्या रंगमंचावर। नर्तन सुंदर कटाक्षांचे।।
शेष म्हणे पाहता नेत्री नीलप्रभा। नीलपद्मशोभा लाजे तेथे।।

१८

मदनधनुष्यासम भ्रूविलास। अधर लोभस जास्वंदीचे।।
जिंके मन्मथाच्या शंखमाधुर्याला। तसा गोड गळा नादपूर्ण।।
लाजूनच जावी नीलपद्ममाळ। मृदू नि कोमल कर दोन्ही।।
वेढिले कुसुंबी वस्त्राने देहास। चरण तांबूस पर्णे जणू।।
कंठी रत्नहार पायात नुपूर। अशी ती सुंदर शेष म्हणे।।

१९

विश्वातील सर्व जन। जिचे सुहृद स्वजन।।
उमेसह त्या शंकर। होते आसनी सुस्थिर।।
उभे सभोवती सुर। शिवसेवेत तत्पर।।



लक्ष्मी आणि सरस्वती। देवकन्याही अर्चिती।।
असंख्य ते शिवगण। शिवसेवेत निमग्न।।
देव दानव नि ऋषी। उभे शंकराच्या पाशी।।
शेष म्हणे सर्वजण। झाले सेवेमध्ये मग्न।।

२०

शिव स्वेच्छावर्तनात। झाले मग्न कैलासात।।
कधी देवांशी बोलती। कधी व्यासा वाखाणिती।।
कधी लक्ष नृत्याकडे। कधी उमामुखाकडे।।
दूर काहींना धाडिती। काही लोकांस शासिती।।
कधी भृंगीचे विनोद-। नृत्य पाहूनि ते स्तब्ध।।
कधी नंदीच्या कडून। लोका घेती बोलावून।।
अशा स्वेच्छावर्तनात। शेष म्हणे शिव व्यस्त।।

## शिवसभा

२१

अशी शिवसभा भरलेली दाट। तिचा काय थाट वर्णावा तो।।
गंधर्व किन्नर गाती शिवगीते। आरंभिली नृत्ये अप्सरांनी।।
देवकंठी सुगंधित फुलमाळा। तेणे गंधाळला कैलासचि।।
नृत्य नि गायने डोलतो कैलास। मानसी संतोष दाटलेला।।
उमा शिव विराजिले सिंहासनी। क्षणी कर त्यांनी केला वर।।
क्षणात सभा ती जहाली तटस्थ। संभ्रमित चित्त झाले सर्व।।
शेष म्हणे न्याहाळिती टकमक। शिवाचे कौतुक काय आहे?।।

२२

शिवगण तेथे बैसले असंख्य। त्यामध्ये रेणुक गणश्रेष्ठ।।
त्याला द्यावयास तांबूल-प्रसाद। शिवाने सन्निध पाचारिले।।
रेणुकाचे मन आनंदे भरले। त्वरेने निघाले शिवाकडे।।
हर्षभरे त्यांना राहिले न भान। पुढे दारुकगण बसलेले।।
दारुकास ओलांडून पुढे गेले। शिवा न रुचले वर्तन हे।।
शेष म्हणे तेथे भक्तमहिमान। दावाया कारण मिळे शिवा।।

## शिवभक्तमहिमाकथन

२३

शंकर म्हणती 'अरे तू रेणुका। कशाला दारुका ओलांडिले?।।
माझ्या भक्तास जो जाई ओलांडून। किंवा अपमान करी त्याचा।।
त्याचे आयुष्य नि वित्त, कुल, कीर्ती। जाई नाशून ती पूर्णपणे।।
मार्कंडेया अवमानिता यमाने। मीच पदाघाताने शिक्षापिले।।
विष्णूने छळिले भृगु, शंकुकर्ण। तेणे त्याचे जन्म दहा झाले।।
दधीचीशी विष्णू करिताच रण। तेणे सुदर्शन मोडे तेथे।।
दक्षे यज्ञी अवमानिले भक्ताला। शिरोहीन झाला त्यामुळे तो।
भक्त श्वेता यमे दुर्लक्षिता फक्त। केले भस्मसात यमास मी।।
ओलांडूच नये कोणी माझ्या भक्ता। आणिक अनास्था दावू नये।।
शेष म्हणे शिवे कानउघाडणी। केली त्याच क्षणी रेणुकाची।।

२४

शिव म्हणती, 'हे रेणुका तू ऐक। आताच दारुक ओलांडिला।।
तुला भूलोकात जन्म तो घेऊन। याचे फळ पूर्ण भोगणेच'।।



ऐकता रेणुक स्तब्धचि जहाले। दंडवत् पडले शिवापुढे।।
म्हणती ते 'देवा मनुष्याची योनी। केवळ ती खाणी दुःखाचीच।।
जात, कूळ, वर्ण यांची विषमता। यांची मोठी चिंता देवा तेथे।।
त्रिविध ते ताप लागती साहावे। वर्णाश्रमदावे कंठी पडे।।
सोडून तुमची पदयुग्मसेवा। कसा राहू देवा मृत्युलोकी?।।
मनुष्ययोनीत जन्म नको मज। अनुग्रह आज करा असा'।।
शेष म्हणे अशी करिता प्रार्थना। संतोषला राणा कैलासीचा।।

२५

शिव म्हणती, 'रेणुका। नको मनी भयशंका।।
माझ्या भक्तांना ती भीती। कशी असेल जगती?।।
श्रीशैलाच्या उत्तरेस। असे तेलंग प्रदेश।।
तेथे कोल्लिपाक गाव। नित्य वसतो मी शिव।।
सोमेश्वर लिंगातून। तुझे व्हावे प्रकटन'।।
शेष म्हणे त्यांचे शब्द। ऐके रेणुक निःशब्द।।

२६

'साधावया लोकहित। स्थापावे तू शिवाद्वैत।।
वेदश्रुतींना संमत। आणि असे आगमोक्त।।
माझा प्रताप अतुल। लोकी रूढवी सकल।।
वेदमार्गा अनुसरे। असे लोक व्हावे सारे।।
हेचि कार्य तू करावे। आणि कृतकार्य व्हावे'।।
असे रेणुका बोलले। शिव अंतःपुरी गेले।।
शेष म्हणे शिवशब्द। मानी रेणुक तो वंद्य।।

## रेणुकावतरण

२७

तेलंग देशात कोल्लिपाक पुर। तेथे सोमेश्वर लिंग असे।।
प्रात:काळी तेथे भक्तमांदियाळी। गाई नामावली शंकराची।।
प्रकाशते नभी वीज तेज:पुंज। तसे फाके तेज लिंगातून।।
डळमळले भू-मंडळ अवघे। धराकंप वेगे झाला भासे।।
थरथरे क्षणी मंदिर देखणे। फाकली किरणे लिंगातूनी।।
क्षणातचि सोमेश्वर लिंगातून। झाले अवतीर्ण रेणुक ते।।
असा चमत्कार पाहूनिया भक्त। अंतरी विस्मित सर्व झाले।।
शेष म्हणे असे रेणुकावतरण। शिवाज्ञेने पूर्ण झाले तेथे।।

२८

भस्मविभूषित सुदृढ शरीर। जणू कर्पूरगौर दुजा आहे।।
रुद्राक्षभूषणे भूषविती अंग। शोभे इष्टलिंग माथ्यावरी।।
शिरी जटाभार त्रिपुंड्र ते भाळी। कंथा कसलेली कमरेस।।
करी शोभे कमंडलू योगदंड। अंतरी अखंड शिवध्यान।।
शिवागमामृतसागरा भरते। आणणारे ते पूर्णचंद्र।।
अष्टांगयोगात पूर्ण पारंगत। सकल कार्यात स्वतंत्र ते।।
शेष म्हणे सिद्धवंशसमूहात। सर्वश्रेष्ठ ख्यात जगद्‌गुरू।।

२९

रेणुका पाहता लोकांनी वंदिले। आणि विचारिले 'कोण तुम्ही?'।।
रेणुक सांगती 'कार्य ते विशेष। आलो करायास लिंगातून।।
सिद्धसमूहात रेणुकसिद्ध मी। वावरतो भूमीवरी स्वेच्छे।।
नास्तिक मतांचे करूनि खंडन। धर्म सनातन रक्षायासी।।



झालो अवतीर्ण येथे लिंगातून। यापुढे स्थापीन शिवाचार'।।
बोलताना झाले तत्क्षणीच गुप्त। पाहाती विस्मित भक्तलोक।।
शेष म्हणे गेले मलयपर्वती। तेथीची कथा ती ऐका पुढे।।

## मलयगिरी वर्णन

३०

गेला दर्वळून चंदनगंधाने। नागस्त्री-गायने मलयगिरी।।
वेलदोडे वाळा यांचा राहे वास। गिरिकंदरांस व्यापूनिया।।
जाई-जुई-बटमोगऱ्यांची फुले। त्यांचा दरवळे रानगंध।।
पुष्पफलयुक्त तरूंनी वेढिला। आश्रम वसला अगस्त्यांचा।।
ऋषिकन्या जल घालिती तरूंस। प्राशे ते पाडस हरणाचे।।
सरोवरजला मकरंदगंध। आसमंत धुंद पक्षीस्वरे।।
नीलकमलांची नीलप्रभा दाटे। तेणे दिशा वाटे कुंद झाल्या।।
लोपामुद्रा-पदचिन्हांनी किनारे। कृतकृत्य झाले तडागांचे।।
मोतीमाळ किंवा धवल कर्पूर। तसे शुभ्र नीर सरोवरी।।
शेष म्हणे त्यात नित्यनियमाने। करिती सुस्नाने तपस्वी ते।।

३१

प्राणी विसरले वैरभावना ती। तेणे भासे प्रतिब्रह्मलोक।।
यज्ञधूर-तूपगंधाने व्यापून। गेला दरवळून आसमंत।।
असा दिव्याश्रम रेणुके पाहिला। आनंद दाटला मनामध्ये।।
चंदनछायेत अगस्त्य बैसले। भस्म चर्चिलेले सर्वांगास।।
रुद्राक्षाची माळ कंठामध्ये रुळे। भोवती बैसले ऋषी सर्व।।
प्रमथगणांनी वेढावा शंकर। तसे मनोहर शोभले ते।।
अहंकारशून्य, संसार कस्पट। मानिती, ते निष्ठ शिवाठायी।।

ज्ञानकल्पवृक्ष जणू ते अगस्ती। सूर्यासम नाशिती मोहतम।।
शेष म्हणे त्यांनी रेणुका पाहिले। अंतरी जाणिले गणेश्वरा।।

## अगस्त्य-रेणुक संवाद

३२

रेणुकाचार्यांचे स्वागत करून। दिले उच्चासन आश्रमात।।
पादप्रक्षालन शास्त्रोक्त पूजन। करूनि वंदन भावे केले।।
रेणुकांनी क्षेमकुशल पुसिले। आणि वाखाणिले अगस्त्यासी।।
विंध्यपर्वता तू प्रतिबंध केला। नहुषाला दिला सर्पजन्म।।
समुद्र एकाच घोटात प्राशिला। वातापि जाळिला जठरात।।
केली अशी लोकविलक्षण लीला। साध्य न कोणाला तुझ्याविण।।
कार्तिकाने तुज शिवधर्मोत्तर। शास्त्र पूर्वी थोर उपदेशिले।।
करी दूर घोर संसाराची भीती। ती तू शिवभक्ती प्रकाशिली।।
शेष म्हणे असे ऐकून अगस्ती। विनीत बोलती रेणुकांना।।

३३

'आचार्या आपण आश्रमी येऊन। दर्शन देऊन धन्य केले।।
सभाग्य मी, ऋषिप्रशंसेस पात्र। ठरलो पवित्र जहालो मी।।
दर्शनाचे पुण्य मजला लाभले। माझे स्थिरावले शिवज्ञान।।
संसारतापाने मूर्च्छित जे जन। त्यांना संजीवन तव कृपा।।
पादोदकथेंब प्राशिता सत्वर। त्वरे दाह दूर संसाराचा।।
माझ्यावरी करण्यास अनुग्रह। केला दिव्य देह धारण हा'।।
शेष म्हणे अशी करूनिया स्तुती। अगस्त्य बोलती पुढे तेव्हा।।

३४

'ज्यास झाला नाही नास्तिकाचा स्पर्श। वैदिके विशेष स्वीकारिले।।



सर्वार्थसाधक योगिश्रेष्ठा प्रिय। मनोरथ सर्व पुरती जेणे।।
बोधी शिवजीवैक्याचे महाज्ञान। असा जो महान सिद्धान्त तो।।
त्याच वीरशैवसिद्धान्ताचा बोध। मज निःसंदिग्धपणे करा।।
अनेक आगम अभ्यासूनि झाले। मनी शंकाजाळे निर्माण हे।।
वेदांना संमत, साधे लोकहित। तो शिवसिद्धान्त निरूपावा।।
तेणे सर्व शंका होतील निवृत्त। माझे शुद्ध चित्त होईल देवा'।।
शेष म्हणे अशी प्रार्थना ऐकून। संतोषले पूर्ण गणेश्वर।।

३५

रेणुकांनी परब्रह्मरूप शिव। त्यांचे अंबेसह ध्यान केले।।
मग शांत, स्निग्ध वदती स्वरात। 'अगस्त्या सिद्धान्त निरूपीन।।
सकल निगमागमी तू प्रवीण। प्रभुत्व संपूर्ण शास्त्रांवरी।।
शिवाद्वैतज्ञान करी प्रकाशित। ऐक स्थिर चित्त ठेवूनिया।।
सांख्य-योग-पांचरात्रादी सिद्धान्त। वेदप्रमाणित सर्वही ते।।
त्यांचे कोणी करू नयेच खंडन। मानिती प्रमाण वेदांप्रती।।
परि ती वेदांच्या अंशास प्रमाण। मानिती, संपूर्ण वेदा नव्हे।।
शैवतंत्र मात्र सर्व वेदमय। शास्त्रांत ते सर्व अग्रगण्य'।।
शेष म्हणे अति होऊनि तन्मय। बोलती आचार्य मुनिश्रेष्ठा।।

३६

रेणुक वदती 'आगम अनेक। त्यांचे भेद देख सांगतो मी।।
शैव, पाशुपत, सोम नि लाकुल। असे हे त्यातील चार भेद।।
वाम नि दक्षिण, मिश्र नि सिद्धान्त। शैव आगमांत भेद चार।।
'सिद्धान्त'नामक शिवागम त्यांत। पूर्ण वेदसंमत म्हणविला।।
वेदांइतुकेच सिद्धान्त-आगम। मानिती प्रमाण विद्वज्जन।।
सिद्धान्तागमांच्या उत्तरभागात। असे शैवमत प्रतिष्ठिले'।।

शेष म्हणे रेणुकांचे मधुबोल। ऐकती कोमल मने ऋषी।।

३७

रेणुक सांगती, 'वीरशैव कोण। घेई समजून अगस्त्या तू।।
शिवरूपी विद्येमध्ये जे रमती। विशेषत्वे घेती स्वारस्य जे।।
त्याच भाग्यवंत लोकास जाणावे। 'वीरशैव' नावे जगामध्ये।।
'वी' शब्दार्थे विद्या 'र' शब्दार्थे रत। विद्येत जे रत ते वीरशैव।।
शिवजीवैक्याचे देतसे जी ज्ञान। तिला अभिधान 'विद्या' असे।।
शिवजीव-ऐक्य विद्येत रमती। मायेला मानिती श्वानासम।।
मायेचा करिती त्यागच सत्वर। 'वीरमाहेश्वर' नाव त्यांना'।।
शेष म्हणे असे बोधिती मार्मिक। ऐकती सात्त्विक भावे मुनी।।

३८

'उपनिषदांचा करिता अभ्यास। प्राप्त होते तिस 'विद्या' नाव।।
शिवजीवैक्याचे करिते बोधन। त्यात रममाण तेच 'वीर'।।
वीरशैव आंतरक्रियेत तत्पर। वीरमाहेश्वर बाह्यामध्ये।।
क्रियेमाजी जरी थोडा दिसे भेद। असे तो अभेद लिंगार्चनी।।
जसा शिव वसे सगुण निर्गुण। रूपी तरी भिन्नपण नाही।।
क्रिया बाह्य असो अथवा आंतर। एकच शंकर आराध्य तो।।
वीरशैव रत सदा ज्ञानयज्ञी। रत कर्मयज्ञी माहेश्वर'।।
शेष म्हणे कर्म आणिक ते ज्ञान। समन्वय पूर्ण सिद्धान्तात।।

३९

रेणुक म्हणती 'होई सावधान। आता निरूपीन षट्स्थल।।
स्थल, आचरण आणि लिंगार्चन। यांनी होती जाण सहा भेद।।
सिद्धान्तात 'षट्स्थल' या नावाने। केले पूर्णपणे विवेचन।।



भक्त, माहेश्वर, प्रसादी ते स्थल। प्राणलिंगिस्थल, शरण, ऐक्य।।
अशी सहा स्थले हेचि षट्स्थल। सहा ही निर्मल सोपानेच।।
भक्तस्थलामध्ये प्रवेशूनि जीव। जाई स्थले सर्व लंघूनिया।।
ऐक्यस्थली घडे जीवशिवाभेटी। होई जन्मतुटी तेणे मग'।।
शेष म्हणे निरूपिती जे रेणुक। ऐकती चित्तैक्य साधूनि ते।।

४०

मुख्य षट्स्थल उपस्थले त्यात। एकोत्तरशत स्थले सर्व।।
सोपाने ही सर्व लंघूनिया जाता। मग येई हाता कैवल्यचि।।
जन्मफेऱ्यांस जो जीवात्मा कंटाळे। मुक्तीकडे वळे तोच एक।।
मिळे गुरु-शिवकृपेचा आधार। जाय तो सत्वर ऐक्यस्थली।।
ऐक्यस्थली साधे शिव-जीव ऐक्य। मग मुक्तिसुख उपभोगी।।
हेचि षट्स्थल रेणुके समूळ। अगस्त्या सकळ निरूपिले।।
तेच आता तुम्हा श्रोत्यांच्या पुढ्यात। अभंगरूपात ठेविले हे।।
शेष म्हणे पुढे निर्मल चित्ताने। पूर्ण आस्वादिणे षट्स्थल हे।।

## पूर्वपीठिका संपूर्ण

# अंगस्थले

## अंगस्थलांतर्गत भक्तस्थल

### १. पिंडस्थल

४१ (१)

जन्मोजन्मी ज्याने पुण्य संपादिले। ज्याचे नष्ट झाले सर्व पाप।।
गंगोत्रीसारखे शुद्ध ज्याचे मन। त्यास 'पिंड' जाण नाम असे।।
श्रद्धाभक्ती त्याच्या मनामध्ये फुले। सर्वांगाने झुले भक्तस्थली।।
पुण्याचे आधिक्य पापाच्या क्षयाने। शुद्धात्म्यास होणे पिंड सत्य।।
सामान्य जे जीव त्याहून वेगळा। श्रेष्ठ तो ठरला 'पिंड' जीव।।
असे पिंडस्थल संपादी जो जीव। तोच होई शिव शेष म्हणे।।

४२ (२)

शिव एकमेव सत्-चित्-सुखरूप। विभू निर्विकल्प निराकार।।
प्रपंचावेगळा त्रिगुणांवेगळा। तोच जीव झाला अविद्येने।।
जीव-देव-पशु-मनुष्यादी योनी। यांमध्ये जन्मूनि भ्रमे सदा।।
जीवांच्या हृदयी राहूनि महेश। प्रेरक कर्मांस त्यांच्या होई।।
चंद्रकांत मण्यामध्ये वसे पाणी। जसा राहे अग्नी सूर्यकांती।।
धान्यबीजामध्ये वसतो अंकुर। तसा महेश्वर जीवाठायी।।
शेष म्हणे सर्व जीवहृदयांत। वसे शिव शांत स्वाभाविक।।

४३ (३)

सूर्याठायी बिंब-प्रतिबिंबपण। कल्पितचि पूर्ण असे जसे।।
तसे ब्रह्माठायी भोक्तृत्व भोज्यत्व। आणि प्रेरकत्व कल्पिलेले।।
त्रिगुणात्म शक्ती वसे शिवाठायी। विषम ते पाही होती गुण।।
त्यांच्यामुळे जीव, जगत्, ईश्वर। त्रिविध शंकर भासे डोळा।।



एकच तो शिव तीन रूपांतून। देतसे दर्शन शेष म्हणे।।

४४ (४)

सत्त्व-तम थोडे, रज अत्यधिक। चैतन्या त्या देख 'जीव' नाव।।
जीव 'भोक्ता' खरा भोगितो विषय। त्याच्यासाठी सर्व जग भोज्य।।
अति तमोगुणयुक्त जे चैतन्य। जगत् हे नाम त्याला साजे।।
तेच 'भोज्य' असे सर्व जीवांलागी। सर्वांगाने भोगी जीव तेच।।
चैतन्य जे शुद्ध सत्त्वगुणात्मक। असे ते प्रेरक महेश्वर।।
भोक्ता, भोज्य आणि प्रेरयिता तीन। सर्व शिव जाण शेष म्हणे।।

४५ (५)

शिव सुखरूप प्रेरक सर्वज्ञ। जीव हा अल्पज्ञ असे भोक्ता।।
अव्यक्त अत्यंत गूढ जे चैतन्य। त्यास 'जड' नाम भोज्य तेच।।
अध आणि ऊर्ध्व मायेचे हे भेद। ऊर्ध्वमाया शुद्ध त्यांत श्रेष्ठ।।
उर्ध्वमाया राहे शिव-आश्रयाने। मोहिले ना तिने आश्रयाला।।
अधोमाया राहे जीव-आश्रयाला। पाडिते तयाला मोहात ती।।
त्याच अविद्येच्या अंशभेदामुळे। असंख्य जन्मले जीव जगी।।
तिच्यामुळे जन्मजन्मांतरातून। चालले भ्रमण शेष म्हणे।।

४६(६)

सर्वज्ञ समर्थ मुक्त महेश्वर। घेई अवतार मायेमुळे।।
बद्ध जीव करी शरीरधारण। अल्पज्ञ होऊन अल्पकर्ता।।
शिवज्ञानहीन होऊन वर्तती। चौऱ्यांशी भोगिती लक्ष योनी।।
कधी देव पशू कधी पक्षिगण। चालले भ्रमण अविरत।।
भ्रमे चाक सवे भ्रमती आऱ्याही। फिरणे प्रत्यही तसे जीवा।।
कोठे व्हावा जन्म कोणत्या कुळात। त्यांचेच संचित ठरवी ते।।
त्यांच्या या कर्मांचा साक्षी नि प्रेरक। शिव असे एक शेष म्हणे।।

४७ (७)

सुखरूप शंभू कर्मांचा प्रेरक। मार्गोपदेशक कल्याणाचा।।
जन्म नि मृत्यूच्या फेऱ्यांतून मुक्त। कसा व्हावा भक्त शिकवितो।।
जीवाचे स्वकर्म पक्व होता पूर्ण। वासनेपासून मुक्त होतो।।
मग त्याच्यावर शिवकृपा होई। पिंडस्थली जाई शुद्ध जीव।।
त्याच्या मनामध्ये जागे शिवभक्ती। स्थिर होई मुक्तिमार्गावरी।।
जन्मच अंतिम अशा या जीवाचा। जन्म अखेरचा शेष म्हणे।।



## २. पिंडज्ञानस्थल

४८ (१)

पिंडस्थली जाता साधकाचे मन। जाई उजळून ज्ञानतेजे।।
शरीर-आत्म्याचे ज्ञान जे यथार्थ। त्यास होई प्राप्त अनायासे।।
मग पिंडस्थली होय पिंडज्ञानी। देह आत्म्याहूनी दूजा जाणे।।
देही वसे आत्मा, देहाहून भिन्न। हेचि पिंडज्ञान शेष म्हणे।।

४९ (२)

देहालाच आत्मा मानिती चार्वाक। स्वर्ग-परलोक नाकारिती।।
काहीच उरेना मृत झाल्यावर। राख मूठभर तेवढीच।।
भोग भोगावे ते काढूनिया ऋण। साजरा तो सण करावा हो।।
देहाविण अन्य आत्मा नाही नाही। गर्जूनिया ग्वाही देती तेच।।
शेष म्हणे गोड चार्वाक सिद्धान्त। सामान्या नितांत आवडतो।।

५० (३)

इंद्रियांस कोणी आत्माच मानिती। कोणी बुद्धीप्रती आत्मा म्हणे।।
माझे हे शरीर, माझी ही इंद्रिये। माझी बुद्धी आहे म्हणे जीव।।



'माझे हे, माझे हे' असे जो म्हणतो। 'माझे'पासूनि तो वेगळाच।।
'माझे' आणिक 'मी' यांत भिन्नपण। येई उमगून बुद्धिवंता।।
देहेंद्रिये, बुद्धी यांहून वेगळा। आत्मा तो आगळा जाणतो तो।।
शेष म्हणे देह, आत्मा नि ईश्वर। जाणे तो चतुर पिंडज्ञानी।।



## ३. संसारहेयस्थल

५१ (१)

मनातील मळ निरसून गेले। पाप क्षीण झाले मुळातून।।
नित्यानित्यवस्तुविवेक जागता। मग वाटे वृथा संसारचि।।
'हेय' म्हणजे त्याज्य अशी जाण वाहे। संसारहेय हे स्थल जाणा।।
दारापुत्रादींचे सुख क्षणभर। पद्मपत्रावर थेंब जसा।।
पुण्यक्षय होता स्वर्गीच्या जीवाला। लाविती वाटेला मृत्युलोकी।।
शेष म्हणे याच विवेके उदास। नेत्रे संसारास पाहतो तो।।

५२ (२)

जन्मला जो त्याला मरण निश्चित। मृता होई प्राप्त पुनर्जन्म।।
जन्म नि मृत्यूच्या अखंड फेऱ्यांत। भ्रमते सतत जीवसृष्टी।।
त्रिताप-अग्नीत निघती भाजून। विश्रांती कोठून मिळेल ती?।।
वात पित्त ज्वर छळिती देहास। पोळते मानस रागद्वेषे।।
राजा, लोक देती दुःखाच्या डागण्या। छळताती नाना ग्रह-प्रेते।।
स्वर्गी वा भूलोकी सुख नाही नाही। अनुभव ग्वाही शेष म्हणे।।

५३ (३)

विद्युल्लता, जलतरंग नि ज्योत। चंचल सतत जाणवे ते।।
तसे ऐश्वर्य ते सर्व मालमत्ता। आणि राजसत्ता अस्थिरचि।।

राजसिंहासनापुढती मुजरे। झडले ते सारे गेले कुठे?।।
कोठे चक्रवर्ती? कोठे धनवान?। काळात विरून सर्व गेले।।
उतले मातले अन्यायी ठरले। काळापुढे झाले पराभूत।।
शेष म्हणे दृष्टीपुढे जे जे दिसे। ते ते सर्व नाशे कालांतरे।।

५४ (४)

मलमूत्रकोश म्हणती देहास। संत नि पुरुष विवेकी जे।।
क्षणकाल नभी प्रकाशते वीज। तसा देह आज, उद्या नाही।।
पायी ठेच लागे आटोपला ग्रंथ। अस्थिर हा पंथ शरीराचा।।
देहामुळे येती दुःखभोग माथा। किती होती व्यथा मनास त्या।।
अशा देहाविषयी प्रीत जाणत्याशी। वाटेलच कशी? शेष म्हणे।।

५५ (५)

नित्यानंदरूप सद्रूप चिद्रूप। आत्मतत्त्वरूप असे आहे।।
आत्म्याला सोडून अशा नाशिवंत। देहावरी प्रीत कोण करी?।।
आत्मरूपाकडे विवेकी शहाणा। कधी डोळा काणा करीना की।।
मनाचा निर्मळ आत्मरूपज्ञाता। जाणे यथार्थता संसाराची।।
दुःखमूळ देह, स्त्रीपुत्रादीप्रती। उदास ती मूर्ती शेष म्हणे।।

५६ (६)

मित्र, नातलग, द्रव्य, वंश, रीती। क्षणाचे सोबती जाणतो तो।।
क्षणभंगुर ते मनी ओळखून। राहे उदासीन विरागी तो।।
विवेकी, निरिच्छ विषयसुखात। आत्मरूपी प्रीत मनी नांदे।।
संसारदुःख हे नाशो मुळातून। बुद्धीच उत्पन्न होते त्याला।।
बाह्य संसारात रमेनाच मन। असा उदासीन शेष म्हणे।।

५७ (७)

नित्य काय जगी अनित्य ते काय। याचा जो निर्णय करी मनी।।



सत्कर्मे आचरी मन अतिस्वच्छ। ब्रह्मादींचे तुच्छ ऐश्वर्यही।।
क्षणी येते जाते क्षणभंगुर ते। असे जाणवते ज्याला पूर्ण।।
त्याला आनंदाचा झरा जो शंकर। जो करी संसारदुःखनाश।।
करी जो मस्तकी चंद्रास धारण। शिवाचे त्या प्रेम मनी जागे।।
शिवभक्ती त्याच्या फुले देही मनी। आनंदाचा धनी शेष म्हणे।।

## ४. गुरुकारुण्यस्थल

५८ (१)

वीरशैवा इष्ट अष्ट आवरण। करिती रक्षण साधकाचे।।
गुरू, लिंग आणि जंगम हे तीन। पूजनीय पूर्ण वीरशैवा।।
विभूती, रुद्राक्ष आणि मंत्र तीन। पूजेला साधन साधकाशी।।
पादोदक आणि प्रसाद ही दोन। पूजाफळे पूर्ण वीरशैवा।।
आवरणे अशी आचरे जो शैव। तोच वीरशैव शेष म्हणे।।

५९ (२)

गुरूला पहिला आवरणी मान। तयाचे लक्षण विवरिले।।
शिवापरिसही श्रीगुरू अधिक। जाणे सुखदुःख तोच एक।।
शिव बोलेनाच कधी भक्तासवे। गुरूच्या सुखावे शब्दे मन।।
ठेवी पाठीवर हात प्रेमभरे। सच्छिष्याचे सरे सारे दुःख।।
शिष्याचा होतसे असा तो सांगाती। म्हणूनि म्हणती गुरोधिकः।।
शेष म्हणे असा लावीतसे लळा। बहरतो मळा जीवनाचा।।

६० (३)

विवेक, जिज्ञासा, वैराग्य संपूर्ण। शुद्धान्तःकरण ज्याच्याठायी।।
त्याच्यावरी होय पूर्ण गुरुकृपा। आणि होय सोपा मुक्तिमार्ग।।

नित्य-अनित्याचा करिता विवेक। दृष्टी होय चोख परिपूर्ण।।
ज्ञानप्राप्तीची ती लागावी तहान। करावे मंथन जिज्ञासेने।।
संसाराविषयी वैराग्य संपूर्ण। तेणे वृत्ती जाण अंतर्मुख।।
शुद्धान्त:करणी पडे आत्मबिंब। जसे प्रतिबिंब दर्पणात।।
शेष म्हणे असा शिष्य गुणयुक्त। त्यावरी त्वरित गुरुकृपा।।

६१ (४)

श्रीगुरू असावे प्रसिद्ध लोकांत। लोभमोहमुक्त, आत्मज्ञानी।।
विषयसुखाच्या भ्रमातून मुक्त। शिवसिद्धान्तात पारंगत।।
विमुक्त संदेह-विभ्रमांपासून। धर्मपरायण, सत्यवक्ता।।
कुमार्गवर्जित, पाळी कुलाचार। ध्यानात तत्पर शंकराच्या।।
शांत, शिवतत्त्वविवेकी संपूर्ण। भस्म-उद्धूलन क्रिया जाणे।।
भस्मरूपज्ञाता, त्रिपुंड्रधारक। कंठी माळा चोख रुद्राक्षांच्या।।
इष्टलिंगधारी, पूजापरायण। लिंगांगयोगज्ञ शिवाद्वैती।।
अंग-लिंगस्थले सर्व जाणे भेद। मंगल ते शब्द ओठांवरी।।
असा षड्गुणैश्वर्ययुक्त गुरू। भवाब्धीचे तारू शेष म्हणे।।

६२ (५)

अशा धर्मनिष्ठ श्रीगुरूला भावे। त्वरे शरण जावे सच्छिष्याने।।
षण्मास वा वर्ष भयभक्तियुक्त। सेवा ती निश्चित करावी की।।
आप्त सखा सर्व गुरूस मानावे। अन्य न करावे चिंतन ते।।
गुरुघर-कृषि-तपस्येची जागा। त्यांची नित्य निगा राखावी ती।।
करे श्रीगुरूचे चरण चुरावे। मनही राखावे सर्वकाळ।।
श्रीगुरूविषयी सद्भाव मनात। निस्संदेह निश्चित बाळगावा।।
सेवा करावी तो प्रसन्न होईतो। मग दीक्षा देतो शेष म्हणे।।



६३ (६)

गुरूशी दोकर जोडून प्रार्थावे। 'आचार्या, रक्षावे मला आता।।
शिवज्ञानसिंधू तुम्ही भाग्यवंत। भवरोगग्रस्त जहालो मी।।
तुम्हा मी शरण आलो सर्वभावे। रक्षण करावे शरणाचे'।।
शिष्याची प्रार्थना ऐकून गुरूने। शक्तिपातचिन्हे न्याहाळावी।।
लिंगज्ञान देई नाशी त्रिमलांस। अशी दीक्षा त्यास द्यावी तेव्हा।।
वेधा, क्रिया, मांत्री अशी ती त्रिविध। शेष म्हणे भेद जाणावे हो।।

६४ (७)

शिष्याकडे कृपादृष्टीने पाहून। मस्तकी ठेवून वरदहस्त।।
त्याच्याठायी शिवतत्त्व जागविणे। तिलाच म्हणे वेधादीक्षा।।
मनन करिता करितो रक्षण। मंत्र तो महान पंचाक्षरी।।
तोच महामंत्र शिष्याच्या कर्णात। देणे हीच सत्य मांत्रीदीक्षा।।
पंचकलशांची स्थापना करून। सर्वही करून कर्मक्रिया।।
शिष्यालागी लिंगधारण करणे। तिला संबोधिणे क्रियादीक्षा।।
शेष म्हणे अशा दीक्षा ह्या त्रिविध। घेती तेच शुद्ध वीरशैव।।

६५ (८)

शुभ मास, तिथी, मुहूर्त पाहून। द्यावे निमंत्रण शिवभक्ता।।
त्यास बसवावे पूर्व-अभिमुख। उत्तराभिमुख श्रीगुरूने।।
शिवनाम-ध्यान शिष्याने करावे। भस्म ते चर्चावे विधियुक्त।।
कलशजलाचे त्रिवार सिंचन। शिष्यमाथी जाण करवावे।।
शिवपंचाक्षरी शिष्याच्या कर्णात। सांगावा अत्यंत गूढपणे।।
मंत्ररूप, छंद, ऋषी, देवता, न्यास। सांगावे शिष्यास विवरूनी।।
शेष म्हणे अशी दीक्षा वेधयुक्त। घेतो तो निश्चित वीरशैव।।

६६ (९)

गुरू पेरी मनी उत्तम विचार। बहरे अंतर भक्तिप्रेमे।।
शिष्य-सद्बुद्धीचे करितो रक्षण। गुरू हा, कारण विष्णुरूप।।
पशुपण त्याचे करी दूर त्वरे। सर्वही संहारे दुष्टबुद्धी।।
शिष्यदृष्टीलागी फुटे ज्ञानफाटा। दिसती त्या वाटा कैवल्याच्या।।
श्रीगुरूच ब्रह्मा, विष्णू, महेश्वर। वंदा वारंवार शेष म्हणे।।

## ५. लिंगधारणस्थल

६७ (१)

स्फटिक, पाषाण, मणी चंद्रकांत। बाण, सूर्यकांत यांच्यातून।।
घडवावे लिंग देखणे सुबक। शास्त्रयुक्त एक लक्षणांनी।।
पंचगव्य-पंचामृताने करावे। शुद्ध नि पूजावे बेलपुष्पे।।
पंचाक्षरी मंत्रे संस्कार करावे। शिष्यकरी द्यावे श्रीगुरूने।।
शिष्यमस्तकीच्या शिवकलांप्रत। लिंगाठायी स्थित करूनिया।।
शिवकलापूर्ण लिंगाला स्थापित। शिष्याच्या प्राणात करावे हो।।
शिव-जीवकलासामरस्ययुक्त। शिष्याच्या करात लिंग द्यावे।।
शेष म्हणे असे लिंग विधिपूर्ण। करावे धारण निष्ठायुक्त।।

६८ (२)

'शिष्या, लिंग तुझे प्राणलिंग जाण। करावे धारण प्राणासम।।
शरीरावर ते सदैव असावे। वियुक्त नसावे किंचित्काल।।
अनवधानाने ते पडे भूमीवर। तत्काळ तू कर प्राणत्याग।।
तुला तेव्हा मोक्ष प्राप्तच होईल। पण अशी वेळ येऊ नये।।
जसे प्राणाला रे जपतो माणूस। तसेच लिंगास जपावे बा'।।
शेष म्हणे असा गुरू उपदेश। करिती शिष्यास स्पष्टपणे।।



६९ (३)

लिंगधारणेचे बाह्य, आभ्यंतर। असती प्रकार दोन असे।।
कंठी जे रुळे ते असे इष्टलिंग। हृदी अंतर्लिंग शिवरूप।।
देहावर लिंग बाह्य ते धारण। अंतरी ते ध्यान आभ्यंतर।।
चिद्रूप, निष्कल आणि निर्विकल्प। सत्-चित्-सुखरूप महालिंग।।
पूजा-भक्तीसाठी शिव तो महान। होतसे लहान लिंगरूपे।।
परम शिवाचे लिंग हे प्रतीक। जाणावे सम्यक् शेष म्हणे।।

७० (४)

चराचर विश्व लय पावे ज्यात। पुन्हा प्रादुर्भूत ज्याच्यातून।।
असे जे शाश्वत ब्रह्म तेच लिंग। तेच महालिंग विश्वाधार।।
आधार, हृदय, भ्रूमध्य या तीन। पैकी त्याचे ध्यान एकाठायी।।
करणे हे जाण हाच आभ्यंतर। धारणप्रकार असे बापा।।
शेष म्हणे लिंग बाह्य-आभ्यंतर। करा निरंतर धारण ते।।

७१ (५)

शिवयोगियांनी मूलाधारस्थानी। लिंग सुवर्णवर्णी कल्पावे हो।।
पोवळ्यासारखे हृदयी कल्पावे। भ्रूमध्यात ध्यावे शुभ्रवर्ण।।
असे अंतरंगी लिंगाचे धारण। त्यास अभिधान निरुपाधिक।।
बाह्य लिंगापेक्षा कोटीपट श्रेष्ठ। म्हणती वरिष्ठ शिवयोगी।।
अंतरी करिती लिंग जे धारण। तयांना जनन पुन्हा नाही।।
शेष म्हणे लिंगधारण पवित्र। करिता त्रिनेत्र संतोषतो।।

७२ (६)

वैराग्य नि ज्ञानसंपन्न जे मुनी। अंतर्लिंगध्यानी गोडी त्यांना।।
अंतर्लिंगध्याने पंचक्लेशांतून। मुक्ती मिळे पूर्ण सत्य जाणा।।
अंतर्लिंगी रत तरी देही जाण। करावे धारण इष्टलिंग।।

देही इष्टलिंग, हृदी सूक्ष्मलिंग। आणि भावलिंग भावनेत।।
अशी तीन लिंगे पण इष्टलिंग। त्याचा नको त्याग शेष म्हणे।।

७३ (७)

मस्तकी कंठात कक्ष-वक्षावर। किंवा पोटावर तळहाती।।
ईश्वरस्वरूपी लिंगाचे धारण। भक्ते आमरण करावे हो।।
नाभिस्थानी जटेवर पाठीवर। मलस्थानावर लिंग नको।।
करपीठी लिंग ठेवूनि पूजितो। परिशुद्धचि तो शेष म्हणे।।

७४ (८)

ब्रह्माविष्णु, देव, ऋषिमुनिगण। मस्तकी धारण करिती लिंग।।
लक्ष्मी आदी शक्ती सर्वही देवता। भूषविती माथा लिंगाने हो।।
वेद-पुराणांत आगमग्रंथांत। लिंगधारणव्रत कथिले हे।।
छत्तीस तत्त्वांत व्यापिले जे ब्रह्म। तेच लिंगब्रह्म शेष म्हणे।।

७५ (९)

नाही तपश्चर्या, पक्व नाही मन। वैराग्य रुसून गेलेले ते।।
शिवसंस्काराचा मुळी लेश नाही। नाही विवेकही नित्यानित्य।।
ज्यास नाही गुरुकारुण्यही प्राप्त। राहिला वंचित दीक्षेहूनी।।
त्याने इष्टलिंग घेऊनि विकत। आपुल्या गळ्यात घालू नये।।
गुरुदीक्षेविण लिंगाचे धारण। पापाचे कारण शेष म्हणे।।

७६ (१०)

लिंगधारणेचे व्रत हे महान। देहावर जाण देव आहे।।
असे भान नित्य भक्ताने ठेवावे। सर्वस्व अर्पावे लिंगाठायी।।
लिंगासाठी वेषभूषा, खाणेपिणे। लिंगासाठी जिणे सर्वकाळ।।
सुखदु:खभोग आणि हर्षखेद। लिंगाचा प्रसाद मानावा हो।।



असा सर्वस्वाने लिंगरूप झाला। सफल जहाला जन्म त्याचा।।
शेष म्हणे लिंग हाच जीवप्राण। वर्तावे मानून वीरशैवे।।

□

## ६. भस्मधारणस्थल

७७ (१)

अष्टावरणात 'भस्म' आवरण। करी ते रक्षण साधकाचे।।
'महाभस्म' ऋषी शिवाला म्हणती। हृदयात ध्याती सदोदित।।
विभूती, भसित, भस्म, रक्षा, क्षार। पाच हे प्रकार विभूतीचे।।
ऐश्वर्या कारण म्हणून 'विभूती'। भस्माला म्हणती आगमिक।।
सर्व पातकांचे करिते भर्त्सन। 'भस्म' हे म्हणून नाव साजे।।
नित्य शिवतत्त्व करी प्रकाशित। म्हणून 'भसित' नाव साजे।।
त्रितापांचा क्षय करिते सत्वर। म्हणूनिया 'क्षार' संबोधिती।।
भूतप्रेतग्रहांपासून रक्षिते। म्हणून 'रक्षा' ते शेष म्हणे।।

७८ (२)

नंदा भद्रा आणि सुरभी सुशीला। सुमना ह्या झाल्या दिव्य गायी।।
उत्पन्नल्या शिवपंचमुखांतून। गोमयापासून झाली भस्मे।।
नंदेची 'विभूती' भद्रेचे 'भसित'। सुरभीचे श्वेत 'भस्म' असे।।
'क्षार' सुशीलेचे 'रक्षा' सुमनेची। अशी ही भस्माची जन्मकथा।।
कल्प, अनुकल्प आणि उपकल्प। आणिक अकल्प चार क्रिया।।
तीन क्रियांनी जे निर्मिलेले भस्म। असे ते उत्तम शेष म्हणे।।

७९ (३)

धर्मशास्त्री स्नाने कथियेली सप्त। भस्मस्नान त्यात श्रेष्ठ जाणा।।
भस्माला सर्वांगी उधळावे भक्ते। 'भस्मोद्धूलन' ते नाव त्याला।।

भस्माच्या कणांचे करणे लेपन। त्यास भस्मस्नान नाव साजे।।
भस्मस्नाने नाशे अंतर्बाह्य मळ। स्नानांत सकळ तेच श्रेष्ठ।।
शेष म्हणे असे भस्मस्नान नित्य। वीरशैवे सत्य करावे हो।।

८० (४)

मस्तक, कपाळ आणि दोन कर्ण। कंठ, वक्षस्थान, दोन भुजा।।
नाभी, पाठ, दोन बाहू आणि मान। मनगटे दोन पंधरा स्थाने।।
स्थानी या करीत प्रणव-उच्चार। त्रिपुंड्र सुंदर रेखावे हो।।
त्रिपुंड्र रेखावे स्पष्ट नि धवल। रेखाही सरळ असाव्या त्या।।
भाळी रेखिताना दर्पणी पाहून। विभूती कोरून लावू नये।।
भस्म हे नव्हेच सौंदर्यसाधन। ध्यानी घ्यावे पूर्ण भक्तांनी हे।।
त्रिकाळ त्रिपुंड्र लावितो जो भाळी। तोच चंद्रमौळी सत्य सत्य।।
त्रिपुंड्रधारका पापांतून मुक्ती। अशी ही महती शेष म्हणे।।

८१ (५)

सकाळी माध्यान्ही आणि सायंकाळी। भस्म सदा भाळी चर्चावे हो।।
करी जो भस्माचे त्रिपुंड्र धारण। रुद्रचि तो जाण निस्संदेह।।
ब्रह्मा, विष्णू, रुद्र, इंद्र, सुरगण। त्रिपुंड्रधारण करिती नित्य।।
नास्तिक असो वा असो दुराचारी। जरी भस्मधारी उद्धरी तो।।
शिवागम, वेदपुराणे-शास्त्रांत। भस्मधारणव्रत कथिले हे।।
शेष म्हणे वीरशैवांनी सुजाण। त्रिपुंड्रधारण करावे हो।।

**७. रुद्राक्षधारणस्थल**

८२ (१)

रुद्र-अक्षातून उत्पन्न जहाले। 'रुद्राक्ष' मिळाले नाव जाणा।।



त्रिपुरसंहारा दृष्टी अनिमेष। लावी आशुतोष भक्तसखा।।
तेव्हा नेत्रांतून योगाश्रू वर्षले। नाव ते पावले 'रुद्राक्ष' हे।।
शिवभक्ते कंठी रुद्राक्षांची माळ। सदासर्वकाळ बाळगावी।।
भस्म नि रुद्राक्ष हेचि अलंकार। त्यांना नाही चोर जगामध्ये।।
सुवर्णासारखे नाही प्रदर्शन। भरे पूर्ण मन सत्त्वगुणे।।
शेष म्हणे वीरशैवांची भूषणे। देही आवडीने वागवावी।।

८३ (२)

शुद्ध सोन्यासम, कीड नाही ज्याला। ज्याने ना देहाला भूषविले।।
असाच रुद्राक्ष उत्तम जाणावा। धारण करावा प्रेमयुक्त।।
शिखेमध्ये एक, मस्तकी ते तीन। रुद्राक्ष धारण करावे हो।।
मस्तकाभोवती रुद्राक्ष छत्तीस। कंठात बत्तीस बाळगावे।।
कर्णामध्ये सहा, वक्षी ते पन्नास। षोडश षोडश बाहूंवरी।।
मनगटी बारा-बारा, एकशेआठ। ब्रह्मसूत्रे कंठ भूषवावा।।
रुद्राक्षांची किती मुखे नि कोठे ते। धारण करावे ते ग्रंथी पाहा।।
शेष म्हणे असे रुद्राक्षधारण। जाणूनि ते पूर्ण घ्यावे भक्ते।।

८४ (३)

सर्वकाळ करी रुद्राक्षधारण। मुक्त पापांतून, मूढ जरी।।
असो मद्यपी वा ब्रह्मघातकी तो। भ्रूणहत्यारा तो किंवा चोर।।
गुरुभार्यागामी, वधी मायपिता। पापात्मा पुरता कृतघ्न की।।
त्याने जर केले रुद्राक्षधारण। सर्व पापांतून मुक्त होय।।
अशी रुद्राक्षाची महिमा थोरवी। चतुरी जाणावी शेष म्हणे।।

८५ (४)

रुद्राक्षधारण-स्पर्शन-पूजन। स्मरण-दर्शन करी कोणी।।
असो तो ब्राह्मण अथवा दलित। अज्ञ वा पंडित कोणी असो।।

रुद्राक्षधारणे सर्व पापे जाती। दारे उघडती मोक्षश्रीची।।
भस्मविभूषित अंगी रुद्रमाळा। रुद्रचि तो झाला निस्संदेह।।
एक कोटी केल्यासमान गो-दाने। रुद्राक्षधारणे पुण्य लाभे।।
रुद्राक्षधुतले जल प्राशी नर। अंतकाळी रुद्रलोकी जाई।।
वर्णाश्रमधर्मसंपन्न लोकांत। सर्वश्रेष्ठ ख्यात भस्मधारी।।
विभूति-रुद्राक्षाविण कर्म केले। निष्फळ ते झाले शेष म्हणे।।

## ८. पंचाक्षरीजपस्थल

८६ (१)

परशिवब्रह्म त्याचा जो वाचक। मुक्तिप्रदायक पंचाक्षरी।।
अष्टादश विद्या जगती उत्कृष्ट। चतुर्वेद श्रेष्ठ त्यांच्यामध्ये।।
चार वेदांमध्ये श्रीरुद्र बलिष्ठ। अनुवाक् श्रेष्ठ अष्टम् त्यात।।
त्यात 'नम: शिवाय च शिवतराय च'। मंत्र श्रेष्ठ साच जाणावा हो।।
मंत्रामधली त्या 'शिव' ही द्व्यक्षरे। शिवरूप खरे वर्णिती हो।।
शेष म्हणे जगी सप्तकोटी मंत्र। त्यामध्ये पवित्र पंचाक्षरी।।

८७ (२)

सकल मंत्रांचे मूळ पंचाक्षरी। जपता निर्धारी शिवप्राप्ती।।
पंचाक्षरी-ज्ञानानंतर सकळ। निरर्थ केवळ अन्य मंत्र।।
तेहतीस कोटी देवांमध्ये श्रेष्ठ। जसा नीलकंठ शोभतसे।।
तसा सप्तकोटी मंत्रांत पुनीत। शोभतो विख्यात पंचाक्षरी।।
'शिव' हे ब्रह्माचे प्रकाशक नाव। शिवरूप वैभव दावीतसे।।
नाव ते गुंफिले मंत्रात ज्या शुद्ध। जाणा तो प्रसिद्ध पंचाक्षरी।।
पंचाक्षरी मंत्र मंगलकारक। संसारमोचक शेष म्हणे।।



८८ (३)

ज्यांना मोक्ष हवा त्यांनी पंचाक्षर। जपावा सादर प्रेमयुक्त।।
पंचमहाभूते, तन्मात्राही पंच। ज्ञानेंद्रिये पंच कर्मेन्द्रिये।।
परा, आदि, इच्छा, ज्ञान, क्रियाशक्ती। पाच शिवशक्ती असती ह्या।।
आचार नि गुरु-शिव-जंगमलिंग। प्रसाद ते लिंग पाचच हे।।
मन, बुद्धी, अहं, पुरुष, प्रकृती। पाचास म्हणती चराचर।।
शेष म्हणे पंचसंख्येने साकार। सर्व पंचाक्षरमय असे।।

८९ (४)

पंचाक्षरीआधी लाविता ॐकार। होय षडक्षर मंत्र मग।।
परशिव असे 'सकल-निष्कल'। विश्व हे 'सकल' शिवरूप।।
सच्चिद्रूप परशिव विश्वातीत। 'निष्कल' हे सत्य रूप त्याचे।।
प्रणव बोधितो 'निष्कल' शंकर। बोधी पंचाक्षर 'सकल'रूप।।
सकल-निष्कल शिवरूपे दोन। षडक्षरी पूर्ण सामावली।।
शेष म्हणे जपा भावे षडक्षर। समग्र शंकर येई हाती।।

९० (५)

मूलमंत्र, विद्यामंत्र, शिवमंत्र,। शैवसूत्रमंत्र, पंचाक्षर।।
पंचाक्षरीची ही अशी नावे पाच। वीरशैवांनीच जाणावी ही।।
सर्वही मंत्रांचे पंचाक्षरी मूळ। म्हणूनिया 'मूल' संबोधिती।।
मंत्रजापकास होय विद्याप्राप्ती। म्हणूनि म्हणती 'विद्यामंत्र'।।
सर्व मंगलांचा कारक हा मंत्र। साजे 'शिवमंत्र' नाव याचे।।
शिव आणि भक्तांमधील हा सूत्र। असे 'शैवसूत्र' म्हणूनि हा।।
पाच अक्षरांनी मंत्र हा घडला। 'पंचाक्षर' याला संबोधिती।।
मंत्राच्या आरंभी लाविता ॐकार। होय षडक्षर शेष म्हणे।।

९१ (६)

पूर्व-अभिमुख जपास बसावे। त्रिवेळा करावे प्राणायाम।।
उमेसह शिव मनात चिंतावा। एकाग्र जपावा महामंत्र।।
वाचिक, उपांशू आणि मानसिक। त्रिविध हा देख जप असे।।
स्पष्टपणे ऐकू येतसे लोकांस। वाचिक हे त्यास नाव जाणा।।
ऐकू न ये मंत्र हलती अधर। उपांशू प्रकार जपाचा हा।।
ओठ-जिव्हा स्थिर अंतरंगी जप। होय आपोआप मानस तो।।
संथ लयीमध्ये वाजे एकताल। तसा दरवळ मानसाचा।।
हृदयाआतून अखंड ये साद। जसा घुमे नाद अनाहत।।
शेष म्हणे श्रेष्ठ मानसिक जप। करा आपोआप सुख लाभे।।

९२ (७)

यज्ञ, व्रते, दाने, पंचाग्निसाधने। जपाशी कवणे तुळती ना।।
जल-वायू भक्षूनिया करी तप। त्याला शिवलोक मिळेनाच।।
परि जो सर्वदा जपे पंचाक्षरी। त्यास घडे वारी शिवलोकी।।
पापात्मा वा पुण्यवंत एकवार। जपे पंचाक्षर, पूजा करी।।
मुक्त तो तत्काळ होय भवातून। असा हा महान महामंत्र।।
ब्रह्मा, विष्णु, रुद्र देवा निजकार्य। करावया धैर्य मंत्रामुळे।।
होय पापमुक्ती जपे एकनिष्ठे। मोक्षलक्ष्मी तिष्ठे त्याच्या दारी।।
शेष म्हणे जपा जपा पंचाक्षरी। जन्ममृत्युवारी चुकेल की।।

९३ (८)

स्फुल्लिंग पडला जरी कापसात। तरी भस्मसात ढीग करी।।
महाकाय हत्ती अंकुश तो सान। ठेवी नियंत्रण हत्तीवरी।।
तसा पंचाक्षरी दिसतो लहान। तरी करी पूर्ण पापे भस्म।।
शिवाशी संबंध आपुला जुळावा। असे वाटे जीवा जरी एका।।



त्यासाठी एकच सुलभ साधन। मंत्र हा महान पंचाक्षरी।।
जपा पंचाक्षर जुळे शिवसूत्र। हाती ये त्रिनेत्र शेष म्हणे।।

९४ (९)

मंत्रजप नव्हे दुजे काही एक। मारलेली हाक शंकराला।।
पुनः पुनः पुन्हा हाक मारी भक्त। शिव दे निश्चित प्रतिसाद।।
म्हणूनिया मन:पूर्वक जपावा। मानस करावा जप सदा।।
प्राणायामासह करूनिया ध्यान। मंत्र मनोमन जपावा हो।।
मंत्रजप नव्हे नव्हे प्रदर्शन। मुखे ओरडून जप नको।।
हृदयस्थ शिवा करणे आवाहन। हाच अर्थ पूर्ण मंत्राचा ह्या।।
इष्टलिंगा साक्ष ठेवी करी जप। फळे आपोआप कोटीगुणे।।
हृदयी सर्वदा असा महामंत्र। जपावा पवित्र शेष म्हणे।।

## ९. भक्तमार्गक्रियास्थल

९५ (१)

भाळी भस्म, गळा रुद्राक्षांच्या माळा। रुळे वक्ष:स्थळावरी लिंग।।
मुखे पंचाक्षर जपे सर्वकाळ। साधक निर्मळ शिवभक्त।।
त्याला पाहताच भासे शिव आले। सर्वही निमाले जन्मदु:ख।।
भूलोकीचा शिव असा दिव्य देह। मिटूनि संदेह सर्व गेले।।
वंदावे पूजावे पाहावे वानावे। अभिनव नवे शिवरूप।।
त्याच्याठायी नवविधा बाणलेली। दिसे भक्ती भली शेष म्हणे।।

९६ (२)

श्रवण, कीर्तन आणिक स्मरण। पाद ते सेवन, अर्चनही।।
वंदन, दास्य, सख्य, आत्मनिवेदन। नवविधा पूर्ण भक्ती अशी।।

शिवकथा कानी सदैव ऐकावी। मुखी सदा गावी शिवगीते।।
शिवध्यानातचि रमवावे मन। अंतर रंगून जावे नामी।।
शिवचरणांची मनोभावे सेवा। करावी, पूजावा शिव सदा।।
प्रेमभरे त्यास करावे वंदन। राहावे होऊन दास त्याचा।।
जिवेभावे त्याला सखाच मानावे। आपणही व्हावे सखा त्याचा।।
तन-मन-धन सर्वस्व अवघे। शिवाला ते वेगे समर्पावे।।
सुकृताची जोडी ज्याच्या गाठोड्यात। त्यास सहजप्राप्त नवविधा।।
पण पापात्म्याच्या पडेना दृष्टीस। भक्ती ही विशेष शेष म्हणे।।

## ९७ (३)

ज्याच्याठायी दृढ झाली शिवभक्ती। शिवाला तो अतिप्रिय होतो।।
बाह्य-आभ्यंतर अशी द्विविध ती। स्थूल, सूक्ष्म भक्ती नावे अशी।।
शुद्ध भूमि-रत्नसिंहासनावर। बैसूनि सादर इष्टलिंगा।।
पूजिणे ती बाह्य भक्ती, निरंतर। वीरमाहेश्वर आचरिती।।
लिंगामध्ये प्राण प्राणामध्ये लिंग। झाले ते अभंग समरस।।
असे जाणूनिया करणे चिंतन। तीच भक्ती पूर्ण आभ्यंतर।।
वीरशैव आचरिती आभ्यंतर। चुके जन्मांतर शेष म्हणे।।

## ९८ (४)

बीजापासूनिया अंकुर उत्पन्न। अंकुरापासून बीज जन्मे।।
शिवप्रसादाने तशी शिवभक्ती। होय भक्तचित्ती उदित ती।।
शिवभक्तीमुळे मिळतो प्रसाद। असा हा संबंध दोहोंमध्ये।।
एका जन्मामध्ये भक्ती नव्हे प्राप्त। त्यासाठी सुकृत लागे खूप।।
अन्य शैवा तीन जन्मी मुक्ती प्राप्ती। वीरशैवा मुक्ती एका जन्मी।।
भक्तीमुळे नाशे जन्माचे कारण। होय निवारण जन्मदु:ख।।
शेष म्हणे भक्तिरत पुरुषास। नाही गर्भवास सत्य जाणा।।



## ९९ (५)

शिवध्यानी रत मन तेचि मन। अन्य करी ध्यान ते मन नोहे।।
लीन शिवनामी तीच खरी वाणी। रमे अन्य नामी ती वाणी नोहे।।
भस्मरुद्राक्षाने भूषित जो देह। तोच खरा देह, अन्य नोहे।।
असे एकनिष्ठ करणे चिंतन। तीच भक्ती जाण मानसिक।।
शिवस्तुती गाणे, करणे भजन। तिला अभिधान वाचिक हे।।
शिवपूजाअर्चा करणे देहाने। कायिक ती जाणे भक्ती बापा।।
शेष म्हणे देह-वाचा-मनोभावे। शंकरा अर्चावे सर्वकाळ।।

## १०० (६)

तप, कर्म, जप, ध्यान आणि ज्ञान। हेचि शिवार्चन पंचविध।।
‘शिवपंचयज्ञ’ यास संबोधिती। हेच आचरिती वीरशैव।।
शिवपूजेसाठी गंध-फूल-पाने। देह झिजविणे संपादाया।।
हाच ‘तपयज्ञ’, देहाचे शोषण। अन्य नव्हे मान्य वीरशैवा।।
इष्टलिंगपूजा हाच ‘कर्मयज्ञ’। तोच मान्य सुज्ञ वीरशैवा।।
पंचाक्षर जप, रुद्राध्यायाभ्यास। प्रणवाभ्यास हा ‘जपयज्ञ’।।
हृदयी सर्वदा शिवाचे चिंतन। करणे हा ‘ध्यानयज्ञ’ जाणा।।
शिवागमांतून मिळे जे जे ज्ञान। त्याचे संपादन ‘ज्ञानयज्ञ’।।
असे पंचयज्ञ नित्य आचरावे। न लगे पाहावे शुभाशुभ।।
वीरशैवांसाठी सर्व तिथी शुभ। काही न अशुभ शेष म्हणे।।

## १०१ (७)

गुरूकडूनि जो जहाला दीक्षित। त्याने शिवभक्त सन्मानावे।।
शिवदीक्षायुक्त आचारसंपन्न। त्यांच्याच भोजन गृही घ्यावे।।
ज्याच्याठायी झाला शिवाचार क्षीण। त्याचे कधी धन घेऊ नये।।
अन्य देवतांची पूजा आणि स्तुती। ध्यानादी कल्पांती करू नये।।

अन्य देवतांस अर्पिलेले अन्न। त्याचा मुखी कण घालू नये।।
शिवाविण अन्य गृहात ज्या देव। तेथे कधी पाय ठेवू नये।।
अन्य देवा पूजी करितो पाखंड। त्याचे कधी तोंड पाहू नये।।
निष्ठेने भजावा एकमेव शिव। पार होई भव शेष म्हणे।।

१०२ (८)

स्थावरलिंगाला अर्पिला प्रसाद। असे तो निषिद्ध वीरशैवा।।
परि स्थावरास करू पाहे भंग। तेथे शिवलिंग रक्षावेच।।
संकटी पडता कोणी शिवभक्त। वारावा त्वरित उपद्रव।।
शिवकार्यासाठी प्राणास वेचिता। शिवसायुज्यता त्याला लाभे।।
शिवनिंदा करी दुराचारी कोणी। जीभ मुळातूनि हासडावी।।
अशक्य हे तरी वाक्ताडन करावे। स्थानास त्यागावे तत्काळ त्या।।
होई शिवनिंदा जाऊ नये तेथे। फिरावे मागुते शेष म्हणे।।

१०३ (९)

दीक्षा घेऊनिया शिवपूजा करी। त्यागावी ती सारी पूर्वकर्मे।।
शिवाविण अन्य घेऊ नये नाव। दुज्या पूजा सर्व निषिद्धचि।।
अन्य देवांसह शिवाला पूजिले। तरी ते जहाले सोंगढोंग।।
अशी शिवपूजा निष्फळचि होते। ध्यानी हे पुरते घ्यावे भक्ते।।
दोन देव तरी निष्ठा झाली भंग। नव्हे तो अव्यंग वीरशैव।।
दो ठायी जयाचा भाव तो पतित। धर्मकृत्याप्रत पात्र नव्हे।।
शेष म्हणे ज्याने स्वीकारिला शिव। त्याने अन्य देव मानू नये।।

१०४ (१०)

शिवभक्त इष्टलिंग जो धारक। तयास सूतक नसे काही।।
जन्म होवो किंवा मृत्यू होवो घरी। लिंगपूजा सारी करावीच।।
लिंगपूजन हे नित्यव्रत आहे। करावे लागे हे आमरण।।



ऋतुकाळ येवो अथवा प्रसूती। सूतक स्त्रीप्रती नसे कदा।।
गुरुजंगमांच्या तीर्थाचे सिंचन। करिते हरण सूतकाचे।।
जोवरी वाहतो नाकातून श्वास। तोवरी प्रयास पूजनाचा।।
शिवैक्य झाल्यावर हाती लिंग। घेऊनि अभंग जाणे आहे।।
शेष म्हणे अशी आमरण लिंग-। पूजा यथासांग करावी हो।।

१०५ (११)

शिवपूजकाने जगती प्रसिद्ध। तीर्थस्थाने सिद्ध पाहावी की।।
श्रीकाशी श्रीशैल वीरशैव पीठे। साठवावी निष्ठे निज नेत्री।।
वैद्यनाथ, विश्वनाथ, रामेश्वर। नाग-घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगे।।
तीर्थस्थळी इष्टलिंगपूजा-जप। करिता अमाप फळ मिळे।।
शिवयात्रेचा तो करावा सोहळा। न्याहाळावी डोळा देशस्थिती।।
यात्रा करिताना सृष्टिसौंदर्याने। फेडावे पारणे डोळियांचे।।
शिवयात्रेसाठी जाती जे जे जन। त्यांना अन्नदान करावे हो।।
अहिंसेसारखे तप नाही आन। अन्नोदकासम दान नाही।।
शिवाचारयुक्त गृही कन्या द्यावी। तशीच करावी कुलवान।।
शेष म्हणे असे धर्माचारयुक्त। प्रमादरहित वर्तावे हो।।

## १०. उभयस्थल

१०६ (१)

घडे करिताना गुरूचे पूजन। शिवाचे पूजन सहजचि।।
गुरू आणि शिव मुळी नसे भिन्न। मूलत: अभिन्न एकरूप।।
कापराच्या वड्या दिसती साकार। पण निराकार सुगंध तो।।
कापूर जाळिता उडूनिया जातो। मागे दरवळतो परिमळ।।

तसा निराकार शिव गुरुरूप। घेऊनि समीप आला आहे।।
पातळ असो की असो थिजलेले। तूपच भरले दोन्ही रूपी।।
तसा शिव आणि गुरू एक आहे। फक्त दिसताहे भिन्न रूपे।।
शेष म्हणे शिव अव्यक्त निर्गुण। व्यक्त तो सगुण गुरुरूपे।।

१०७ (२)

भक्तांवरी अनुग्रह करावया। शिव ये जगी या गुरुरूपे।।
शिव बोलेनाच भेटेनाही कधी। गुरू खांदोखांदी बिलगतो।।
संकटकाळात करितो सांत्वन। करी समाधान कुशंकांचे।।
संसाराच्या वाटेवरती जो चाले। त्याचे डोळे ओले होती कधी।।
दुःखावर घाली श्रीगुरू फुंकर। डोळ्यांतले नीर पुसे हळू।।
जन्म नि मृत्यूचा मांडूनि हिशेब। दाखवी कसब अभ्यासाचे।।
ज्ञानाने ज्या तरे संसारसागर। तेचि वारंवार उपदेशी।।
असा परमार्थ-मार्गोपदेशक। श्रीगुरूच एक शेष म्हणे।।

१०८ (३)

श्रीगुरूच्या कृपाकटाक्षेकरून। शिवतत्त्व-ज्ञान त्वरे होते।।
जन्म नि मृत्यूने पीडले जे जीव। त्यांना वंदनीय वाटे गुरू।।
रागद्वेषमुक्त ज्ञानाचा सागर। त्याला निरंतर तोषवावे।।
तनाने मनाने झिजावे भक्ताने। सर्वप्रकाराने सुख द्यावे।।
सांभाळावे पूर्ण श्रीगुरूचे मन। आज्ञेचे लंघन करू नये।।
देवयात्रा, तीर्थयात्रा, गुरुयात्रा। यांत गुरुयात्रा श्रेष्ठ असे।।
होई विचारांचे आदानप्रदान। मनीचे अज्ञान नाशे पूर्ण।।
सूर्य नि अग्नीस अंशतः सेवावे। पण सर्वभावे श्रीगुरूशी।।
शेष म्हणे शिव गुरू एकभावे। मानूनि वर्तावे शिवभक्ते।।



## ११. त्रिविधसंपत्तिस्थल

१०९ (१)

शिव आणि गुरू एकरूप जसे। जंगमाला तसे मानावे हो।।
गुरू, लिंग आणि जंगमरूपात। तोच उमाकांत प्रकाशतो।।
शिवगुरूसम जंगमी अभेद। मानिलासे सिद्धपुरुषांनी।।
शिव देई जीवा ऐश्वर्य नि भुक्ती। त्यास देती मुक्ती जंगम, गुरू।।
शिव गुरुरूपे लिंगदीक्षा देई। तोच लिंग होई आराध्य ते।।
होऊनि जंगम तोच देई ज्ञान। म्हणूनि समान तिन्ही रूपे।।
बिल्वदलामध्ये तीन पाने पण। एकच आपण गणितो हो।।
तसे गुरु-लिंग-जंगमांत ऐक्य। जाणावे सम्यक् वीरशैवे।।
शेष म्हणे हीच संपत्ती त्रिविध। त्यातील अभेद जाणूनि घ्या।।

११० (२)

अजंगम आणि जंगम हे दोन। लिंगामध्ये जाण भेद होती।।
स्थिरलिंगाप्रती अजंगम नाव। जंगमास नाव चरलिंग।।
स्थावराविषयी जशी असे भक्ती। जंगमावरती तशी करा।।
चालते बोलते जंगम हे लिंग। त्यामध्ये अभंग शिव वसे।।
जंगम हे श्रेष्ठ स्थिर लिंगाहून। 'शिवयोगी' नाम ख्यात त्याचे।।
जंगमलिंग तो असे शिवयोगी। म्हणूनि तो जगी सर्ववंद्य।।
जंगमाला तुष्ट करी जो भक्तीने। त्याला काय उणे? शेष म्हणे।।

१११ (३)

शिवयोग्याप्रती केले थोडे दान। तरी ते अक्षुण्ण फल देई।।
म्हणूनि प्रयासे त्याला दान द्यावे। त्याचे तोषवावे सर्वांतर।।
अवचित वाटेवरी जरी भेटे। तरी त्यास मोठे स्वागतावे।।
त्याचा करू नये कधी अवमान। करिताच जाणे दुर्गतीला।।

शिवरूप त्याला सर्वदा मानणे। सेवकभावाने त्याला पूजा।।
गुरू, लिंग आणि जंगम त्रिमूर्ती। त्रिविध संपत्ती शेष म्हणे।।

□

## १२. चतुर्विधसारायस्थल

१२१ (१)

लिंगतीर्थ भक्तिपूर्वक घे भक्त। गुरु-जंगमतीर्थ घ्यावे तसे।।
कल्याणकारक जगी जे जे आहे। त्याहूनही आहे तीर्थ श्रेष्ठ।।
पवित्र वस्तूंत तीर्थच पवित्र। सेविताच मात्र प्राप्त सिद्धी।।
सर्व मांगल्याचा निधी पादोदक। दोष पाप देख जाळिते ते।।
परमानंदाचे देई ज्ञान तीर्थ। करी भवमुक्त शिवभक्ता।।
गुरुशिष्य-ऐक्य बोधिते सहज। अहम्‌चा आवाज थांबविते।।
गंगास्नाने मुक्ती मिळे आहे खरे। बुडण्याची बा रे भीती तेथे।।
नाही बुडवीत तरी देते मुक्ती। अशी आहे शक्ती तीर्थामध्ये।।
पाप शोषी आणि प्रकाशिते ज्ञान। टाकी उन्मळून भववृक्ष।।
शेष म्हणे नित्य सेविता निर्मल। हृदी बहरेल भक्तिवृक्ष।।

११३ (२)

फूलपान जे जे केले लिंगार्पण। करावे धारण शिरी भक्ते।।
शिवनिर्माल्याचा करिता स्वीकार। निर्मळ अंतर होय त्याचे।।
लिंगार्पित जल, नैवेद्य भक्ताने। अति आनंदाने स्वीकारावे।।
लिंगार्पित केल्याविण कधी अन्न। भक्ताने सेवन करू नये।।
वीरशैव नाही भोजन करीत। सेवितो सतत प्रसादान्न।।
प्रसादाचा कण जाऊ नये वाया। ताट धुवूनिया पाणी पितो।।
शेष म्हणे वीरशैवांचे वर्तन। जाणावे कारण मागील ते।।



११४ (३)

शिवार्पित अन्न झाले दोषहीन। निर्मल म्हणून निर्माल्य ते।।
शिवदीक्षेने जो निर्मल जहाला। त्याने निर्माल्याला स्वीकारावे।।
शिवभक्तिहीन, त्रिमलाने युक्त। त्यास न उचित निर्माल्य ते।।
गुरु-लिंग आणि जंगमप्रसाद। सेविता मोक्षद फळ लाभे।।
म्हणूनिया गुरू, लिंग नि जंगम। मानूनि समान पूजावे हो।।
त्यांचे प्रसादान्न नित्यचि भक्षावे। शितागणिक घ्यावे यज्ञफळ।।
त्रिमूर्ती नि त्यांचे तीर्थ नि प्रसाद। हेचि चतुर्विध सार आहे।।
शेष म्हणे सार समजूनि घ्यावे। आणिक वर्तावे एकनिष्ठ।।

□

## १३, १४, १५. सोपाधि-निरुपाधि-सहजदानस्थले

११५ (१)

गुरू, लिंग आणि जंगमांची भक्ती। भक्ते यथाशक्ती करूनिया।।
तीर्थ नि प्रसाद सेवूनिया, दान। करूनिया मन तोषवावे।।
सोपाधिक नामे दान ते पहिले। दुजे दान भले निरुपाधिक।।
सहजदान हे तिसरे, दानांत। श्रेष्ठ असे ख्यात जगती या।।
फळाची अपेक्षा ठेवूनि जे केले। तेचि म्हणविले सोपाधिक।।
फळाची अपेक्षा नच बाळगता। दान देतो दाता निरुपाधिक।।
घेणारा, देणारा आणि दानद्रव्य। शिवरूप सर्व मानूनिया।।
अकर्तृत्वभावे केले जाते दान। ते सहजदान वाखाणिले।।
दाता नि याचक, वस्तू काही नुरे। शिवरूपी विरे सर्व काही।।
शेष म्हणे हेचि दानांत उत्तम। ज्ञान दे, नाशून भवरोग।।

११६ (२)

शिवालागी आणि शिवभक्तांसही। भक्तीने जे काही अर्पिले ते।।
तेही सहजदान संतांनी मानिले। भक्ताची पाउले वंदनीय।।
सत्पात्रा सहस्र मुद्रिका सुवर्ण। देता लाभे पुण्य जेवढे ते।।
तेवढेच शिवा फूल सुगंधित। वाहताच प्राप्त होय भक्ता।।
शंकर केवळ भावाचा भुकेला। असा देव भोळा शेष म्हणे।।

११७ (३)

सर्व विद्यानिधी आणि जगद्गुरू। एक तो ईश्वरू श्रुती सांगे।।
त्याला दान देता थोडे नि बहुत। होय ते अनंत फलप्रद।।
शिवयोग्यासम सत्पात्रचि नाही। अशी देती ग्वाही शास्त्रे सर्व।।
शिवयोग्या दिले घासभर अन्न। तेणे यज्ञपुण्य कोटी लाभे।।
शिवयोगी तृप्त होता शिव तृप्त। शिव होता तृप्त चराचर।।
श्रीगुरूला तन, लिंगा अर्पी प्राण। जंगमास धन तोचि भक्त।।
शेष म्हणे असे दानमहिमान। भक्तांनी जाणून पूर्ण घ्यावे।।

**अंगस्थलांतर्गत भक्तस्थल संपूर्ण**



# अंगस्थलांतर्गत माहेश्वरस्थल

## १६. माहेश्वरप्रशंसास्थल

११८ (१)

ब्रह्मादी पदांच्या आकांक्षेपासून। मुक्त जो संपूर्ण शिवनिष्ठ।।
असा भक्तस्थलामधील जो भक्त। सहजदानात पक्व होतो।।
तोच शिवभक्त होतो माहेश्वर। शिवभक्ती स्थिर त्याच्याठायी।।
शिव एकमेव देवांचाही देव। असा दृढ भाव मनी नांदे।।
शिवाविण अन्य कोणा मानीनाच। माहेश्वर तोच शेष म्हणे।।

११९ (२)

निष्ठाभक्ती त्याच्या अंतरात वसे। जाणतचि नसे शिवाविण।।
स्वातीतला थेंब शिंपल्यात पडे। मोती तेव्हा घडे तेज:पुंज।।
मोती न घे पुन्हा उदकाचे रूप। तशी दृढ खूप निष्ठाभक्ती।।
खंडित न होय जशी तैलधार। वृत्तीत शंकर व्यापे तसा।।
वैराग्य मनात मांडे दृढ ठाण। विवेकी तो जाण माहेश्वर।।
शेष म्हणे अशा माहेश्वराप्रत। वंदावे सतत साधकाने।।

१२० (३)

ब्रह्मादी देवांचे ऐश्वर्य भंगुर। मानी माहेश्वर तृणप्राय।।
निरिच्छ शब्दादी विषयसुखात। सदा उत्कंठित शिवानंदी।।
परस्त्रीसंग नि परद्रव्यातून। मुक्त परिपूर्ण माहेश्वर।।
शिवकार्यामध्ये मग्न सदोदित। रत अभ्यासात आगमांच्या।।
शिवस्तुतिरसास्वादाने मुदित। करी संग्रहित शैवग्रंथ।।
शेष म्हणे असा वीरमाहेश्वर। वंदा वारंवार जीवनात।।

१२१ (४)

पंचक्लेशांतून मुक्त तो सर्वदा। ज्ञाननभी सदा भ्रमे मुक्त।।
अहंममत्वाच्या जाई न वाटेला। मदमत्सराला थारा न दे।।
काम नि क्रोधाचे मोडिलेच ठाणे। स्वानंदात जिणे मन:पूत।।
रोधी शिवकार्य त्याच्या पाठी लागे। नि:पातचि वेगे करी त्याचा।।
शिवभक्तांच्या तो रमे मेळाव्यात। साहेना किंचित शिवनिंदा।।
शिवासाठी करी वेगे प्राणार्पण। असा वीर पूर्ण माहेश्वर।।
शेष म्हणे अशा शूरांनी रक्षिली। पूर्ण उजळिली शिवभक्ती।।

## १७. लिंगनिष्ठास्थल

१२२ (१)

प्राणावरती संकट। आले तरी मानी इष्ट।।
परि नव्हे लिंगत्याग। डुबो मग सारे जग।।
नाश संपत्तीचा होवो। किंवा शिरच्छेद होवो।।
तरी लिंगपूजाव्रत। नाही त्यागणे निश्चित।।
शेष म्हणे महाशूर। लिंगनिष्ठ माहेश्वर।।

१२३ (२)

लिंगपूजा केल्याविण। मुखी नाही अन्नकण।।
मोक्षलक्ष्मी त्यांच्या हाती। वास करिते निश्चिती।।
स्वर्गफलाशा त्यागून। इष्टलिंगात तो लीन।।
शेष म्हणे माहेश्वर। भूरुद्रचि खरोखर।।

१२४ (३)

लिंगध्यानी रमे मन। वाणी स्तुतीत निमग्न।।



लिंगपूजेमध्ये हस्त। सदासर्वदा ते व्यस्त।।
अशी ज्याची त्रिकरणे। लिंगमय सर्व जिणे।।
त्यास होणे शिवप्राप्ती। वेदागम ग्वाही देती।।
स्वर्गलाभ होय जेणे। कधी करीना ती कर्मे।।
लिंगनिष्ठ माहेश्वर। प्रशंसिती सुरवर।।
शेष म्हणे त्याच्यापुढे। मौन वेदांसही पडे।।

## १८. पूर्वाश्रयनिरसनस्थल

१२५ (१)

लिंगपूजानिष्ठ वीरमाहेश्वरे। पूर्वाचार सारे त्यागावेच।।
लिंगाचरणाशी जे जे प्रतिकूल। प्राकृत सकळ आचरण।।
लिंगदीक्षेआधी असेल ब्राह्मण। कोणती वा अन्य जात त्याची।।
जातीमधील त्या कर्मे सूतकादी। आचाराविरोधी पाळू नये।।
माहेश्वरा नाही सूतक अशौच। अशी साक्ष साच आगमांची।।
म्हणूनि तो पूर्वाश्रयनिरासक। माहेश्वर एक शेष म्हणे।।

१२६ (२)

शिवदीक्षेमुळे जळाले किल्मिष। जहाले मानस परिशुद्ध।।
त्याने करू नये कधी संध्या-श्राद्ध। आचाराविरुद्ध म्हणूनिया।।
विशुद्ध, प्राकृत भेद मानवांत। शिवसंस्कारित 'विशुद्ध' ते।।
ज्याला नसे मुळी संस्काराचा स्पर्श। 'प्राकृत' माणूस जाणावा तो।।
भाळी नाही भस्म लिंग नाही गळा। गर्भातून आला जसा तसा।।
आहार नि निद्रा मैथुनच सार। त्यात वारंवार डुंबतो तो।।

रमेनाच अशा प्राकृताचारात। माहेश्वर सत्य शेष म्हणे।।

१२७ (३)

काष्ठे जाळता अग्नीत। होती अग्निरूप फक्त।।
त्यांच्यातला भेद कोण। सांगू शकेल विद्वान?।।
आंबा, चंदन, बाभूळ। कोण विस्तवा म्हणेल?।।
तशी शिवसंस्कारे। जात पूर्वील न उरे।।
निरसूनि पूर्वजात। उरे वीरशैव फक्त।।
शेष म्हणे शिवभक्त। त्याने मानू नये जात।।

## १९. सर्वाद्वैतनिरसनस्थल

१२८ (१)

जीव असे सत्य शिवाचाच अंश। परि प्रत्ययास जीवा न ये।।
जीव शिव एक होती ऐक्यस्थली। तोवरी वेगळी दोन तत्त्वे।।
साधनाप्रारंभी जीव नि शिवात। माहेश्वरे द्वैत मानावेच।।
शिव पूज्य आणि जीव हा पूजक। शिव हा प्रेरक, जीव प्रेर्य।।
शिव हा उपास्य, जीव उपासक। संबंध हा देख शिव-जीवी।।
द्वैतामुळेचि हा संबंध शोभतो। म्हणूनि तो होतो द्वैतनिष्ठ।।
म्हणूनि अद्वैतनिरासक व्हावे। माहेश्वरे जिवे शेष म्हणे।।

१२९ (२)

शिव त्रैलोक्याचा पती। जीव त्याचा आश्रित।।
स्वामि-सेवक संबंध। असे शिवजीवात।।
साधनेच्या अंत्यक्षणी। लाभे सिद्धी अद्वैत।।



मात्र तोवरी जीवास। लागे मानावे द्वैत।।
लिंगपूजादी कर्मांना। असे कारण द्वैत।।
भेदामुळेच घडती। पूजाकर्मे समस्त।।
शेष म्हणे माहेश्वरे। व्हावे द्वैती आसक्त।।

१३० (३)

साधनाप्रारंभी 'मीच आहे शिव'। असे बोले जीव जरी कोणी।।
तरी त्याचा गर्व वृथा जाण बापा। इतुका न सोपा भक्तिमार्ग।।
नुसत्या बोलाने जरी शिव झाला। तरी साधनेला अर्थ नाही।।
कशासाठी जपतपादी साधने?। आयुष्य वेचणे मोक्षासाठी?।।
बोलूनि केवळ शिव होणे नाही। अशी देती ग्वाही वेदागम।।
म्हणूनिया शिव आणिक जीवात। साधकाने द्वैत मानावेच।।
साधना होईल जेव्हा पूर्ण पक्व। तेव्हा घडे ऐक्य शिव-जीवी।।
शेष म्हणे माहेश्वराने अद्वैत-। निरासक सत्य व्हावे बापा।।

## २०. आह्वाननिरसनस्थल

१३१ (१)

शिवालागी करू नये आवाहन। लिंगाचे पूजन करिताना।।
दीक्षासमयीच गुरूने लिंगात। शिवास स्थापित केले असे।।
शिवकलायुक्त दिले इष्टलिंग। तैपासूनि अभंग लिंगी शिव।।
इष्टलिंगी नित्य राहे शिव त्याला। 'ये रे' हे कशाला बोलाविणे?।।
लिंगपूजेवेळी केले आवाहन। तरी ते वर्तन विसंगत।।
आवाहन आणि विसर्जन हेही। करू नये काही शेष म्हणे।।

## २१. अष्टमूर्तिनिरसनस्थल

१३२ (१)

माहेश्वरा मुळी अमान्य सगळे। शिवजीवातले अद्वैत ते।।
तैसे पृथ्वी आदी अष्टमूर्तीही। शिवापासून ही भिन्न मानी।।
पृथ्वी आप तेज वायू नभ श्रेष्ठ। चंद्र आत्मा अष्टमूर्ती जाणा।।
अष्ट शिवरूपे पूजिती भाविक। माहेश्वर एक निषेधितो।।
पूज्य नि पूजकभावास विरोधी। म्हणूनि निषेधी माहेश्वर।।
कुंभार निर्मितो घट मृत्तिकेचे। घटनिर्मितीचे कारण तो।।
अष्टमूर्ती कार्य शिव हे कारण। म्हणूनि ते भिन्न मानावे हो।।
पूजेसाठी शिव आणि जीव यांत। भेदचि उचित शेष म्हणे।।

## २२. सर्वगतनिरसनस्थल

१३३ (१)

‘शिव सर्वव्यापी भावे। त्याला कोठेही पूजावे।।
पूजा कशाचीही केली। तरी शिवाला पोचली।।
मग लिंगपूजनाचे। प्रयोजन काय साचे?’।।
असे म्हणे जरी कोण। तरी मूर्ख तो महान।।
लिंगनिष्ठ भक्तासाठी। वसे लिंगी जगजेठी।।
जरी सर्वव्यापी आहे। तरी लिंगातचि राहे।।
शेष म्हणे त्याला फक्त। इष्ट पाहणे लिंगात।।

१३४ (२)

सर्वत्र व्यापक शिव जरी आहे। तरी लिंगी राहे विशेषत्वे।।
अग्नी विद्यमान सर्वही वृक्षांत। शमीवृक्षी व्यक्त अधिक तो।।



तसा महेश्वर सर्वत्र व्यापक। शास्त्रे सर्व एकमुखे गाती।।
तथापि तो गुरु-लिंग-जंगमांत। असे उपस्थित पूजेसाठी।।
म्हणूनिया माहेश्वरे स्थानी अन्य। शिवालागी जाण पाहू नये।।
इष्टलिंगरूपातचि पूजे शिव। तोचि वीरशैव शेष म्हणे।।

## २३. शिवजगन्मयस्थल

१३५ (१)

विश्वाचा चालक शिव जरी आहे। पूजावेळी राहे भक्ताधीन।।
इष्टलिंगी वसे प्रकाशस्वरूप। सर्वव्यापी रूप भाव ठेवा।।
मृत्तिकेपासून जसा घडा घडे। विश्व हे उघडे शिवातून।।
घट कार्य, माती घटाचे कारण। विश्वाचे कारण शिव तसा।।
कारणापासून कार्य नाही भिन्न। तसे एकपण शिव-जगी।।
लाटा, फेस नाही समुद्रावेगळे। शिवातून झाले जग तसे।।
तंतू आणि वस्त्र जसे एकरूप। जग शिवरूप शेष म्हणे।।

१३६ (२)

गुंडाळले वस्त्र ताणल्यानंतर। तंबूचा आकार धरी जसा।।
तसा शिव शक्तिविकास करून। पावे प्रसरण विश्वरूपी।।
दोरी अंधारात भासे सर्परूप। परि कधी साप नव्हती ती।।
तसा शिव निर्विकारच राहून। विश्वाशी अभिन्न दिसे डोळा।।
चराचर विश्व सर्व शिवमय। त्याच्याविण अन्य नाही काही।।
शेष म्हणे शिव इष्टलिंगातला। दिसे विश्व झाला साधनेने।।

१३७ (३)

लांबी, रंगामुळे दोरी। दिसे सर्पाकार खरी।।

शुभ्र वर्णामुळे शिंप। दिसे पूर्ण चांदीरूप।।
वृक्षबुंधा आकाराने। दिसे माणसाप्रमाणे।।
वाळवंटी उन्हामुळे। भासे मृगजळ-तळे।।
वायू निर्मितो अंबरी। मेघ-गंधर्वनगरी।।
तसा सत्-चित्-सुखरूप। शिव दिसे विश्वरूप।।
शक्तिप्रतिस्फुरणाने। त्याला विश्वरूप होणे।।
सूक्ष्म बीजातून फुले। वृक्ष पर्णभारे डुले।।
सर्व आनंदाचा गाभा। शिव विश्वरूपे उभा।।
शेष म्हणे कणोकणी। त्याला पाहा क्षणोक्षणी।।

## २४. भक्तदेहिकलिंगस्थल

१३८ (१)

विश्वरूप जगदात्मा शंकर तो। सदैव राहतो भक्तांतरी।।
वसे कैलासात मंदराचलात। मेरुपर्वतात हिमालयी।।
परि जेथे भक्त डोलती कीर्तनी। तेथे शूळपाणी सदा उभा।।
भाळी भस्म गळा रुद्राक्षांच्या माळा। शिवनामसोहळा चाले जेथे।।
भजनाच्या छंदे डोलतो जो मोदे। शिवनामे स्फुंदे अधेमधे।।
त्याचठायी शिव नांदे भक्तसखा। ऐके प्रेमे हाका लाडक्यांच्या।।
शेष म्हणे शिव सर्वठायी आहे। विशेषे तो राहे भक्तांतरी।।

१३९ (२)

देव दानव नि नर। यांच्या शरीरात स्थिर।।
प्रतिबिंबरूपे राहे। परिच्छिन्न भासताहे।।
लिंगरूप तुझे रुद्र। नाशी पातके अभद्र।।



असे श्रुतीच सांगते। ब्रह्म हृदयी नांदते।।
चरमूर्ती, शुकदेव। यांच्या अंतर्यामी शिव।।
भस्मरुद्राक्षधारक। त्याच्या हृदी शिव एक।।
भक्ती नाही अंतरात। त्यांना जाणवेना फक्त।।
शुद्ध दर्पणासमान। ज्याचे हृदय संपूर्ण।।
त्याच्या अंत:करणात। शिव स्पष्ट प्रकाशित।।
शेष म्हणे असा भक्त। जाई प्रसादिस्थलात।।

**अंगस्थलांतर्गत माहेश्वरस्थल संपूर्ण**

# अंगस्थलांतर्गत प्रसादिस्थल

## २५. प्रसादमाहात्म्यस्थल

१४० (१)

लिंगस्थलज्ञानामुळे। ज्याचे किल्मिष जळाले।।
आणि राहे प्रसन्नता। ज्याच्या व्यापूनिया चित्ता।।
असा माहेश्वर सत्य। जाई प्रसादिस्थलात।।
मनाचे जे निर्मलपण। त्याला 'प्रसाद' हे नाम।।
शिवप्रसादाने सिद्ध। होय निर्मलप्रसाद।।
शेष म्हणे शिवभक्ते। व्हावे प्रसादी पुरते।।

१४१ (२)

भक्त जो पदार्थ शिवास अर्पितो। प्रसादरूप तो होय जाणा।।
मनाच्या निर्मलपणास कारण। प्रसादसेवन हेच आहे।।
शिवास अर्पिले जे जे काही भक्ते। शिवनिर्माल्य ते नाव त्याला।।
शिवनिर्माल्याचे करिता ग्रहण। होई शिवज्ञान शेष म्हणे।।

१४२ (३)

अन्नातील मोठा ममत्व हा दोष। 'माझे माझे' घोष नर करी।।
अन्न शिवार्पित करिता तो नुरे। मग फक्त उरे प्रसाद तो।।
अर्पित्याचे सरे स्वामित्व अवघे। देता म्हणे 'घे घे प्रसाद हा'।।
'माझे माझे' असे म्हणेना तो तेव्हा। शिवप्रसाद हा म्हणे 'घ्या घ्या'।।
ममत्वाचा दोष जाई अन्नातून। होई ते शुद्धान्न परिपूर्ण।।
अशा शुद्धान्नाचे सेवन करिता। पूर्ण प्रसन्नता मनी नांदे।।
उजळे प्रसन्न मनी शिवज्ञान। असे महिमान शेष म्हणे।।



१४३ (४)

उपभोगासाठी संपादिले काही। शिवाला सर्वही समर्पावे।।
मग सुखे त्याचा घ्यावा उपभोग। चित्तशुद्धी मग होय बापा।।
शिव भवरोगनिवारक वैद्य। प्रसाद हे शुद्ध रसायन।।
सेविता औषध जन्ममृत्युरोग। नाशूनि सवेग मुक्ती लाभे।।
त्रिमल त्रिताप नाशती हे दोष। विद्येचा विकास पूर्ण होई।।
आरोग्य वैराग्य वाढे परिपूर्ण। संकटमोचन होय पूर्ण।।
अज्ञान उच्छेदे खुले ज्ञानद्वार। असा चमत्कार शेष म्हणे।।

१४४ (५)

शिवप्रसादाचा सांडू नये कण। असे अवधान ठेवावे हो।।
प्रसादिस्थलात अवधानभक्ती। प्रकाशते चित्ती भक्तांचिया।।
ब्रह्माविष्णु देव वसिष्ठांनी जाण। शिवप्रसादान्न स्वीकारिले।।
पातकी लोकांना प्रसाद दुर्लभ। सहज सुलभ पुण्यात्म्यांना।।
पान फूल जळ करी शिवार्पित। सेविता त्वरित पापमुक्ती।।
शिवासम गुरुजंगमप्रसाद। घ्यावा त्याचा स्वाद शेष म्हणे।।

## २६. गुरुमाहात्म्यस्थल

१४५ (१)

भोगमोक्षसिद्धी करूनि दे प्राप्त। श्रीगुरू साक्षात् शिवरूप।।
प्रत्यक्ष शिवचि गुरुरूपे आला। उद्धरावयाला निजभक्ता।।
निष्कल निर्गुण ज्ञानाचा सागर। शिवचि ये भूवर गुरुरूपे।।
गुरू हाच शिव शिव हाच गुरू। त्यांच्यामध्ये करू नये भेद।।
ज्याला लागलीसे ज्ञानाची तहान। त्याने दोघा भिन्न मानू नये।।

शेष म्हणे शिव गुरू एकचि ते। मानावे पुरते शिष्यवरे।।

१४६ (२)

दिसे मनुष्यासमान। तरी गुरू न सामान्य।।
जरी मानी साधारण। गुरूचा तो अवमान।।
मानी राहे तो वंचित। त्यास नव्हे श्रेय प्राप्त।।
ज्याला भोग मोक्ष हवा। त्याने श्रीगुरू पुजावा।।
केली नाही गुरुभक्ती। घडेचिना शिवभक्ती।।
शेष म्हणे गुरुलागी। माना शिवासम जगी।।

## २७. लिंगमाहात्म्यस्थल

१४७ (१)

गुरुमहिमेचे ज्ञान होता पूर्ण। दृढ होता ज्ञान स्वरूपाचे।।
तेणे लिंगाचेही महिमान कळे। अंतरी उजळे पूर्ण बोध।।
शांकरलिंग ते चिन्मय शिवाचे। देव नि विश्वाचे मूळ असे।।
गुरूच केवळ देतो लिंगज्ञान। म्हणूनि शरण त्यास जावे।।
शेष म्हणे असा श्रेष्ठ असे गुरू। भवाब्धीचे तारू तोच असे।।

१४८ (२)

लिंग हेचि श्रेष्ठ पवित्र दैवत। त्रिमलरहित ब्रह्मरूप।।
सनातन आणि चैतन्यस्वरूप। आनंदाचे रूप शिव तोच।।
सर्वतत्त्वपूर्ण ज्योतिर्मय असे। योगियांच्या वसे हृदयांत।।
त्रैलोक्य-वेदांचे असे तेचि मूळ। प्रमाणा सकळ आकळेना।।
भवाब्धितारक असे लिंग पूर्ण। गुरुकृपेविण कोण जाणे?।।
शेष म्हणे महागुरुकृपेमुळे। लिंगतत्त्व कळे परिपूर्ण।।



१४९ (३)

वराहाचे रूप घेऊनि प्रबळ। सप्तही पाताळ विष्णू धुंडी।।
ब्रह्मदेवे हंसरूपे अंतराळ। अनंत ते काळ शोधिले हो।।
तरी त्यांना ज्योतिर्लिंगाचे दर्शन। घडेना प्रयत्न केले किती।।
मग जे सामान्य भाविक केवळ। तयांना घडेल कसे सांगा।।
शेष म्हणे पाशमुक्त योगिलोक। ज्यात होती ऐक्य तेच लिंग।।

१५० (४)

क्रियाशक्ती पीठ, चिद्रूप शिव लिंग। शिवशक्तिसंयोग हेच विश्व।।
लिंग परब्रह्म, शक्ती ही शाळुंका। चराचर देखा निर्मिती ही।।
शिव-शक्तीची ही विश्व कलाकृती। सर्व मिळूनि ती एकरूप।।
देव-ऋषींनीही पूजिले लिंगाला। त्यामुळे मिळाला अधिकार।।
लिंगरूप शिव विश्वाचा नियंता। तयाशी तुळिता नये कोणा।।
चराचराचा तो स्वत: नियामक। शिव असे एक शेष म्हणे।।

## २८. जंगममाहात्म्यस्थल

१५१ (१)

गुरूपदेशाने शिष्यमनी होते। लिंगमाहात्म्य ते वृद्धिंगत।।
लिंगमाहात्म्याच्या संपदेहूनही। श्रेष्ठ अधिकही जंगम तो।।
विश्व शिवशक्तिमय पूर्ण असे। हे तो जाणतसे म्हणूनिया।।
शिव करी सर्व विश्व प्रकाशित। शिवा आत्मवत् मानितो तो।।
विश्व चिद्रूप हे, शिवयोगामुळे। जाणूनि तो डोले आत्मानंदी।।
शेष म्हणे असा जंगम दृष्टीस। पडता पदांस वंदावे हो।।

१५२ (२)

भवांध:कार जे पूर्ण करी दूर। ते शिवज्ञान स्थिर ज्याच्याठायी।।
काम नि क्रोधाची कंबर मोडिली। ज्याने भेदियली मोहग्रंथी।।
माती सोने पाही समान दृष्टीने। शत्रू मित्र माने सारखेचि।।
शिवसाक्षात्कारी, अहंकारशून्य। करितो वर्तन प्रत्येकाशी।।
नि:स्पृह होऊन विचरे भूवर। तोच तो साचार शिवयोगी।।
शेष म्हणे असा दिसता जंगम। घ्यावी ती प्रथम पायधूळ।।

१५३ (३)

दुर्लभ अत्यंत शिवज्ञान-ध्यान। ज्यास साधे पूर्ण धन्यचि तो।।
तोच शिवयोगी साक्षात् शंकर। विचरे भूवर भक्तोद्धारा।।
त्याची पडे थोडी जेथे पायधूळ। होय पुण्यस्थळ गृहचि ते।।
त्याच्या दर्शनाने सर्व सिद्धी प्राप्त। स्पर्शे भस्मसात पापे होती।।
त्याचे जो पूजन करी प्रेमयुक्त। मोक्ष ये हातात पूर्ण त्याच्या।।
राहे सन्निध जो त्यास न मिळे ते। फळ ते कोणते? शेष म्हणे।।

## २९. भक्तमाहात्म्यस्थल

१५४ (१)

गुरू, लिंग आणि जंगममहती। जाणूनिया भक्ती करी भक्त।।
तेणे सिद्ध होई भक्तमहिमान। प्रशंसिती पूर्ण शास्त्रे त्याला।।
भक्त उपासिती महत्त्व म्हणून। त्रिमूर्तीलागून प्राप्त होय।।
भक्त अर्चिताती शिवाला म्हणून। त्याला देवपण लाभले हो।।
कायेने पूजन, मने शिवध्यान। वाचेने स्तवन करिती ते।।
भक्तच नसेल तर देवालागी। कोण पुसे जगी? शेष म्हणे।।



१५५ (२)

संसाराचा नाश करी शिवभक्ती। जगी दुर्लभ ती खरोखर।।
ज्याच्या मनी वसे तोच शिवभक्त। वंदितो साक्षात् शिव त्याला।।
केला वेदाभ्यास शास्त्रेही शिकली। यज्ञव्रते केली तपश्चर्या।।
पण घडेनाच जर शिवभक्ती। तरी सर्वही ती फोल जाणा।।
शिवभक्तिहीन व्यर्थ ते जीवन। जन्ममृत्युरुग्ण जाणावा तो।।
शिवभक्तिशून्य जीवन सकळ। जाणावे निष्फळ शेष म्हणे।।

१५६ (३)

शिवभक्तिविण दक्षे यज्ञ केला। विफल जहाला जाणे जग।।
पातकी कितीही असो, शिवभक्ती। करिताच मुक्ती पापांतून।।
चंड भक्ताने त्या पितृघात केला। भक्तीने जहाला शिवरूप।।
शिवभक्ता पुण्यपापे नसती ती। अभक्त बुडती कर्मपंकी।।
कर्मानुसार तो भोगी सुखदु:खे। दृष्टीस न देखे मोक्षमार्ग।।
सूर्य-अश्वाला न अंधाराची भीती। तसे भक्ताप्रती कर्मभय।।
शेष म्हणे सर्व कर्मबंधांतून। मुक्त होय पूर्ण शिवभक्त।।

१५७ (४)

शिवभक्तिहीन जन्मजन्मांतर। भ्रमे निरंतर चौऱ्यांशीत।।
घाण्यास जुंपला फिरे जसा बैल। घाली सर्वकाळ प्रदक्षिणा।।
तसा स्त्रीपुत्रादी आणि मालमत्ता। कर्दमी पुरता गुंतला तो।।
पाखडे क्षणिक सुखासाठी जीव। हृदयात शिव जाणेना तो।।
कर्मपंकी गुंते मंडुकासारखा। जहाला पारखा भक्तिसुखा।।
शेष म्हणे अशा अभक्तास वेढा। कर्माचा तो गाढा पडे नित्य।।

१५८ (५)

कमलतंतूची शृंखला उन्मत्त। नच हत्तीप्रत बांधू शके।।
तसे रोधण्यास शिवभक्ताप्रती। कर्मबंधा शक्ती नसे कदा।।
क्षत्रिय, अंत्यज असो वा ब्राह्मण। शिवभक्त मान्य शिवासम।।
काष्ठे अग्नीमाजी होती अग्निरूप। त्यांचे भिन्न रूप सांगता न ये।।
तशी शिवभक्ती नांदे ज्या मनात। त्याची कधी जात पाहू नये।।
शिवदीक्षेने जे जहाले पावन। सदा शिवार्चन करिती जे।।
शिवभक्त तेचि जाणा गणेश्वर। वंदा वारंवार शेष म्हणे।।

## ३०. शरणमाहात्म्यस्थल

१५९ (१)

शिवचि आपुला रक्षक संपूर्ण। जाणून शरण शिवा जातो।।
अनन्यभावाने शरण जो गेला। शरण तो झाला भक्त जाणा।।
ब्रह्मादी देवांचे प्राकृत वैभव। त्यागूनि तो शिव आश्रयितो।।
मस्तकी चंद्रास करी जो धारण। रक्षितो संपूर्ण जीवमात्र।।
अनन्यशरण जाई शिवाप्रत। तो शरणागत भक्त जाणा।।
ब्रह्माविष्णुपदांविषयी विरक्त। भोगासक्ती-मुक्त जहाला जो।।
शिवालाच मोक्ष सर्वदा मागतो। जाणावा भक्त तो शरणार्थी।।
शरण, शरणागत, शरणार्थी। भक्त-मन:स्थिती शेष म्हणे।।

१६० (२)

मन-वाणी-काया-कर्मांनी जे भक्त। पूर्ण शरणागत शिवा गेले।।
त्यांना नाही यज्ञयागादी कर्मांचे। देव-तर्पणाचे प्रयोजन।।
यज्ञे जाणे जरी मिळे स्वर्गलोकी। येणे मृत्युलोकी पुण्यक्षये।।



परि शंकराला शरण जे गेले। त्यांना फळ मिळे अविनाश।।
शिवभक्तालागी फलास्तव अन्य। नाही प्रयोजन सत्कर्मांचे।।
एक शिवभक्ती जीवन व्यापिते। तीच ती पुरते शेष म्हणे।।

१६१ (३)

शिवकल्पतरूसम। पुरवितो भक्तकाम।।
मिळेनाच भक्तालागी। असे काय असे जगी?।।
पश्चात्तापे मन पोळे। त्याचे मालिन्यच गळे।।
शिवा जाऊनि शरण। चित्त जहाले प्रसन्न।।
त्याचा जन्म खरा जन्म। व्यर्थ अन्याचे जनन।।
नरदेही जन्मा आला। परि जाणेना शिवाला।।
असा जन्म निरर्थक। नाही झालेच सार्थक।।
अंतर्बाह्य ज्याचे मन। झाले लिंगातच लीन।।
शेष म्हणे त्याचे धन्य। कूळ आणिक जीवन।।

## ३१. शिवप्रसादमाहात्म्यस्थल

१६२ (१)

गुरुलिंगादीचे माहात्म्य आकळे। विशेष तो मिळे स्वानुभव।।
शिवप्रसादाने होतसे तो प्राप्त। म्हणूनि महत्त्व प्रसादास।।
गुरुपूजारत लिंगनिष्ठ पूर्ण। त्यावरी प्रसन्न महेश्वर।।
प्रसादाने होई भवताप दूर। दुर्लभ तो फार अभक्ताला।।
यज्ञ, तप, मंत्रजप, ज्ञानार्जन। प्रसादालागून करिताती।।
प्रसादापासून वंचित राहती। त्यांना दूर मुक्ती शेष म्हणे।।

१६३ (२)

अव्यभिचारिणी भक्तीचे ते मूळ। असे तो केवळ प्रसादचि।।
शिवाचा प्रसाद प्राप्त नाही ज्याला। दुर्घटचि त्याला भक्तिमार्ग।।
असो गर्भस्थ वा जन्मास आलेला। किंवा जन्मलेला, विप्र, शूद्र।।
त्याच्यावर होता शिवाचा प्रसाद। तत्काळ तो पद मोक्ष पावे।।
ब्रह्मा-विष्णु देव निजपदांवर। असती ते स्थिर प्रसादाने।।
शेष म्हणे सर्व सिद्धी अनुकूल। तयांना तत्काळ प्रसादाने।।

१६४ (३)

परमानंदाचे कारण। शिवप्रसाद हा जाण।।
होता प्रसाद तो प्राप्त। शिव दिसे त्रैलोक्यात।।
जीव भवचक्री फिरे। त्यास कर्म कारण ठरे।।
शिवप्रसादाच्या विना। भवचक्र हे थांबेना।।
शिवप्रसादासमान। जगी काहीच न अन्य।।
शिवप्रसादाने भक्त। लीन होय समाधीत।।
शिवभावाने जो युक्त। होई कर्मांतून मुक्त।।
शेष म्हणे प्रसादी तो। प्राणलिंगिस्थली जातो।।

**अंगस्थलांतर्गत प्रसादिस्थल संपूर्ण**



# अंगस्थलांतर्गत प्राणलिंगिस्थल

## ३२. प्राणलिंगिस्थल

१६५ (१)

पूजादी कर्मांस देऊन प्राधान्य। शुद्ध आचरण करी भक्त।।
शुद्ध कर्मानेच होतो माहेश्वर। आणि तद्नंतर प्रसादी तो।।
प्रसादीस होता ज्ञानयोगप्राप्ती। त्यास संबोधिती प्राणलिंगी।।
चिदात्मक ब्रह्म हेच लिंगरूप। शक्ती प्राणरूप त्याची आहे।।
प्राणशक्तिरूप लिंगाचे यथार्थ। ज्ञान तोच होत प्राणलिंगी।।
प्राणलिंगिस्थली अनुभवभक्ती। देई अनुभूती शेष म्हणे।।

१६६ (२)

प्राणायामे प्राणवायूस खेचिता। जाई तो खालता नाभीकडे।।
प्राण-अपानाचे होतसे घर्षण। तेथेचि उत्पन्न होय ज्योत।।
सूर्यकिरणांत धुके विरघळे। तसा प्राण मिळे ज्योतीमध्ये।।
तेचि प्राणलिंग सांगताती सिद्ध। प्राणापानरोध करिती जे।।
करी ज्योतिर्मय लिंगाचे चिंतन। सदोदित मग्न त्यातच जो।।
तोच प्राणलिंगी साधक जाणावा। समजूनि घ्यावा शेष म्हणे।।

१६७ (३)

हृदयात ज्योतिरूपे प्रकाशते। शिवस्वरूप ते प्राणलिंग।।
त्यास दुर्लक्षून बाह्यलिंगाकडे। ज्यांचे मन ओढे विमूढ ते।।
बाह्यलिंगपूजेकडे ज्याची पाठ। तोच जाणा श्रेष्ठ प्राणलिंगी।।
अंत:स्थित प्राणलिंगाचे चिंतन। त्यातचि तो मग्न सर्वकाळ।।
मायागुणे विश्व जहाले उत्पन्न। तसेच ते जाण बाह्यलिंग।।

म्हणूनि चिद्रूप अशा प्राणलिंगी। साधे प्राणलिंगी मनोलय।।
शेष म्हणे ज्याची अंतर्यामी धाव। त्याला असे नाव प्राणलिंगी।।

१६८ (४)

जीवाच्या हृदयी 'मी आहे' ही स्फूर्ती। तीच प्राणशक्ती असे जाणा।।
प्राणशक्तियुक्त असे अहंबोध। प्राणलिंग सिद्ध तेचि आहे।।
'चैतन्यस्वरूप मी' अशी जी जाणीव। तिला असे नाव प्राणलिंग।।
अहंरूपी शिव सत्तारूपी शक्ती। यांची ऐक्यस्थिती कळे ज्याला।।
शेष म्हणे त्याला प्राणलिंगस्थली। म्हणती सगळी शिवशास्त्रे।।

## ३३. प्राणलिंगार्चनस्थल

१६९ (१)

प्राणलिंग हृद्‌कमली चिन्मय। श्रेष्ठ शिवमय वसे सदा।।
भक्तिभावपुष्पे करणे पूजन। प्राणलिंगार्चन हेचि जाणा।।
देही नवद्वारे रोधिता ती पूर्ण। उजळतो ज्ञानदीप हृदी।।
हृदयकमळी ज्ञानप्रकाशात। दिसे विराजित प्राणलिंग।।
अर्पूनि सद्‌भावफुले भक्तिभावे। सदा ते पूजावे शेष म्हणे।।

१७० (२)

प्राणलिंगा अभिषेक। क्षमा हेचि शुद्धोदक।।
नित्य-अनित्यविवेक। हेचि त्यास वस्त्र चोख।।
सत्य वाचा अलंकार। वैराग्यचि पुष्पहार।।
गंध समाधीची स्थिती। अक्षता या निरहंकृती।।
दृढ श्रद्धा हाच धूप। आत्मज्ञान दिव्य दीप।।



भ्रांतिनिवृत्ती नैवेद्य। मौन हाचि घंटानाद।।
विषयांचे समर्पण। हाचि तांबूल तो जाण।।
विषयभ्रमास त्यागणे। प्रदक्षिणा ही घालणे।।
बुद्धी होणे लिंगाकार। तोच जाणा नमस्कार।।
अशा भावपुष्पे नित्य। पूजा प्राणलिंगाप्रत।।
बाह्यलिंगपूजेहून। शेष म्हणे श्रेष्ठ जाण।।

## ३४. शिवयोगसमाधिस्थल

१७१ (१)

शिवजीव-सामरस्याचे चिंतन। संपत्ती ही जाण एक असे।।
शिवयोगसमाधी त्याच संपदेस। म्हणती पुरुष विवेकी ते।।
भावफुले प्राणलिंगास अर्पून। प्राणलिंगार्चन करी नित्य।।
त्याच्याठायी शिवयोगसमाधीही। दिसते प्रत्यही विद्यमान।।
प्राणलिंगपूजाक्रियेत तत्पर। समाधी ही स्थिर त्याच्याठायी।।
शेष म्हणे प्राणलिंगार्चक भक्त। लीन समाधीत सर्वकाळ।।

१७२ (२)

पृथ्वीपासूनिया शिवापर्यंत ती। छत्तीस असती तत्त्वे जाणा।।
छत्तीस तत्त्वांच्या असे जे अतीत। तेच प्रकाशत शिवब्रह्म।।
वाचेने वर्णिता कधी ते येईना। मना आतुडेना सायासेही।।
उमा चित्स्वरूप शक्तीने प्रकाशे। हंसरूप असे शिवतत्त्व।।
'तत्त्व ते मी आहे' अशा भावनेने। तादात्म्यरूपाने चिंतन जे।।
तीच शिवयोगसमाधी जाणावी। पूर्ण आकळावी शेष म्हणे।।

१७३ (३)

शिव हेच 'लिंग' जीव हेच 'अंग'। त्यांच्यात लिंगांगसामरस्य।।
लिंग-अंगरूप शिव-जीव यांत। नांदते सतत सामरस्य।।
याचे चिंतन जो सर्वदा करितो। समाधिनिष्ठ तो शिवयोगी।।
प्राणलिंगार्चन करिता करिता। सहज ये हाता समाधी ही।।
शेष म्हणे ज्याच्याठायी ही समाधी। धन्य तपोनिधी पुरुष तो।।

१७४ (४)

स्थूलदेहाआत सूक्ष्मदेह एक। होता अंतर्मुख जाणवे तो।।
सूक्ष्मदेही सहा चक्रे सहा ठायी। वर्णिली सर्वही योगशास्त्री।।
समाधिनिष्ठ त्या शिवयोगियाने। चक्रांसी मनाने दृढ ध्यावे।।
गुदस्थानी असे आधार ते चक्र। तेथे दले चार जाणावी ती।।
लिंगस्थानी चक्र स्वाधिष्ठान पाहा। तेथे दले सहा ध्यावी सदा।।
नाभिस्थानी मणिपूर त्या चक्रात। दले विराजित दहा पाहा।।
हृदयस्थली ते चक्र अनाहत। तेथे विराजित दले बारा।।
विशुद्धिचक्र ते कंठस्थानी फुले। तेथे सोळा दले जाणावी ती।।
भ्रूमध्यस्थानात आज्ञाचक्र स्थिर। त्याठायी साचार दोन दले।।
मस्तकात चक्र असे सहस्रार। तेथे मनोहर सहस्रदले।।
मध्यावर रंध्र केशाग्रप्रमाण। कैलास ते स्थान योगी ध्याती।।
अशी षट्चक्रे जाणूनि करावे। तेथे दृढभावे शिवध्यान।।
शेष म्हणे शिवयोग्याचे चिंतन। 'सकल' ती जाण 'समाधी'च।।

१७५ (५)

बाह्य वस्तुसंस्काराने। विश्व भरे विकल्पाने।।
पदोपदी दिसे द्वैत। वेगवेगळे पदार्थ।।



पशू पक्षी नारी नर। भेद दिसती समोर।।
परि ज्यांना अंतर्दृष्टी। दिसे शिवरूप सृष्टी।।
शिवयोगी अंतर्मुख। भोगी आत्मानंदसुख।।
आत्मारूप अरणीत। घासे शिवानंद तेथ।।
मग ज्ञानाग्नी उजळे। त्यात जगज्जाल जळे।।
होता आत्मरूपज्ञान। जाई माया निरसून।।
शेष म्हणे ज्ञानियाने। असे उचित वागणे।।

१७६ (६)

पुण्यपाप कर्मे हीच ज्याची मुळे। संसार हा फुले विषवृक्ष।।
जन्ममृत्यू हेच संसाराचे रूप। पंचक्लेश खूप पर्णे त्याला।।
अविद्या, अस्मिता, राग आणि द्वेष। अभिनिवेश हे पंचक्लेश।।
पंचक्लेश नित्य छळिती जीवाला। भवदु:खे त्याला भोगविती।।
छेदाया हा विषवृक्ष मुळातून। घ्यावा शिवध्यान-परशु करी।।
दूर करावया संसाराचे तम। असे शिवध्यान सूर्यासम।।
शेष म्हणे भव मनातून जाता। मग येई हाता पूर्णानंद।।

## ३५. लिंगनिजस्थल

१७७ (१)

अंतरंगी स्थित लिंगरूप शिव। त्याचा अनुभव येई ज्याला।।
'मीच महालिंग' अशी अनुभूती। ज्याच्या पूर्ण चित्ती उचंबळे।।
तोच प्राणलिंगी लिंगनिजस्थली। अशी व्याख्या केली आगमांनी।।
ब्रह्मा विष्णु देव वेदविद्या सर्व। पावताती लय ज्याच्यामध्ये।।

पुन्हा ज्याच्यातून होती त्या उत्पन्न। तेच ब्रह्म पूर्ण लिंग असे।।
शेष म्हणे जो म्हणे 'मीच महालिंग'। तोच असे लिंगनिजस्थली।।

१७८ (२)

विश्व उत्पन्न ज्यातून। तेच लिंग निरंजन।।
विश्वाधार हे चिद्रूप। असे सदानंदरूप।।
त्याच्यावाचून विश्वात। अन्य नाही अस्तित्वात।।
निमित्त नि उपादान। शिव विश्वाचे कारण।।
द्रव्य काढी देहातले। कोळी विणे जसे जाळे।।
तसे शक्तियुक्त शिव। निर्मी स्वत:तून विश्व।।
शेष म्हणे दृष्टीपुढे। उभे शिवरूप गाढे।।

१७९ (३)

शिव महालिंग स्वयंप्रकाशित। नक्षत्रे खद्योत त्याच्यापुढे।।
विद्युल्लता सूर्य चंद्र अग्नी तारे। लिंगापुढे सारे प्रभाहीन।।
लिंगतेजे प्रकाशती तारांगणे। मग देती देणे प्रकाशाचे।।
त्याच्या प्रकाशाने विश्व प्रकाशते। विलय पावते त्याच्यातच।।
लिंग माझे असे निजरूपचि ते। ध्याने या लाभते लिंगावस्था।।
शेष म्हणे हेचि लिंगनिजस्थल। भावितो निर्मळ प्राणलिंगी।।

## ३६. अंगलिंगस्थल

१८० (१)

ज्ञानाने जो जीव संपन्न तो 'अंग'। ज्ञेय त्याचे 'लिंग' जाणावे ते।।
अंग, लिंग ज्याच्या येई प्रत्ययाला। म्हणती तयाला अंगलिंगी।।
अंगामध्ये लिंग लिंगामध्ये अंग। असते अभंग समरस।।



बीजात अंकुर बीज अंकुरात। तसाच दोहोंत संबंध हा।।
असे ऐक्यज्ञान असे ज्याच्याठायी। तोच असे पाही अंगलिंगी।।
शेष म्हणे आध्यात्मिक ही अवस्था। पुढे पुढे जाता अनुभवा ये।।

१८१ (२)

गुरूपदेशाने, स्वानुभवबळे। जयाला आकळे प्राणलिंग।।
त्याचे ध्यान पूजा करी जो सतत। त्यास नाव प्राप्त अंगलिंगी।।
आगम निगम सांगती गर्जून। लिंग परब्रह्म हेचि आहे।।
त्रैलोक्या आधार मोक्षाचे ते स्थान। देई ते करून मोक्षप्राप्ती।।
लिंग मोक्षरूप मनाची धारणा। ज्याची तोच जाणा जीवन्मुक्त।।
तोच महाज्ञानी महागुरू श्रेष्ठ। त्याहून वरिष्ठ कोणी नाही।।
उत्पत्तिविनाशरहित जे लिंग। विश्वाचे अभंग कारण ते।।
अशा लिंगाची जे जाणती न महती। तेच मूढमती पूर्ण जाणा।।
शेष म्हणे प्राणलिंगी पक्व होतो। शरणस्थली तो जाई पुढे।।

**अंगस्थलांतर्गत प्राणलिंगिस्थल संपूर्ण**

# अंगस्थलांतर्गत शरणस्थल

## ३७. शरणस्थल

१८२ (१)

लिंगांगऐक्याचा घेई अनुभव। प्राणलिंगी शिवज्ञानयुक्त।।
प्राणलिंगी सती परशिव पती। असा धरी चित्ती दृढभाव।।
पतिपत्नीत जे सामररस्यसुख। तसे लिंगांगैक्य सुख भोगी।।
जाणावा शरण प्राणलिंगी तोही। आनंदभक्ती ही त्याच्याठायी।।
सती पतीविण पुरुषाचे अन्य। न करी चिंतन कदापिही।।
तसे अन्य सर्व दुर्लक्षूनि देव। आराधितो शिव शरण तो।।६।।
शेष म्हणे अशी एकनिष्ठा दृढ। म्हणून आरूढ शरणस्थली।।

१८३ (२)

प्राणप्रिय पतीप्रती। एकनिष्ठ असे सती।।
पतीविण नच चिंती। परपुरुष कल्पांती।।
पती पत्नीला दे सुख। शिव देई आत्मसुख।।
आत्मसुख असे झरे। किती भोगिता न सरे।।
पतिपत्नीत वियोग। काळ घडवितो मग।।
परि शिव जिचा पती। तिला नच स्पर्शे भीती।।
शिवा काय करी काळ?। शिव स्वये महाकाळ।।
असा जन्ममृत्यातीत। शेष म्हणे शिव फक्त।।

१८४ (३)

ज्याला द्रव्यनिधी मोठा सापडला। अपेक्षी कशाला काचमणी?।।
बैसून धनाच्या हंड्यावरी भीक। मागेल तो एक शहाणा कोण?।।
तसा सर्व देवांचाही देव शिव। ज्याने एकमेव जाणला तो।।



देवांचा करील अन्य पूजापाठ। अशी कधी गोष्ट घडेल का?।।
टाकी गंगाजळ मृगजळामागे। धावे लागवेगे असा कोण?।।
शेष म्हणे ज्याला शिवानंदप्राप्ती। त्यास नाही भक्ती शिवाविण।।

१८५ (४)

अंधाराचा नाश कराया खद्योत-। प्रकाश समर्थ नसे कधी।।
सूर्य उगवता अंध:कार दडे। तसे शिवापुढे भवतम।।
चंद्रामृताचे जो नित्य करी पान। लागता तहान चकोर तो।।
चंद्राकडे पाहे होऊनिया दीन। लक्षी नच अन्य तारकांसी।।
तसे संसाराने पीडले जे जीव। त्यांनी अन्य देव त्यागूनिया।।
शिवास शरण सर्वभावे जाता। हरी भवचिंता रक्षितो तो।।
शेष म्हणे शिवा अनन्यशरण। जाई तो शरणस्थली जाणा।।

## ३८. तामसनिरसनस्थल

१८६ (१)

शिवभक्तीत निमग्न। सदा आत्मानंदी लीन।।
असा श्रेष्ठ तो शरण। निवटी तम मनातून।।
निद्रा आलस्य प्रमाद। तमोगुणाचे सुहृद।।
ज्याचे ज्ञान तमोयुक्त। त्याला सद्गती न प्राप्त।।
ज्ञानयोगासाठी फक्त। सत्त्वगुण उपयुक्त।।
म्हणूनीच म्हणे शेष। करी तामसनिरास।।

१८७ (२)

शरणाच्या ठायी थोडा तमोगुण। उरे तो उठून दिसे मोठा।।
शुभ्र वस्त्रावर लहानसा डाग। पेटवितो आग डोळ्यांमध्ये।।

तसा तो सात्त्विक जरी पूर्ण झाला। किंचित् उरला तमोगुण।।
शेष म्हणे पूर्ण निवटी तमास। ठरे तो तामसनिरासक।।

१८८ (३)

तमोगुण दूर सारूनि सात्त्विक। दश गुण चोख बाणवी तो।।
करणे मनाचे नियंत्रण पूर्ण। त्यास नाव जाण 'शम' असे।।
करणे दमन बाह्य इंद्रियांचे। 'दम' नाम त्याचे जाणावे हो।।
नित्यानित्य-आत्मानात्म हा विचार। करणे साचार 'विवेक' तो।।
मनातील स्पृहा विरे जेव्हा पूर्ण। विश्व वाटे तृण 'वैराग्य' ते।।
तैलधारेसम मनी ज्ञान स्थिर। तीच जाणा धीर 'पूर्णभावना'।।
क्षमा हीच 'क्षान्ती', 'कारुण्यसंपत्ती'। जीवमात्री प्रीती जाणावी ती।।
विश्वास ठेवणे शिवावर दृढ। 'श्रद्धा' ती प्रगाढ ओळखावी।।
अनन्यभावाने भजणे शिवाला। 'शिवभक्ती' तिला नाम असे।।
वीरशैवाचार पाळणे संपूर्ण। तोच 'परमधर्म' शेष म्हणे।।

१८९ (४)

काम क्रोध मोह मद नि मत्सर। प्रचंड विकार हत्ती जणू।।
शिवज्ञानरूप मृगेंद्रापुढती। जिवंत राहती कैसे ते हो?।।
सात्त्विक योग्याला षड्रिपुविकार। कधी तिळभर स्पर्शती ना।।
कामक्रोधादींनी मळे ज्याचे चित्त। नर तो निश्चित रजोगुणी।।
करी अहंकारे जगताचा द्वेष। जाणा तो पुरुष तमोगुणी।।
तममूलोत्पन्न रागद्वेषवृक्ष। तोडिते प्रत्यक्ष शिवज्ञान।।
सूर्यासम शिवज्ञान लाभे ज्यास। अज्ञानाचा स्पर्श कसा त्याला?।।
शेष म्हणे शिवयोग्याच्या दृष्टीला। अज्ञान नावाला उरेचिना।।



## ३९. निर्देशस्थल

१९० (१)

मूळ भवाचे कारण। घालवून तमोगुण।।
गुरू उपदेशी ज्ञान। त्याला 'निर्देश' हे नाम।।
करी अंधाराचा नाश। जगा देतसे प्रकाश।।
सूर्यावाचूनिया कोणा। असे सामर्थ्य असेना।।
तसा श्रीगुरूचि एक। शिष्या ज्ञानप्रदायक।।
जसा वैद्य रोग रोधी। तसा गुरू भव रोधी।।
शेष म्हणे गुरुविना। ज्ञानमार्ग सापडेना।।

१९१ (२)

दर्पणावरती साठताच धूळ। दिसेना निर्मळ बिंब त्यात।।
चित्तदर्पणही अज्ञानाने मळे। जन्म-कर्मांमुळे साठे धूळ।।
गुरू मग ज्ञानविभूती घासून। चित्ताचे मलिनपण काढी।।
तोच गुरुश्रेष्ठ असे जीवन्मुक्त। त्याचा कृपाहस्त ज्याच्या शिरी।।
त्याला या जगात दुर्लभ ते काय। भोग मोक्ष पाय वंदी त्याचे।।
उभे राहतील इंद्रादिक सुर। त्याच्यापुढे कर जोडूनिया।।
शेष म्हणे ज्याच्यावरी गुरुकृपा। त्याच्यासाठी सोपा मोक्षमार्ग।।

१९२ (३)

गुरू कल्पतरू मोक्ष देती हाती। कळवळ्याची जाती ऐसी आहे।।
शिवाद्वैतनिष्ठ कारुण्याचा सिंधू। असा दीनबंधू दुर्मीळचि।।
समुद्रांत क्षीरसागर वरिष्ठ। पर्वतांत श्रेष्ठ मेरू जसा।।
नवग्रही सूर्य कौस्तुभ रत्नांत। वृक्षवल्लरीत चंदन तो।।
सर्व देवांमध्ये श्रेष्ठ उमाकांत। तसा लौकिकांत श्रेष्ठ गुरू।।
शेष म्हणे अशा गुरूला वंदावे। मग सर्व पावे जन्मफळ।।

## ४०. शीलसंपादनस्थल

१९३ (१)

गुरुबोधे शिवतत्त्वास जाणावे। मनात उद्भवे जिज्ञासा ही।।
त्याच जिज्ञासेला 'शील' असे नाम। ज्ञात्यांनी उत्तम दिले असे।।
जाणल्यावरी जे जाणण्यास काही। उरलेचि नाही विश्वामध्ये।।
असे शिवतत्त्व जाणावया भक्त। होय उत्कंठित 'शीली' तोच।।
शरणाची करी संकटे जो दूर। शिवात त्या स्थिर राखे मन।।
ज्याला लागे शिवप्राप्तीची उत्कंठा। तोच खरा मोठा शीलवान।।
शेष म्हणे शिवज्ञानी गुंते चित्त। तोच शीलवंत, अन्य नाही।।

१९४ (२)

पतिप्रेमातून जसे पातिव्रत्य। होते अभिव्यक्त दृष्टीपुढे।।
तशी शिवभक्तीमुळे सुशीलता। येते दृष्टिपथा भक्ताची ती।।
जसजशी प्रीती होई वृद्धिंगत। होय पातिव्रत्य दृढतर।।
तसाच शरणस्थलीचा तो भक्त। होई अनुरक्त शिवावरी।।
तो जे करी काही सर्व शिवासाठी। शिवानेच दिठी पूर्ण भरे।।
जैसी पतिव्रता पतीविण अन्य। न करी चिंतन पुरुषाचे।।
तैसा एकनिष्ठ लिंगज्ञानी रत। पूर्ण शरणागत शिवालाच।।
शेष म्हणे तोच शिवज्ञ शरण। पुढे जाई जाण ऐक्यस्थली।।

### अंगस्थलांतर्गत शरणस्थल संपूर्ण

□□



# अंगस्थलांतर्गत ऐक्यस्थल

## ४१. ऐक्यस्थल

१९५ (१)

अंगस्थलांतील अंत्य ऐक्यस्थल। जीवाची सरेल धाव येथे।।
गंगा सागराला जाऊनिया मिळे। पुन्हा नच वळे मागुती ती।।
तसा ऐक्यस्थली जीव जो पोचला। तो न ये जन्माला पुन्हा जगी।।
याच क्षणासाठी सर्व जन्मफेरे। किती जन्मांतरे भोगियली।।
जपतपादिक करूनि भागला। हाच साधायला क्षण जीव।।
येथे समरस होती जीव शिव। जीवाचे जीवत्व पूर्ण सरे।।
शेष म्हणे येथे समरसभक्ती। जीवशिवाभेटी ऐक्यस्थली।।

१९६ (२)

विषयसुखाला मानितो जो तुच्छ। ज्याचे मन स्वच्छ निःस्पृह जो।।
डुंबे शिवानंदमहासागरात। निष्पाप तो नित्य ऐक्यस्थली।।
जेथूनि तो आला तेथेचि तो गेला। शिवरूपी झाला ऐक्य पूर्ण।।
आणव, मायीय, कार्मिक त्रिमल। नाशूनि निर्मल जहाला तो।।
बिंदू सिंधूमाजी मिळे सिंधू होय। तसा शिवमय होय पूर्ण।।
शेष म्हणे प्राप्त होता ऐक्यस्थिती। जन्ममृत्युभ्रांती मिटे सर्व।।

१९७ (३)

कीटक भ्रमरचिंतन करितो। मग स्वतः होतो भ्रमरचि।।
तसा शिवध्यान करीत शरण। जातसे विरून शिवरूपी।।
मायामय विश्व दिसेना दृष्टीला। सर्वत्र संचला शिव एक।।
जशी आहे तशी पूर्ण राहे सृष्टी। शरणाची दृष्टी पालटे ती।।
दृष्टी पालटता सृष्टी शिवरूप। घेऊनि समीप उभी राहे।।

शेष म्हणे ऐक्यस्थली जाता भक्त। दिसेना जगत मायामय।।६।।

१९८ (४)

माया-आवरणामुळे। जीव शिव ते वेगळे।।
दिसे दोहोंमध्ये भेद। मुळी असता अभेद।।
संकोचता मायाशक्ती। जीव शिव एक होती।।
जीव पशू, शिव पती। मायेची ही भेदभ्रांती।।
नष्ट होता मायाभ्रांती। पशू कोण, कोण पती?।।
ऐक्यस्थली जीव शिव। शेष म्हणे एकजीव।।

१९९ (५)

संसार हा सर्प महाविषयुक्त। भेदवारुळात राहे सदा।।
वारूळ खणूनि त्याचा करी अंत। परम-अद्वैतभावना ती।।
अद्वैतबुद्धीची नौका करूनि तो। भवपार होतो ऐक्यस्थली।।
शेष म्हणे जन्म आणि मृत्यूतून। मुक्त परिपूर्ण ऐक्यस्थली।।

२०० (६)

अज्ञानांध:कारे व्याप्त। संसाराची काळरात।।
पोषी कामरूपी दैत्य। त्याचे वाढवी सामर्थ्य।।
कामावेग केला शांत। तरी सदा तो अतृप्त।।
मनुष्य न भोगी भोग। त्याला भोगताती भोग।।
संसाराची रात्र पळे। जेव्हा अद्वैत उजळे।।
घोर संसारसंकट। शिवज्ञाने होय नष्ट।।
शेष म्हणे मुक्ती पूर्ण। शिवानंदाचे स्फुरण।।



## ४२. आचारसंपत्तिस्थल

२०१ (१)

प्राप्त जहाले शिवत्व। तरी नाही देहपात।।
जरी वसे तो देहात। तरी असे जीवन्मुक्त।।
त्याच्या आचारा सूतक। कधी होईना बाधक।।
सर्व मनाचे व्यापार। झाले लिंगातचि स्थिर।।
जरी आचरे सत्कर्म। किंवा घडले दुष्कर्म।।
तरी त्याचे फळ काही। निष्पन्नचि होत नाही।।
बीजे भाजून पेरिली। उगवती कोणे काळी?।।
त्याच्या हाती कर्म घडे। फळ भोगणे न पडे।।
शेष म्हणे शिव प्राप्त। होता होय जीवन्मुक्त।।

२०२ (२)

पापात्मा असो वा असो पुण्यवान। अंत्यज ब्राह्मण असो कोणी।।
त्याच्या लेखी कोणी नाही असमान। सर्वत्र दर्शन शिवाचेच।।
त्याला नाही वर्णाश्रमांचे बंधन। नसे प्रयोजन सत्कर्मांचे।।
नित्यनैमित्तिक आचरावे कर्म। असेही बंधन नाही नाही।।
वस्त्रांचा जळाला ढीग तो पुरता। पाहाण्यापुरता जसा उरे।।
तसे त्याचे कर्म दिसण्यापुरते। कर्मफलाविण ते चाललेले।।
शेष म्हणे दिसे जरी देहधारी। तरी कर्मांतरी लिप्त नव्हे।।

२०३ (३)

कमळाचे पान भिजेनाच जळी। तसा ऐक्यस्थली अलिप्त तो।।
सर्व कर्मे करी परि कर्मफळ। होतसे निष्फळ त्याचे सर्व।।
वाटेने तो चाले किंवा बसलेला। अथवा निजला, असो जागा।।
त्याची सर्व कर्मे शिवाचे पूजन। कारण तो लीन शिवातचि।।

जो जो पडे त्याच्या दृष्टीला पदार्थ। दिसे त्याला त्यात शिवरूप।।
शेष म्हणे बुद्धी होताच चिन्मय। दिसे शिवमय जग सर्व।।

२०४ (४)

शिवयोगी शुद्ध मने। जे जे करितो चिंतन।।
तेचि त्याचे शिवध्यान। असे जाणावे आपण।।
तो जे बोले क्षणमात्र। तेचि होय शिवस्तोत्र।।
त्याची पडे पायधूळ। होय तेचि तीर्थस्थळ।।
कळत वा नकळत। क्रिया घडती ज्या तेथ।।
शिवपूजारूप होती। शेष म्हणे अशी स्थिती।।

## ४३. एकभाजनस्थल

२०५ (१)

सकल विश्वचि असे शिवमय। याचा अनुभव घेई नित्य।।
वेगळे दिसती लाटा नि तरंग। परि ते अभंग सागराशी।।
तसे भिन्न भिन्न जगातील जीव। असती ते शिवरूप सत्य।।
विश्व जीव शिव एकरूप तत्त्वे। बुद्धीत एकत्व मुरे जेव्हा।।
स्थितीला त्या 'एकभाजनस्थल' हे। नाव दिले आहे शेष म्हणे।।

२०६ (२)

दूध भिन्न भांड्यांतले। एका भांड्यात ओतले।।
झाले एकभाजन ते। असे जाणावे पुरते।।
तसे शिवभाजनात। विश्व सामावे समस्त।।
भांडे दुधाचा आधार। तसा शिव विश्वाधार।।
दृश्यादृश्य चराचर। एक शिवचि साचार।।



असे एकत्व जाणवे। तेच स्थल हे जाणावे।।
शेष म्हणे गुरुकृपे। आकलन होई सोपे।।

२०७ (३)

येता अद्वैताची पूर्ण अनुभूती। प्राप्त होते स्थिती स्थलाची या।।
प्रसादाविषयी ऐक्यबुद्धी पूर्ण। होतसे निर्माण अंतर्यामी।।
आपला नि अन्य भक्तांचा प्रसाद। भिन्न न, प्रसाद शिवाचा तो।।
आपण नि अन्य भक्त, शिव भिन्न। नाही, असे ज्ञान दृढ होते।।
गुरू, लिंग आणि जंगम-प्रसाद। यात नाही भेद जाणवे ते।।
शेष म्हणे दिसे प्रसादी भिन्नत्व। त्याला न शिवत्व प्राप्त झाले।।

२०८ (४)

बीजच आधार अंकुराचा असे। तसे विश्व वसे शिवावर।।
आधार-आधेय संबंध दोहोंत। जाणावा मनात साधकाने।।
तूप दुधामध्ये तेल ते तिळात। तसा शिव व्याप्त विश्वामध्ये।।
दूधातून तूप तिळांतून तेल। काढावे लागेल प्रक्रियेने।।
तसा शिव विश्वी पाहाया सकल। करावी लागेल साधना ती।।
शेष म्हणे शिवचिंतन सतत। साधना ही सत्य जाणावी हो।।५

२०९ (५)

ज्याची दृष्टी झाली शिवमय पूर्ण। झाली एकभाजन स्थिती प्राप्त।।
मायाकल्पित तो भेद जरी दिसे। त्यास त्याचे नसे प्रयोजन।।
प्रपंचामधील सर्व वस्तुजात। असे प्रकाशित चैतन्याने।।
तेणेचि त्या होती दृष्टीस प्रतीत। हे तो जाणे सत्य ऐक्यस्थली।।
म्हणूनि दिसेना वस्तुभेद त्याला। पूर्ण चिंब झाला शिवानंदी।।
कृतिशून्य क्षोभमुक्त शिवलीन। जीवन्मुक्त पूर्ण शेष म्हणे।।

## ४४. सहभोजनस्थल

२१० (१)

गुरू, शिव, शिष्य एकरूप पूर्ण। स्वस्वरूपाहून भिन्न नाही।।
याच जाणिवेला सर्वग्रासात्मक। भाव असे एक नाव आहे।।
वस्तुवस्तूंतील भेदाचे ग्रसन। करूनि ती पूर्ण स्वात्मरूप-।।
आहे, असे सदा करणे चिंतन। हेचि 'सहभोजनस्थल' असे।।
चिदाकार आत्मस्वरूपात शिव। गुरू, विश्व सर्व एकरूप।।
अशा जाणिवेला सहभोजन हे। नाव दिले आहे शेष म्हणे।।

२११ (२)

शिव हा, गुरू हा आणि हे जगत्। त्याहूनि पूर्णत: वेगळा मी।।
अशी भेदबुद्धी नुरे ज्याच्याठायी। तोच असे पाही विश्वभोजक।।
जगाच्या भेदांचे भक्षण करितो। विश्वभोजक तो असे जाणा।।
शिव माझा स्वामी, मी त्याचा सेवक। तो गुरू, मी एक शिष्य त्याचा।।
अशी भेदबुद्धी त्याच्यापाशी नसे। कारण तो वसे अद्वैतपदी।।
शेष म्हणे शिवाद्वैतपदावर। झाला पूर्ण स्थिर जीवन्मुक्त।।

२१२ (३)

'देहच मी आहे' अशी जी जाणीव। तिला असे नाव अहंता हे।।
'जगद्रूप मीच' अशा जाणिवेला। पराहंता तिला नाव साजे।।
संसारबंधनी घालिते अहंता। परि पराहंता तोडिते ते।।
पराहंतारूप अग्नीत होमितो। इदंरूप सर्व तो हविर्द्रवे।।
मग इदंरूप प्रपंच समस्त। होतसे पूर्णत: शिवरूप।।
शेष म्हणे असा यज्ञाचा सोहळा। जाणावा आगळा विवेकाने।।

२१३ (४)

मीच गुरू, शिव, मीच चराचर। असा अहंकार शुद्ध असे।।



त्याला 'पूर्णाहंता' नाव देती योगी। होय जेव्हा जागी हृदयी ती।।
मग विश्व पूर्ण दिसे स्वात्मरूप। भिन्न काही रूप दिसेनाच।।
विश्वातील भेद हेच हविर्द्रव्य। आज्ञाचक्री दिव्य ज्ञान-अग्नी।।
ज्ञानाग्नीत विश्वभेदांस होमिता। विश्वहविभोक्ता नाव मिळे।।
अंत:स्थित महालिंग-सूर्याठायी। विलीन सर्वही चित्तवृत्ती।।
त्याला बाह्य जगराहाटीचा स्पर्श। होईल कशास? शेष म्हणे।।

२१४ (५)

जन्ममरणाचे तुटले बंधन। चिदाकाशी पूर्ण सामावला।।
विश्वभेदाची जी करिते निवृत्ती। तीच परामुक्ती, पराविद्या।।
येथे सामावले 'लिंगा'माजी 'अंग'। जहाले 'लिंगांगसामरस्य'।।
संपले धावणे अनंत जन्मांचे। संसारचक्राचे भ्रमणही।।
आता सुख नाही, नाही दु:खभोग। कोणताच योग नाही आता।।
किती युगे गेली केली आटाआटी। साधावयासाठी ऐक्यस्थल।।
शेष म्हणे शिवकृपेने मोक्षाचा। धनी झाला साचा ऐक्यस्थली।।

**अंगस्थलांतर्गत ऐक्यस्थल संपूर्ण**

# लिंगस्थले

## लिंगस्थलांतर्गत भक्तस्थल

२१५ (१)

जगताचे मूलकारण जो शिव। त्यास 'स्थल' नाव शास्त्रामध्ये।।
सृष्टिनिर्मितीच्या आधी अवस्थित। हेच स्थलतत्त्व होते एक।।
चिच्छक्तीही त्याच्यातच विद्यमान। तादात्म्याने पूर्णपणे होती।।
शिव आणि शक्ती अशा नामभेदे। शिवपण नांदे एकचि ते।।
ओठ दोन परि शब्द जसा एक। नेत्र दोन एक दृष्टी जशी।।
तशी शिव शक्ती नामे जरी भिन्न। तरी एकपण त्यांच्यामध्ये।।
शेष म्हणे शक्तिविशिष्ट हा शिव। होता एकमेव सृष्टिआधी।।

२१६ (२)

स्थलतत्त्व हे एकटे। त्यास लीला करू वाटे।।
मग स्वत: विभागले। दोन ठायी तेच झाले।।
एक भाग झाला 'अंग'। दुजा भाग झाला 'लिंग'।।
चिच्छक्तीही दोन ठायी। त्याच्यासम झाली पाही।।
एक भाग 'कला' झाला। राहे लिंग-आश्रयाला।।
दुजा भाग झाला 'भक्ती'। राहे 'अंगा'च्या संगती।।
'लिंग' नामे परशिव। 'अंग' हाच जाणा जीव।।
शेष म्हणे एक तत्त्व। झाले दोठायी विभक्त।।

२१७ (३)

लिंगतत्त्व पुन्हा विभागून सहा। ठायी झाले पाहा स्वत:हून।।
आचार-गुरु-शिव-जंगम ते लिंग। प्रसाद-महालिंग भेद सहा।।
अंगतत्त्व तसे सहा ठायी झाले। तेचि म्हणविले षट्स्थल।।



भक्त-माहेश्वर-प्रसादी आणिक। प्राणलिंगी देख शरण-ऐक्य।।
हेचि षट्स्थल रेणुके समस्त। वर्णिले अगस्त्य मुनीपाशी।।
'लिंग' पूज्य आणि 'अंग' ते पूजक। 'अंग' आराधक, 'लिंग' आराध्य।।
'अंग' भक्तमाहेश्वरादी स्थितीत। अर्ची लिंगाप्रत सत्य जाणा।।
शेष म्हणे लिंग-अंगाचा संबंध। केलासे विशद आगमांत।।

२१८ (४)

'अंग'चि करीत 'लिंगा'चे अर्चन। जाई समरसून 'लिंगा'मध्ये।।
'लिंग-अंग-सामरस्य' यास नाव। दिले अभिनव आगमांनी।।
बिंदू सिंधूमाजी मिळे होय सिंधू। तसाचि संबंधू अंग-लिंगी।।
जीवाचे जीवत्व सरूनि तो शिव। होणे याला नाव मोक्ष, मुक्ती।।
ऐक्यस्थली जाता जीव झाला शिव। त्यानंतर काय करील तो?।।
त्याचे ज्ञानोत्तर कसे आचरण। लिंगस्थलांतून विवरिले।।
प्रारब्ध भोगून संपेना जोवर। तोवरी शरीर बाळगणे।।
लिंगैक्य स्थितीत राहे कसा बोले। तेच लिंगस्थले सांगती ही।।
शेष म्हणे ज्ञानोत्तर आचरण। घ्यावे उमगून पूर्णपणे।।

### ४५. दीक्षागुरुस्थल

२१९ (१)

जिच्यामुळे लाभे परशिवज्ञान। त्रिमलबंधन तुटे पूर्ण।।
तिला शिवदीक्षा असे नाम आहे। ती देई तो पाहे दीक्षागुरू।।
जीवाहृदयीचा अज्ञानांध:कार। उपदेशे दूर करितो तो।।
'गु' म्हणे सत्त्वगुणादिरहित। मायारूपातीत अर्थ 'रू'चा।।
गुण-रूपातीत शिवरूपाचा तो। करूनिया देतो परिचय।।

मनुष्याचे निवारूनि पशुपण। देतो शिवपण शेष म्हणे।।

२२० (२)

वीरशैवशास्त्रातील रहस्यार्थ। करी संग्रहित गुरू पूर्ण।।
तेचि उपदेशी शिष्यास यथार्थ। करवी पूर्णत: आचरण।।
सदाचरणाच्या वाटेवरी चाले। 'आचार्य' त्यामुळे म्हणती त्याला।।
शिवयोगे शिवैक्यभावनेत रत। दाखवितो वाट कैवल्याची।।
मायासिंधूतून नेतसे तारून। असे तो म्हणून जगद्गुरू।।
आत्मानुभवाने सर्व वस्तुठायी। चैतन्यच होई प्रकाशित।।
शेष म्हणे गुरू विश्वप्रकाशक। ठेवावे मस्तक त्याच्या पायी।।

□

## ४६. शिक्षागुरुस्थल

२२१ (१)

दीक्षागुरू होई शिक्षागुरू पुढे। संदेह तो फेडे मनातील।।
शिष्याच्या प्रश्नांचे करी समाधान। देई अनुशासन सुसंस्कार।।
बोध्य शिवज्ञान बोधी शिष्याप्रती। बोधक म्हणती तेणे त्याला।।
शरद् चांदणे निवारी अंधार। श्रीगुरू संसारतम तसे।।
गुरूपदेशाने अज्ञान निवळे। शिष्याचे उजळे चित्ताकाश।।
शेष म्हणे जगन्मायानिवर्तक। ज्ञान देती देख आचार्यश्रेष्ठ।।

२२२ (२)

भेदवादी संदिग्ध विचार खंडून। प्रतिपादी पूर्ण शिवाद्वैत।।
छेदिते संशय-अरण्य निबिड। वचनकुऱ्हाड श्रीगुरूची।।
म्हणूनि तो शोभे गुरुशिखामणी। मोक्षलक्ष्मी वाणीमध्ये बिंबे।।
तारूनि संसारी नेई पैलपार। उघडितो दार कैवल्याचे।।



निजरूपचित्र करी प्रकाशित। शिष्यहृदयात ज्ञानतेजे।।
शिवज्ञानौषध देऊनि संसार-। रोगपरिहार सहज करी।।
शेष म्हणे असा गुरू ज्याला प्राप्त। कोण भाग्यवंत जगामध्ये?।।

□

## ४७. ज्ञानगुरुस्थल

२२३ (१)

शिक्षागुरू हाच ज्ञानगुरू जाण। दीक्षा, शिक्षा, ज्ञान तोचि देतो।।
उपदेशी शिवज्ञानरहस्यार्थ। करी संदेहमुक्त शिष्याप्रती।।
शिव विश्वभेदमुक्त निर्विकार। त्याचा साक्षात्कार घडवी तो।।
युक्तिप्रयुक्तीने बोधी शिवाद्वैत। जाणा तो साक्षात् ज्ञानगुरू।।
नभी चंद्रावर कलंक काळिमा। अवस पौर्णिमा पीडी त्याला।।
परि शिष्यचिदाकाशी ज्ञानचंद्र। प्रकाशतो भद्र निष्कलंक।।
शेष म्हणे त्याला नाही वृद्धिक्षय। ज्ञानतेजोमय असे जाणा।।

२२४ (२)

जरी रत्नदीप असे। भोवतीचे तम नाशे।।
परि गुरू प्रज्वलित। जेव्हा करी ज्ञानज्योत।।
विश्वातले अज्ञान ते। नष्ट क्षणात करिते।।
त्याच्या प्रकाशाला नाही। कोठे प्रतिबंध काही।।
सर्वसाधक विचार। उपदेशाया तत्पर।।
मुमुक्षूंच्या वरी सर्व। करी कृपेचा वर्षाव।।
शेष म्हणे ज्ञानगुरू। त्याचे पाय आम्ही धरू।।७।।

२२५ (३)

केवळ अंधार सृष्टीतला दूर। करितो भास्कर विश्वातला।।

गुरुसूर्य मात्र बाह्य-मनातील। अज्ञानाचा मळ दूर सारी।।
'विश्व आणि शिव वेगळे' हा भाव। अज्ञान हे बाह्य जगातले।।
'शिव आणि मी भिन्न' हे आतले। अज्ञान सगळे पोषी भेद।।
दोन्ही प्रकारचे नाशितो अज्ञान। श्रेष्ठ सूर्याहून असे गुरू।।
ज्ञानगुरू कृपाकटाक्षाने ज्ञान। लागता न क्षण देई त्वरे।।
ज्याच्या ज्ञाने शिष्य होतो जीवन्मुक्त। ज्ञानसिंधू सत्य शेष म्हणे।।

## ४८. क्रियालिंगस्थल

२२६ (१)

गुरूपदेशाने जेथे क्रिया लय। पावे तेचि होय क्रियालिंग।।
वक्ष:स्थळावरी रुळते जे लिंग। त्याला इष्टलिंग नाव असे।।
इष्टलिंगाचेच नाव 'क्रियालिंग'। सांगती आगमपारंगत।।
सद्भक्तांच्या क्रिया सफल व्हावया। शिवचि ये क्रियालिंगरूपे।।
इष्टलिंगपूजनानेचि समस्त। क्रियांना पूर्णत्व प्राप्त होय।।
शेष म्हणे कंठी रुळे इष्टलिंग। तेच क्रियालिंग जाणावे हो।।

२२७ (२)

क्रियालिंगरूपे परंज्योतिरूप। ब्रह्मचि समीप भक्तांचिया।।
त्याच्या पूजनाने सर्व सत्कर्मांचे। फल अनायासे प्राप्त होते।।
यज्ञादिक क्रिया लिंगपूजाअंश। नेदिती कर्त्यास पूर्ण फळ।।
असे जाणूनिया सनकादी मुनी। लिंगाच्या पूजनी रत झाले।।
लिंगार्चनी रत त्याची कर्मे सिद्ध। होऊनि तो सिद्ध फल पावे।।
मग अग्निहोत्र यज्ञ तप काही। करण्याचे नाही प्रयोजन।।
शेष म्हणे देव इष्टलिंगाश्रय। घेऊनिया कार्य सांभाळिती।।



## ४९. भावलिंगस्थल

२२८ (१)

ज्यात क्रिया होती लीन। त्याला क्रियालिंग नाम।।
तसा ज्यात भाव लीन। तेचि 'भावलिंग' जाण।।
स्थूलदेही इष्टलिंग। सूक्ष्मदेही प्राणलिंग।।
भावनेत जे राहते। असे भावलिंगचि ते।।
येथे प्राणलिंगा भले। 'भावलिंग' संबोधिले।।
भावलिंगास पुढती। 'ज्ञानलिंग' संबोधिती।।
शेष म्हणे थोडी भिन्न। परिभाषा घ्या जाणून।।

२२९ (२)

गंगोत्रीसारखे पारदर्शी मन। ज्याचा भाव पूर्ण शुद्ध असे।।
षड्गुणैश्वर्यसंपन्न ईश्वर। होतसे गोचर त्याच भावा।।
नित्यतृप्त शिव त्याला कर्मकांड । नलगे ते गोड जाणावे हे।।
ज्याला जाणे भक्त केवळ भावाने। तत्त्वा त्या वाहणे बेलफुले।।
शक्य न म्हणून त्यास भावफुले। अर्पूनि सगळे पूजिताती।।
तेथे पूजाद्रव्यादींचे प्रयोजन। नसेच कारण शेष म्हणे।।

२३० (३)

मृत्तिका वा शिलानिर्मित जे लिंग। श्रेष्ठ भावलिंग त्याच्याहूनी।।
भावलिंगा नाही काही डाग दोष। देई ते प्रवेश ज्ञानमार्गी।।
भावपूजेमुळे ज्ञानरूप शिव। प्रसन्न अतीव भक्तावरी।।
म्हणूनि जे प्राणलिंगास अर्चिती। संक्षेपे पूजिती इष्टलिंग।।
प्राणलिंगार्चनी अत्यधिक काळ। राहती केवळ रमूनिया।।
स्थावरलिंगाची पूजा जे त्यागिती । हृदी ते अर्चिती भावलिंग।।

शेष म्हणे तोच असे भावलिंगी। लीन अंतर्जगी सर्वदा जो।।

२३१ (४)

मूलाधारचक्री हृदयी भ्रूस्थानी। ज्योतिर्मय कल्पूनि शिवलिंग।।
त्याचे भावद्रव्ये करी जो पूजन । तोच असे जाण शिवयोगी।।
शिला मृत्तिका वा काष्ठनिर्मित ते। न पूजी लिंगाते कदाकाळी।।
क्रियेने लिंगास पूजिती सामान्य। ज्ञान्यांचे पूजन हृदयात।।
श्रेष्ठ असे क्रियालिंगपूजेहून। भावलिंगपूजन खरे जरी।।
तरी इष्टलिंगपूजात्याग इष्ट। नव्हे जाणा स्पष्ट वीरशैवा।।
शेष म्हणे ज्ञानोत्तरही आचार। पाळावा साचार जीवन्मुक्ते।।

## ५०. ज्ञानलिंगस्थल

२३२ (१)

भावलिंगप्रकाशक। ज्ञान लय पावे ज्यात।।
'ज्ञानलिंग' ते म्हणती। शिवतत्त्वार्थकोविद।।
त्रिगुणांच्या जे अतीत। तुर्यातीत शिवब्रह्म।।
श्रुति-गुरूपदेशाने। येई त्याचा स्वानुभव।।
पूर्ण ज्ञानाचा आधार। 'तृप्तिलिंग' नाव दुजे।।
शेष म्हणे ज्ञानलिंग। नित्य चिंतावे हृदयी।।

२३३ (२)

गंधपुष्पादींनी स्थूल इष्टलिंग। भक्त यथासांग पूजिताती।।
सूक्ष्म प्राणलिंग भावपुष्पादींनी। भक्त निशिदिनी पूजिती ते।।
स्थूलसूक्ष्मातीत तृप्तिलिंग मात्र। पूजावे पवित्र ज्ञाने सदा।।



इष्टलिंगपूजा होतसे क्रियेने। सद्भावे पूजिणे प्राणलिंग।।
तृप्तिलिंग मात्र ज्ञानाने केवळ। पूजिणे अटळ शेष म्हणे।।

२३४ (३)

स्थूल सूक्ष्म रूपे शंकराची दोन। मायेने ती पूर्ण कल्पिलेली।।
नसती मुमुक्षूंप्रती उपयुक्त। त्यांना इष्ट फक्त ज्ञानलिंग।।
स्थूलसूक्ष्मातीत असे ज्ञानलिंग। त्यांनी यथासांग पूजावे हो।।
परब्रह्मरूप जाणतो शिवाला। तोच म्हणविला ज्ञानलिंगी।।
बाह्यपूजा-प्राणपूजेला त्यागून। स्वत: होई ज्ञानलिंगरूप।।
शेष म्हणे तोच मुक्त समजावा। सप्रेमे वंदावा सर्वकाळ।।

## ५१. स्वयस्थल

२३५ (१)

भावलिंगास जे करी प्रकाशित। पावे लय जेथ ज्ञान ते हो।।
असे ज्ञानलिंगिस्थल प्राप्त ज्याला। स्वयस्थली त्याला संबोधिती।।
स्वच्छंदाचारात सदा तो संतुष्ट। विश्व पाहे स्पष्ट आत्मरूपी।।
बाह्यलिंगाकडे होऊनि विमुख। भोगी आत्मसुख अंतर्यामी।।
मनी आले तर कोणाशीही बोले। अन्यथा तो डोले मौनातचि।।
शेष म्हणे जसे निरागस बाळ। तसा त्याचा खेळ चाललेला।।

२३६ (२)

ममत्व मीपण नाही देहभान। गृह दारा कोण विचारितो?।।
अविद्यादी पंचक्लेशांनी किंचित्। मळेचिना चित्त कदापिही।।
मिळे कधी भिक्षा तरी होय तृप्त। नातरी संतृप्त सर्वकाळ।।

विश्व अशी दुजी वस्तू आहे काही। प्रत्यया न येई मुळी त्याच्या।।
सहज ते मिळे त्यावरी संतुष्ट। पूर्ण भस्मनिष्ठ जितेंद्रिय।।
राजा वा रंकाशी समत्व वर्तन। भूरुद्र तो जाण शेष म्हणे।।

२३७ (३)

जगी रत प्राणी संसारसुखात। पाहूनि विस्मित अंतरी तो।।
सोडूनिया शिव भवचक्री जीव। भरडती हाव धरूनिया।।
पाहूनि नवल वाटे त्याच्या जीवा। म्हणे कशी माया भुलविते।।
परि स्वत: राहे शिवानंदी लीन। जगाचे न भान असा ज्ञानी।।
शिवज्ञान-ध्यान एकांताची ओढ। भिक्षान्नचि गोड लागे त्याला।।
शेष म्हणे असा आत्मतृप्त मुनी। तोच खरा ज्ञानी स्वयस्थली।।

## ५२. चरस्थल

२३८ (१)

अहंता ममता निमाली संपूर्ण। जहाला संपन्न आत्मज्ञाने।।
असा स्वयस्थली आत्मानंदी रत। भ्रमे स्वत: अंत:प्रेरणेने।।
त्याच्या पदरवे धरा सर्व गाजे। नाव त्यास साजे चरस्थली।।
षड्रिपूंपासून मुक्त, शांती दांती। देही हे नांदती दशगुण।।
त्रैलोक्याला शिवरूपात पाहात। फिरे धुंडाळीत दाही दिशा।।
सहज दृष्टी ज्या दिशेकडे वळे। पडती पाउले तिकडेच।।
शेष म्हणे असा फिरे मुक्तपणे। तेणे संबोधिणे चरस्थली।।

२३९ (२)

श्रेष्ठ हा आणिक तो असे कनिष्ठ। मनात अनिष्ट विचारीना।।



कोणी सन्मानिता गर्वे तो उतेना। होताचि कुंथेना अवमान।।
कूटस्थ आत्म्यात स्थिर सर्वकाळ। पदे धरातळ धुंडाळितो।।
त्याचे अलौकिक पाहूनिया गुण। होती सर्व जन विस्मित ते।।
सामान्यासारखा दिसे बहिरंगी। परि अंतरंगी आत्मलीन।।
विहित निषिद्ध कर्म घडे काही। तरी त्यात नाही लिप्त कधी।।
ब्रह्मादी देवांच्या ऐश्वर्यापासून। विमुख तो पूर्ण शेष म्हणे।।

## ५३. परस्थल

२४० (१)

स्वस्वरूपाहून नाही काही पर। अशी मती स्थिर ज्याची पूर्ण।।
त्याला परस्थली असे अभिधान। दिले हे जाणून आगमांनी।।
विश्वाधिक शिवस्वरूप आपण। स्वतंत्र संपूर्ण जाणतो तो।।
म्हणूनिया मानी विश्वसंपदेला। तृणासम, झाला नि:स्पृह तो।।
असे वागावे नि असे नये वागू। शकती न सांगू शास्त्रे त्याला।।
वर्णाश्रमधर्मा होऊनि विमुख। भोगितो तो सुख आत्म्याठायी।।
शेष म्हणे त्याला बांधू शके असे। जगी कोणा नसे सामर्थ्य ते।।

२४१ (२)

'विश्वाच्या अतीत चिद्रूप जे ब्रह्म। तेचि मी' हे ज्ञान स्थिर मनी।।
तेणे ज्ञानयोगी सर्व योगियांत। सर्वोत्कृष्ट ख्यात जगी असे।।
अचल शाश्वत आत्मरूपी रत। नाशे विश्वभ्रांतकल्पना ती।।
तेणे जीवन्मुक्त होऊनि वर्ततो। जिवंत दिसतो इतुकेचि।।
त्यास नसे पुनर्भवाचे कारण। जिंकिले मरण त्याने जाणा।।
शेष म्हणे प्रारब्ध भोगून संपेतो। जिवंत राहतो देहरूपे।।

२४२ (३)

परब्रह्मरूप कर्मकांडातीत। अशा स्थानी स्थित जहाला तो।।
त्याने कर्म केले तरी ते निष्फळ। पडेनाच फळ भोगणेही।।
त्याने कर्म केले नाही तरी काही। त्याचे अहितही होईनाच।।
देहाभिमानाचा करूनिया त्याग। भ्रमे जागोजाग पृथ्वीवरी।।
चरस्थली स्वत: असे पुण्यक्षेत्र। तीर्थ ते पवित्र त्याचे ज्ञान।।
शेष म्हणे त्याच्या सत्संगाने अज्ञ। जीव होती प्राज्ञ पूर्णपणे।।

**लिंगस्थलांतर्गत भक्तस्थल संपूर्ण**

□ □



# लिंगस्थलांतर्गत माहेश्वरस्थल

## ५४. क्रियागमस्थल

२४३ (१)

ज्ञानयोगबळे शिवरूप स्वत:। झाला जो तत्त्वता परस्थली।।
तो जे काही करी पूजा आदी कर्म। त्याला क्रियागम संबोधिती।।
त्याच्या क्रियेनेच होई प्रबोधन। तेणे अभिधान क्रियागम।।
अरणिकाष्ठात अग्नी वसे सुप्त। पण तो अव्यक्त रूपे असे।।
मंथन करिता होई तो प्रकट। अनुभव स्पष्ट असा आहे।।
तसा लिंगाठायी स्थित जो शंकर। त्याचा साक्षात्कार क्रियेनेच।।
शेष म्हणे पूजाजपादी साधने। सर्व आचरिणे याचसाठी।।

२४४ (२)

शिवपूजा शास्त्रविहित हे कर्म। नित्य लागे जाण आचरावे।।
प्रत्यक्ष शिवाची आज्ञा ती प्रमाण। तिचे उल्लंघन करू नये।।
जीवन्मुक्त झाला तरी राहे लोकी। समस्त विलोकी जग त्याला।।
न्याहाळूनि त्याचे सर्व आचरण। वर्तती सामान्य जन तैसे।।
लोकांस वळण लावावयासाठी। करावे शेवटी लागे कर्म।।
शेष म्हणे जरी ज्ञानी पूर्ण झाला। तरी आचाराला लंघू नये।।

२४५ (३)

ज्यांनी घडे लिंगपूजा अहोरात्र। कर ते पवित्र जाणावे हो।।
पवित्र करांनी जे जे घडे कार्य। असे शिवकार्य निश्चित ते।।
करांनी त्या प्राणिकल्याणचि घडे। आणिक उघडे मोक्षद्वार।।
एका शिवाप्रती पूजिताच सर्व। पूजिले ते देव असे जाणा।।
शिवपूजेसाठी बेल फुले पाने। संपादाया मने व्यग्र योगी।।

तरी शिवसमाधीत सदा लीन। असे परिपूर्ण शेष म्हणे।।

२४६ (४)

ज्ञानाविण कर्म घडे ते आंधळे। ज्ञानही पांगळे कर्माविण।।
करी पूजा पण करावी कशाला। ठाऊकच ज्याला नसे मुळी।।
अशी पूजा जाणा असे ती निष्फळ। पूजेचे केवळ सोंग आहे।।
पूजा कशासाठी याचे असे ज्ञान। घडेना हातून परि पूजा।।
ज्ञान ते पांगळे जाणावे निश्चित। नसे उपयुक्त असूनिया।।
नभी उडावया पंख हवे दोन। तसे कर्म, ज्ञान मुक्तीसाठी।।
एक जरी उणा तरी न कल्पांती। शेष म्हणे मुक्तिलाभ त्याला।।

२४७ (५)

ज्ञानसिद्धी झाली तरी शिवभक्ते। करावे कर्म ते फलाविण।।
ज्ञान्याने असावे कर्मामध्ये रत। आणि ज्ञानयुक्त कर्मठाने।।
मरण येईतो लिंगपूजनात। असावे सतत व्यग्र पूर्ण।।
आचारालंकारे जीवन सुंदर। होई जसे शरीर दागिन्यांनी।।
देह नटविला सुवर्णाने किती। तरी धूळमाती मनामध्ये।।
शरीर सोन्याने झाले शोभिवंत। चिंतितो मनात अकल्याण।।
विचारा, सोन्याने शरीर शोभले?। की चित्तच मळले दुर्विचारे?।।
शेष म्हणे शिवा प्रिय सदाचार। त्यास अवडंबर आवडेना।।

## ५५. भावागमस्थल

२४८ (१)

योग्याची जी भावचिन्हे। तीच त्याच्यासाठी लेणे।।
भावरूपशास्त्रचि ते। जना सन्मार्ग दाविते।।



म्हणूनिया त्याला नाम। असे जाणा भावागम।।
आगमांत मिळे ज्ञान। तसे भावचिन्हांतून।।
जना मार्गोपदेशक। शेष म्हणे तेही एक।।

२४९ (२)

'मीच शिव आहे' असा दृढभाव। नांदतो सदैव ज्याच्या मनी।।
तोच भावागमस्थली असे जाण। भावचि कारण शिवत्वाला।।
ज्ञानप्राप्ती आणि कर्माने केवळ। शिवत्व जवळ येईनाच।।
ज्ञान-कर्मालागी भावनेचे बळ। मिळता अटळ मोक्षप्राप्ती।।
शिवालयी घुमे प्रणवाचा घोष। तसेच मानस शिवोऽहंभावे।।
शिवोऽहं शिवोऽहं नादे मन व्यापे। त्याच्यासाठी सोपे सामरस्य।।६।।
शेष म्हणे ज्ञान, कर्म आणि भाव। यांच्यामुळे भव पार होणे।।७।।

२५० (३)

शिवाचे स्वरूप यथार्थ जाणावे। यासाठीच हवे ज्ञानबळ।।
स्वरूपाचे ध्यान मनन करिता। मग येई हाता शिवरूप।।
शिवोऽहंभावाने सतत चिंतन। तेणे होई पूर्ण शिवप्राप्ती।।
केवळ ज्ञानाने, कर्माने शिवत्व। होत नाही प्राप्त जाणावे हे।।
ज्ञान-कर्मासंगे भावनेचे बळ। बैसवी अढळ शिवरूपी।।
शेष म्हणे अंतर्बाह्य आहे शिव। असा दृढ भाव बाळगावा।।

२५१ (४)

अर्थहीन बोल असे अनुचित। नसे स्त्री शोभत पतीविण।।
ज्ञानशून्य बुद्धी भावहीन क्रिया। गेली जाण वाया पूर्णपणे।।
वस्तू न दिसेच जशी नेत्रहीना। तसे भावहीना शिवरूप।।
मात्र ज्याची दृढ शिवोऽहंभावना। त्यास दिसे नाना रूपी शिव।।

गंगाजलामध्ये घट बुडलेला। जले तो व्यापिला अंतर्बाह्य।।
तसे शिवतत्त्व व्यापूनि राहिले। भावनेच्या बळे शेष म्हणे।।

२५२ (५)

भृंगध्यानाने कीटक। होई भ्रमरचि देख।।
तसे शिवध्यानामुळे। पूर्ण शिवरूप मिळे।।
शिवा नको वस्तू धन। त्याला हवे शुद्ध मन।।
जगनियंत्यासमोर। क्षुद्र जीव असे नर।।
निर्मितो जो विश्व सारे। त्याला काय द्यावे बरे?।।
भस्म त्याचे त्याचे जळ। फुले त्याची त्याचा बेल।।
पूजाद्रव्यादी संपत्ती। अवघी तयाची निर्मिती।।
त्याचे त्यालाच अर्पावे। पण द्यावे शुद्ध भावे।।
शेष म्हणे शिव भोळा। शुद्ध भावाचा भुकेला।।

## ५६. ज्ञानागमस्थल

२५३ (१)

शिवयोग्याठायी ज्ञानलक्षणे ती। लोकांस सद्गती देती पूर्ण।।
ज्ञानचिन्हांना त्या नाव ज्ञानागम। तोच ज्ञानागमस्थली जाणा।।
भावयुक्त कर्म, ज्ञान भावयुक्त। असा ज्ञान-कर्मात भाव-बंध।।
कर्म नि भावाने युक्त जे ते ज्ञान। मोक्षाचे साधन असे जाणा।।
भावहीन कर्म, भावशून्य ज्ञान। देईना करून शिवप्राप्ती।।
शेष म्हणे कर्म आणि ज्ञानाठायी। भावना असावी परिपूर्ण।।



२५४ (२)

यज्ञयागकर्मे जन्म कोट्यवधी। घेऊनि न संधी मुक्तीची ती।।
केवळ ज्ञानाने थांबे जन्मवारी। हरताती सारी भवदु:खे।।
ज्ञानहीन कर्मे संसाराचा ताप। वाढतो अमूप दिनोदिन।।
तीच कर्मे ज्ञानयुक्त केल्यावर। होई भवपार सहजचि।।
यज्ञयागकर्मे स्वर्गसुख मिळे। तरी ते सगळे नाशिवंत।।
पुण्यक्षय होता पुन्हा मृत्युलोकी। घालावी लागे की खेप पुन्हा।।
शेष म्हणे मोक्षसुख चिरकाळ। ज्ञानाने निर्मळ येई हाती।।

२५५ (३)

शिवाविण अन्य जगी नाही कोण। मीही शिव पूर्ण ज्ञान हेच।।
वटवृक्ष ज्याच्या उभा दृष्टीपुढे। त्यालाच सापडे बीज त्याचे।।
तसा हा अफाट ब्रह्मांडविस्तार। बीज तो ईश्वर असेल का?।।
जिज्ञासा ही नेई ब्रह्मतत्त्वाकडे। आणि मुक्तीकडे चालू लागे।।
अंधास दिसेना समोर पदार्थ। शिव हृदयस्थ तसा जीवा।।
शेष म्हणे ज्याला लाभे ज्ञानदृष्टी। त्याला दिसे सृष्टी शिवरूप।।

## ५७. सकायस्थल

२५६ (१)

स्थूल मी शरीर कर्मे मीच करी। असा जो न धरी अभिमान।।
अशा ज्ञानयुक्त योग्याचे शरीर। ज्यात दृग्गोचर आत्मतत्त्व।।
त्याच्या देहा आत्मरूप समजून। करिती पूजन लोक त्याचे।।
आत्मज्ञान पूर्ण त्याला जरी झाले। देहाचे सरले प्रयोजन।।
परि त्याचा देह लोकांचे कल्याण। करावया पूर्ण उपयुक्त।।

जरी ज्ञानी तरी कायेत राहतो। सकायस्थली तो म्हणूनिया।।
शेष म्हणे देहधारी तो शंकर। त्यास वारंवार वंदी जग।।

२५७ (२)

क्रिया भाव ज्ञान यांना नाही स्थान। शरीरावाचून जगामध्ये।।
शरीर नसेल तर पूजा कशी। घडेल? मनासी विचारावे।।
भावनेला आहे शरीर आधार। ज्ञानाचा संस्कार देहाद्वारे।।
शरीरच नसे समजा जीवास। मुक्तीचा प्रयास करी कसा?।।
देहामुळे भोग मिळे, साधे योग। मग देहत्याग कशासाठी?।।
म्हणूनि 'सकाय' होऊनिया योगी। भ्रमतसे जगी शेष म्हणे।।

२५८ (३)

शिवज्ञानयुक्त महात्म्यास मुक्ती। देहामुळेच ती साध्य होते।।
ज्ञानप्राप्तीसाठी लागते शरीर। पण ज्ञानोत्तर अवस्थेत।।
शरीराने त्याच्या लोकाचे कल्याण। साधते म्हणून देही राहे।।
काष्ठाविण अग्नी होईना प्रकट। तसा आत्मा स्पष्ट देहाविण।।
पूजेसाठी जना लागे देवमूर्ती। तेणे भक्तिप्रीती मनी जागे।।
तसा ज्ञानियाचा पाहताच देह। मनी पूज्यभाव होय जागा।।
शेष म्हणे आत्मप्रभेचे वैभव। ओसंडे सदैव देहातून।।

२५९ (४)

निराकार परिपूर्ण महादेव। करी देह दिव्य धारण तो।।
सृष्टि-स्थिती आणि कराया संहार। होई महेश्वर देहरूपे।।
ब्रह्मादी देवता मुमुक्षू मुनी ते। देहाने तपाते आचरिती।।
सर्वसिद्धीसाठी तपस्या कारण। तपाचे साधन शरीरचि।।
शेष म्हणे नये देहत्याग करू। भवाब्धीचे तारू देह आहे।।



## ५८.अकायस्थल

२६० (१)

देहधारण योग्याचे। औपचारिक ते साचे।।
दिसे सामान्यच नर। पण नाही अहंकार।।
आत्मरूपी सदा रत। देहसंबंधरहित।।
त्याला काया असूनही। देहाभिमानच नाही।।
झाला शंकरासमान। मुक्त विकारांपासून।।
शेष म्हणे जो 'सकाय'। तोच जहाला 'अकाय'।।

२६१ (२)

परमानंद-चिद्रूप परलिंगी। जहाला परयोगी विलीन तो।।
मग कसे देहसंबंधाचे पाश। बांधूनि तयास ठेवितील?।।
दिसे कायधारी पण तो अकाय। झाले विश्व 'काय' त्याचे जाणा।।
विश्व हीच काया जहाली जयाची। त्याला शरीराची बाधा काय?।।
'शिव मी नाही' हा अहंकारजन्य। भ्रम नसे जाण त्याच्याठायी।।
नाही मी मनुष्य, देह न राक्षस। यक्ष न, प्रत्यक्ष मीच शिव।।
असे जाणे त्याला पीडा शरीराची। आणिक कर्मांची नाही नाही।।
शेष म्हणे अकायस्थली राहे देही। तरी तो विदेही पूर्णपणे।।

## ५९. परकायस्थल

२६२ (१)

वश प्रकृती करून। मायामार्ग उल्लंघून।।
झाला शिवरूप पूर्ण। तोच 'परकाय' जाण।।
शिवब्रह्म हेच 'पर'। 'काय' म्हणजे शरीर।।

काया ब्रह्मरूप झाली। तोच परकायस्थली।।
मग देह प्राकृतिक। कसा होईल बाधक?।।
सूक्ष्मदेह जन्मबीज। गेले जळूनि सहज।।
शेष म्हणे परकाय। अंतर्बाह्य शिवमय।।

२६३ (२)

मनोवृत्ती आणि इंद्रियव्यापार। लय होती परब्रह्माठायी।।
तेच परब्रह्म शरीराने झाला। भय काय त्याला प्रकृतीचे?।।
जळूनि संचित कर्म पूर्ण गेले। प्रारब्ध संपेल भोगूनि ते।।
फलापेक्षा नाही म्हणूनि निष्फळ। जहाले सकळ क्रियमाण।।
जेथे नाही कर्मफलाचेच नाव। तेथे पुनर्भव होई कसा?।।
शेष म्हणे दिसे वसलेला देही। परि नाही नाही सामान्य तो।।

२६४ (३)

आत्मस्वरूप चैतन्य। असे ज्योतिर्मय पूर्ण।।
असे ध्यान जो करितो। असे जीवन्मुक्तचि तो।।
आप-पर असा भाव। नेणे तयाची जाणीव।।
ज्याला स्वात्मबोध होय। त्याला असो नसो देह।।
चिदानंदप्रकाशित। त्याला जीवन्मुक्ती प्राप्त।।
शेष म्हणे परकाय। शिव झाला अंतर्बाह्य।।

२६५ (४)

सूर्य प्रकाशता अंधाराचे जाळे। तत्काळ वितळे संपूर्ण ते।।
तसे आत्मज्ञान होताच सत्वर। सरते संसारपीडा पूर्ण।।
सूर्य उगवता अंधाराची भीती। जशी लोकांप्रती वाटेनाच।।



तसे आत्मज्ञानानंतर संसार-। भय होई दूर शेष म्हणे।।

२६६ (५)

निवृत्ती, प्रतिष्ठा, विद्या आणि शांती। शांत्यतीत, असती पंचकला।।
पंचकलांतून पंचभूते होती। भूतांची निर्मिती शरीर हे।।
अशा शरीराचा अभिमान नाही। म्हणूनि विदेही परकाय।।
राहतो देहात अशी परिमित। भावना मनात नाही त्याच्या।।
म्हणूनि तो आहे देही वसलेला। भ्रम हा सगळा शेष म्हणे।।

## ६०. धर्माचारस्थल

२६७ (१)

परब्रह्मरूप जयाचे शरीर। विचरे भूवर परकाय।।
त्याचे वर्तनचि धर्माचार ठरे। जग अनुसरे पाहूनिया।।
सहजचि करी तो जे आचरण। लोकांचे कल्याण होय तेणे।।
त्याच्यासम वागे जनता सगळी। धर्माचारस्थली म्हणूनि तो।।
कर्मासवे त्याला नाही देणे घेणे। तरी घडे तेणे लोकहित।।
शेष म्हणे भ्रमे सर्व धरातळ। सहज दे बळ धर्माचारा।।

२६८ (२)

सत्य अहिंसा अस्तेय। दया क्षमा ब्रह्मचर्य।।
दान पूजा जप ध्यान। दशधर्म हेचि जाण।।
दशधर्म जो आचरे। त्याचे भवदु:ख सरे।।
त्याच्या उघडे समोर। मोक्षसदनाचे दार।।
रत नाही जो धर्मात। त्याची गणना प्राण्यात।।
इहलोक सोडताना। सवे लंगोटी येईना।।

धर्म बांधलेला गाठी। करी सोबत शेवटी।।
शेष म्हणे करी जीवा। धर्मसंग्रह बरवा।।

२६९ (३)

शिवागमांतून दहा धर्माचार। शिवे सविस्तर उपदेशिले।।
निष्ठेने जो पाळी नित्य आचारास। शिवप्रसादास समर्थ तो।।
ज्ञानपूर्वक नि निष्काम बुद्धीने। सर्व आचरिणे अप्रमादे।।
शास्त्रनिषिद्ध ती टाळूनिया कर्मे। विहितचि कर्मे आचरावी।।
विश्व शिवरूप प्राणी आत्मवत्। पाहावे समस्त ज्ञान हेचि।।
शिवरूप योग्यालाही मिळेना जी। वस्तू जगामाजी आहे कोठे?।।
शेष म्हणे अहं-ममत्वाचे खूळ। सरूनि निर्मल जहाला तो।।

२७० (४)

धर्माचार सर्व सिद्धींचे कारण। नि:स्पृहाने पूर्ण आचरावे।।
जरी ज्ञानामृते पूर्ण तृप्त झाला। तरी आचाराला त्यागू नये।।
पाठशाळेमध्ये अक्षरे सुरेख। गिरवी शिक्षक मुलांसाठी।।
अक्षरकामाठी नसे त्याच्यासाठी। शिकविण्यासाठी करणे लागे।।
तसा लोकासाठी सदाचरणाने। घालूनिया देणे आदर्श तो।।
सदाचार प्रिय अत्यंत शंभूला। त्याने तो पूजिला जाई खरा।।
शेष म्हणे द्यावा ज्ञानियाने पाठ। सोपी पायवाट करावी हो।।

## ६१. भावाचारस्थल

२७१ (१)

मनोवृत्ती घेई पूर्ण शिवाश्रय। तिला असे नाव 'भाव' असे।।



शिवयोग्याठायी हाच भाव स्थिर। होय दृग्गोचर जनलोका।।
त्याला पाहता तो जागे लोकचित्ती। तसेच वर्तती लोक मग।।
तेणे योगिभावा नाव भावाचार। असा हा विचार स्थलामध्ये।।
शेष म्हणे अंतर्बाह्य शिवार्पित। मनोवृत्ती सत्य भाव जाणा।।

२७२ (२)

शुद्ध भावे कर्म घडे। तेचि शिवाला आवडे।।
मन:पूर्वक जे केले। जाणा पावन ते झाले।।
शुद्ध भावनेचे कर्म। पावनांत ते पावन।।
होते शिवपूजा आदी। कर्मे भावनेची शुद्धी।।
भाव शुद्ध होता मन। होते निर्मलचि पूर्ण।।
शुद्ध भावे कर्म केले। तेचि पूर्णपणे फळे।।
शेष म्हणे जाग जाग। सद्भावाचा नको त्याग।।

२७३ (३)

नित्य नैमित्तिक कर्मेही घडता। शिव त्याचा कर्ता करविता।।
अशा शिवभावे निष्कामबुद्धीने। करी सर्व कर्मे शिवयोगी।।
तेणे कर्म-गुणदोष न बाधती। त्याने चित्तवृत्ती लिंपेचिना।।
ज्याचा भाव शुद्ध त्याचा सखा शिव। विवेक सदैव बाळगावा।।
शेष म्हणे होऊ नये कर्मस्पर्श। यालागी मनास सांभाळावे।।

२७४ (४)

प्रकाशे जो हृदयात। ज्ञानसूर्य सदोदित।।
त्याचे घडे जे चिंतन। तेचि संध्येचे वंदन।।
आत्मरूपी चिदग्नीत। केले विषय अर्पित।।
शिवयोग्याचे हे कर्म। तोचि जाणा असे होम।।

‘आत्मा मीच’ असे लय-। चिंतन हा होम होय।।
शिव संतुष्टचि व्हावे। कर्म असेच करावे।।
कर्म टाकी शिवावर। तोच होई भवपार।।
आत्मा, विश्व आणि शिव। एकरूप हेचि सर्व।।
शेष म्हणे ज्याचा भाव। तोच ओळखतो शिव।।

## ६२. ज्ञानाचारस्थल

२७५ (१)

योगियाचे ज्ञानयुक्त आचरण। करी दिग्दर्शन भक्तजना।।
तोच ठरे त्यांच्यासाठी ज्ञानाचार। म्हणूनि साचार स्थला नाव।।
शिवाद्वैतज्ञान हेच खरे ज्ञान। सांगती विद्वान शास्त्रवेत्ते।।
याविण जे ज्ञान शास्त्रसिद्धासिद्ध। नव्हे फलप्रद जाणावे ते।।
निर्मल ते शिवज्ञान मोक्षप्रद। बुडविते भेदज्ञान भवी।।
आस ज्याला मोक्षप्राप्तीची उत्कट। शिवज्ञानवाट चोखाळावी।।
जन्ममृत्युचक्र थांबविते पूर्ण। तेणे शिवज्ञान सर्वश्रेष्ठ।।
दाखवी जे ज्ञान परतत्त्व डोळा। त्यावरी आधारिला ज्ञानाचार।।
शेष म्हणे ज्ञानाचाराने वर्तावे। आणि धन्य व्हावे जन्मात ह्या।।

२७६ (२)

नष्ट झाले शिवभक्तीने अज्ञान। नाही भेदज्ञान म्हणूनिया।।
भेद न म्हणून राग-द्वेष नाही। उरलेच नाही जन्मबीज।।
जेथे नाही जन्म आणिक मरण। तीच परिपूर्ण मुक्ती असे।।
असे मुक्तिप्रदायक शिवाद्वैत। वरी आधारित ज्ञानाचार।।
ज्ञानाचारे परिपूर्ण शिवतत्त्व। होतसे ते प्राप्त शेष म्हणे।।



२७७ (३)

शिव विश्व एक जाणूनि अभेद-। भावाने जो सिद्ध वागे जगी।।
तोच ज्ञानाचारी, गुरुप्रसादाने। शिवज्ञान त्याने प्राप्त केले।।
मग संसाराची वाढविती आस। कर्मे ती कशास करील तो?।।
कर्म संसाराचे अनादी हे मूळ। जसे वाहे जळ अविरत।।
तसे आजवरी वाहात ते आले। तेणेचि मिळाले लक्ष जन्म।।
जाळिता ते मूळ शिवज्ञानाग्नीत। पुन्हा अंकुरित होत नाही।।
शिवज्ञान ज्याला त्याला कर्मबंध। करीनाच बद्ध शेष म्हणे।।

## लिंगस्थलांतर्गत माहेश्वरस्थल संपूर्ण

# लिंगस्थलांतर्गत प्रसादिस्थल

## ६३. कायानुग्रहस्थल

२७८ (१)

ज्याच्याठायी ज्ञानाचार। योगियाचे ते शरीर।।
परब्रह्मरूप झाले। सदा आत्मानंदी डोले।।
जना दर्शवूनि देह। करी पूर्ण अनुग्रह।।
तेणे कायानुग्राहक। त्याला म्हणे जनलोक।।
करी मूर्तिरूपे शिव। लोकांवरी अनुग्रह।।
तसे शरीरी राहून। करी जनांचे कल्याण।।
शेष म्हणे कायेद्वारे। भवदु:खचि तो हरे।।

२७९ (२)

लीलारूप करी शंकर धारण। तरी असे पूर्ण असंग तो।।
तसा शिवयोगी देहधारी असे। सुखदु:खी नसे लिप्त कदा।।
भेदबुद्धियुक्त शिवभावयुक्त। स्वरूप साक्षात् शंकराचे।।
ज्ञानानंद-महासागर शिवात। विलीन समस्त चित्तवृत्ती।।
तेणे मायाजन्य वस्तूचि दिसेना। मायेचा होईना उपद्रव।।
शिंप पाहताना दिसे चांदीसम। परि कळे भ्रम ज्ञान होता।।
तसा कळे शिवज्ञानाने प्रपंच। सकळ शिवच शेष म्हणे।।

२८० (३)

स्वप्नात प्रतीत होय जो पदार्थ। नाशे जागृतीत भान येता।।
तसे प्रपंचाचे रूप स्थूल भासे। शिवरूप दिसे ज्ञानाने ते।।
संसारभ्रमाचे कारण अज्ञान। नाशता ते भ्रम उरे कसा?।।
शाखा-फुले-पर्णसंभाराचा डौल। घेऊनि विशाल वृक्ष उभा।।



तसा परशिव आनंदाचा गाभा। सृष्टिरूपे उभा दृष्टीपुढे।।
शिवयोगी नाममात्र देहधारी। जगात विचरी शेष म्हणे।।

## ६४. इंद्रियानुग्रहस्थल

२८१ (१)

इंद्रियांची बाह्यप्रवृत्ती रोधून। शिवाकडे पूर्ण वळवितो।।
जणू इंद्रियांचा करूनि निग्रह। करी अनुग्रह त्यांच्यावरी।।
त्याचा पाहूनिया इंद्रियसंयम। लोक त्याच्यासम वर्तू पाहे।।
हाच लोकेंद्रियांवरी अनुग्रह। इंद्रियानुग्रहस्थल हेचि।।
जनांच्या स्वत:च्या इंद्रियांवरती। त्याची कृपाच ती शेष म्हणे।।

२८२ (२)

इंद्रिये धावता विषयांच्या मागे। राग-द्वेष जागे मनामध्ये।।
राग-द्वेषामुळे कर्मे करी जीव। गुंतवितो पाय भवचक्री।।
इंद्रिये करिता अंतर्मुख पूर्ण। मोक्षाचे कारण ठरती ती।।
शिवयोगी सदा असे अंतर्मुख। भोगी आत्मसुख अंतर्यामी।।
बहिर्मुख होता विश्व दिसे तरी। संचले अंतरी शिवरूप।।
शिवाविण त्याला दिसेनाच अन्य। इंद्रिये असून नसल्यासम।।
शेष म्हणे ज्याची दृष्टी शिवमय। त्याला अन्य काय जाणवेल?।।

२८३ (३)

वार्धक्य मरण देहाचे हे धर्म। देह-अभिमान नसे त्याला।।
भूक नि तहान प्राणाचे हे धर्म। त्याचा प्राण लीन शिवाठायी।।
वार्धक्य मरण, भूक नि तहान। त्याच्याठायी जाण नसतीच।।

मन राहे तेथे इंद्रिये राहती। त्याची चित्तवृत्ती शिवापाशी।।
मग बाह्य व्यापारात स्वच्छंद ती। इंद्रिये वर्तती कशी त्याची?।।
नेत्रांनी जे पाहे चिंतन मनाने। ते शिवरूपाने प्रकाशित।।
शेष म्हणे अंत:र्बाह्य वृत्तीद्वारे। शिवा ध्यात विचरे स्वच्छंदे तो।।

## ६५. प्राणानुग्रहस्थल

२८४ (१)

इंद्रियानुग्रहे योगी जो संपन्न। निरोधितो प्राण कुंभकाने।।
दृश्यमान जग शिवरूप पाहे। तसे ते पाहावे सकलांनी।।
उपकृत करी लोक अनुग्रहे। प्राणानुग्रह हे स्थल जाणा।।
शिवयोगी झाला प्राणायामयुक्त। तेणे नियंत्रित झाला प्राण।।
हाच प्राणावर त्याचा अनुग्रह। प्राणही अनुग्रह करी त्यावर।।
नियंत्रित प्राण आत्मरूपापाशी।। नेऊनि तयासी ठेवीतसे।।
असा परस्परांवरी अनुग्रह। प्राण-अनुग्रहस्थल आहे।।
शेष म्हणे योगपरिभाषेतून। केले विवरण स्थलात ह्या।।

२८५ (२)

परमकारण शिवाठायी प्राण। ज्याचा झाला लीन पूर्णपणे।।
थांबे त्याच्या बाह्येंद्रियांचा व्यापार। होईल संसारदर्शन कसे?।।
अपान उदान व्यान नि समान। आणिक तो प्राण पंचप्राण हे।।
त्यातील प्राणास प्राणायामाद्वारे। करी योगी सारे नियंत्रित।।
श्वासास रोधून कुंभक करून। शिवाठायी लीन प्राण करी।।
तेणे इंद्रियांचे विषयांशी नाते। सुटूनिया जाते पूर्णत:।।



मग इंद्रियेच होती अंतर्मुख। योगी आत्मसुख शांत भोगी।।
शेष म्हणे कुंभकानेच केवळ। करितो जवळ आत्मरूप।।

२८६ (३)

शरीरात प्राण वसे। तेणे जिवंत ते दिसे।।
प्राण निघूनिया गेला। लोक म्हणे, मेला मेला।।
शिवयोग्याचाही प्राण। झाला शिवाठायी लीन।।
शक्तिसंस्कारबळाने। त्याचे देहात राहणे।।
शिवप्रेरणे अखंड। हले-डोलते ब्रह्मांड।।
ज्याच्या हृदी त्याचा ठाव। त्याच्या देहा भय काय?।।
शेष म्हणे स्थाणुसम। राहे अचल तो पूर्ण।।

## ६६. कायार्पितस्थल

२८७ (१)

देहाभिमानाचा करूनिया त्याग। योगी विषयसंगमुक्त वर्ते।।
इष्टलिंग-पूजाप्रसंगी तो शांत। काया समर्पित करी शिवा।।
काया शिवाप्रती करणे अर्पित। हेचि कायार्पितस्थल जाणा।।
ज्याने देह दिला त्याच शिवास तो। करावा लागतो समर्पित।।
सुखे जी मिळती विषयांपासून। पूर्ण शिवार्पण करावी ती।।
विषयचि व्हावे प्रसादरूप ते। मग भोगिता ते भय नाही।।
सहजक्रियाच जेव्हा अशी घडे। पूजा ती आवडे शिवालागी।।
चाले तो सहज तीच प्रदक्षिणा। शब्द होय जाणा शिवस्तोत्र।।
शेष म्हणे इंद्रियसुखेच संपूर्ण। करी शिवार्पण निर्लिप्त तो।।

## ६७. करणार्पितस्थल

२८८ (१)

आंतर नि बाह्य इंद्रिये समस्त। करणे संयुक्त शिवासवे।।
यास करणार्पित स्थल असे जाण। दिले अभिधान शिवागमी।।
पंच ज्ञानेंद्रिये पंच कर्मेंद्रिये। आणि चतुष्टय अंत:करण।।
मन बुद्धी चित्त आणि अहंकार। असती ही चार अंतरेंद्रिये।।
अशी चौदा करणे अर्पितो जो चोख। तो करणार्पक म्हणविला।।
इंद्रियांच्या द्वारे मिळे जे जे सुख। सर्वचि ते देख समर्पावे।।
इंद्रिये शिवाला करिता अर्पित। होती नियंत्रित शेष म्हणे।।

२८९ (२)

अंत:करण हा उन्मत्त कुंजर। त्याला अहंकारमद चढे।।
त्याला शिवरूप स्तंभा जखडितो। निश्चित असे तो धैर्यधर।।
सर्व इंद्रियांचा स्वामी मन असे। मन सांगे तैसे वर्तती ते।।
शत्रुसेनापती लागताच हाती। त्याची ये शरण ती जशी सेना।।
तसे मन पूर्ण शिवास अर्पिता। इंद्रियेही हाता सर्व येती।।
शेष म्हणे ज्याने जिंकिले मनाला। वश झाली त्याला सर्वेंद्रिये।।

२९० (३)

आली सर्वेंद्रिये हाती। त्याला म्हणती निवृत्ती।।
मग संसाराचे भय। नाशे होय तो निर्भय।।
इंद्रियांस वश केले। शांती समाधान मिळे।।
मन:शांती ही कुऱ्हाड। तोडी भवविषझाड।।
होई इंद्रियांपासून। पुण्यपाप ते उत्पन्न।।
होता इंद्रिये अर्पण। नाशे कर्मांचे बंधन।।
जेथे पुण्यपाप नाही। तेथे मुक्ती उभी पाही।।



शेष म्हणे घ्या जाणून। जन्ममृत्यूचे कारण।।

२९१ (४)

अग्नीत होमिला पदार्थ जो काही। भस्मसात होई पूर्णत:।।
तसा अंत:स्थित चिदग्नि-शिवाला। विषय अर्पिला नाश पावे।।
मग त्यास नसे संसाराची बाधा। जन्ममृत्यू कदा स्पर्शती ना।।
'परशिवाविण भिन्न नसे काही। शिवरूप मीही असे पूर्ण'।।
ज्ञान हे चिदग्नी, त्यात समर्पित। विषयांसहित चित्त करी।।
शेष म्हणे काया करणांसहित। करावी अर्पित बोधिते हे।।

## ६८. भावार्पितस्थल

२९२ (१)

शिवाला निश्चल अर्पावी भावना। ते हे स्थल जाणा भावार्पित।।
वरी जाया लागे आधार वेलीला। तसा भावनेला विषयांचा।।
संसारविषय सारूनि ते दूर। जर शिवाधार दिला तिला।।
तर ती भावना जीवाला घेऊन। बैसवी नेऊन मोक्षपदी।।
अनुभवरूपे पदार्थचिंतन। मनी चाले पूर्ण तोच भाव।।
त्याच चिंतनाला लावाया वळण। शिवास अर्पण करणे लागे।।
शेष म्हणे भाव शिवाला अर्पिले। मुक्तीचे किलकिले होई दार।।

२९३ (२)

भावच कारण बंध नि मोक्षाला। शुद्ध भावनेला मुक्ती लाभे।।
शिवोऽहंचिंतन हीच भावशुद्धी। तेणे मोक्षपदी बसे जीव।।
'शिव मी नाही' हा भाव विपरीत। होई न निवृत्त भवदु:ख।।
अविद्येचे कार्य नामरूपात्मक। विश्व हे मिथ्यक जाणतो तो।।
शिवध्यानी मग्न त्याला मायापाश। ठेविती कशास जखडूनी?।।

क्रिया शिवपूजा शब्द शिवस्तुती। कशाला करिती कर्मे बद्ध?।।
सुखदु:ख सर्व करी लिंगार्पित। तोच जीवन्मुक्त शेष म्हणे।।

## ६९. शिष्यस्थल

२९४ (१)

भावार्पितयुक्त परयोग्याकडे। घेई ज्ञानधडे तोचि शिष्य।।
गुरुकृपेने तो अपेक्षितो मोक्ष। यास असे साक्ष आगमांची।।
ज्याच्या मनी नांदे मुक्तीची प्रबळ। पूर्ण तळमळ शिष्य तोचि।।
ज्ञानवैराग्यादी गुणांनी मंडित। गुरूठायी चित्त स्थिर पूर्ण।।
करी गुरुध्यान गाई गुरुस्तोत्र। करितो पवित्र गुरुपूजा।।
शेष म्हणे गुरूठायी मूर्तिमंत। ज्ञान पाहे शांत शिष्यवर्य।।

२९५ (२)

शांत दांत सत्यवादी। तपोनिष्ठ समबुद्धी।।
ज्याच्या अंगी हे सद्गुण। रूपा आले शिष्यपण।।
मनावर नियंत्रण। जाणावा तो 'शांत' गुण।।
आली इंद्रिये कह्यात। तोच असे गुण 'दांत'।।
खरे बोलतो सदैव। त्याला 'सत्यवादी' नाव।।
पाळी योगांगे ती अष्ट। तोच जाणा 'तपोनिष्ठ'।।
दिसो सोने किंवा माती। राजा रंक जातिपाती।।
असो गुरू शिष्य कोण। कोणी मोठा नि लहान।।
मानी एकचि समान। तोच 'समबुद्धी' पूर्ण।।
शेष म्हणे ज्याच्या अंगी। सद्गुण, तो शिष्य जगी।।

२९६ (३)

शिवाचार शिवध्यान-ज्ञान यांत। प्रमाण निश्चित गुर्वाज्ञा ती।।



गुरूला पुसावे प्रश्न मनातले। संदेहाचे जाळे निरसावे।।
वडवाग्नी असे गुरूचा कटाक्ष। आटवी प्रत्यक्ष मायासिंधू।।
लोखंडाचे सोने रसायने होते। शिवत्व लाभते गुरुस्पर्शे।।
'शिव विश्व एक, शिव ज्ञानरूप। असशी चिद्रूप तूही वत्सा'।।
गुरूपदेश हा लाभता शिष्याला। लाभते तयाला जीवन्मुक्ती।।
शेष म्हणे भवरूपी महारोग। फेडिते सवेग गुरुमाय।।

## ७०. शुश्रूषुस्थल

२९७ (१)

परब्रह्मरूप गुरूपदेशात। अत्यंत आसक्त चित्त ज्याचे।।
गुरूला सर्वदा बोलाया लावतो। भक्तीने ऐकतो पुन:पुन्हा।।
जिज्ञासू तो शिष्य शुश्रूषु जाणावा। निर्मितो ओलावा गुरुचित्ती।।
नित्य काय जगी काय अनित्य ते?। शिवतत्त्व कोणते? जीव कोण?।।
काय आत्मानात्म, तत्त्व ते उत्कृष्ट?। मुक्तीची का वाट धरावी मी?।।
असे जाणण्याची ज्याच्या मनी आस। ज्ञानाचा लालस शुश्रूषु तो।।
शेष म्हणे अंगे सेवी जो गुरूस। त्याच्याही परिस उत्तम हा।।

२९८ (२)

पुन:पुन्हा ऐके श्रीगुरूचे बोल। अनुभवी खोल शांतिसुख।।
संतुष्ट होईना जिज्ञासा जोवरी। ऐकावी तोवरी गुरुवाक्ये।।
सुवर्णकुंडले माणिक नि रत्ने। कर्णाची भूषणे नव्हेत ती।।
श्रीगुरुवाणीचे सर्वदा श्रवण। खरेच भूषण कर्णाचे हे।।
सूर्यकिरणांच्या स्पर्शाने कोमल। उमले कमल सर्वांगाने।।
तसे गुरुवाक्ये शिष्यहृत्कमल। होतसे उत्फुल्ल चिदानंदे।।
सूर्यप्रकाशाने मणी सूर्यकांत। होई प्रकाशित तेज:पुंज।।

शेष म्हणे गुरुकृपा-कटाक्षाने। शिष्या ज्ञान होणे सहजचि।।

२९९ (३)

नम्रभावे जावे गुरूला शरण। दोकर जोडून विनवावे।।
'गुरुदेवा, श्रेष्ठ काय ह्या जगात?। कशावर जगत् आधारिले?।।
जीवा मोक्ष प्राप्त होतो कोणामुळे?। मजला सगळे निरूपावे'।।
सच्छिष्याचे प्रश्न गुरूने ऐकून। समाधान पूर्ण करावे ते।।
'शिवतत्त्व ज्ञेय, त्याहून जे भिन्न। नसे सनातन जाण वत्सा।।
नामरूपात्मक विश्वाचा आधार। तेच परात्पर शिवतत्त्व।।
शिवोऽहंभावाने शिवसाक्षात्कार। होता होय स्थिर जीवन्मुक्ती।।'
शेष म्हणे अशा गुरूपदेशाने। संसारबंधने ध्वस्त होती।।

## ७१. सेव्यस्थल

३०० (१)

आस्वादूनि पूर्ण गुरुवाक्यामृत। केले शिवाद्वैत प्राप्त ज्याने।।
शुश्रूषु तो सेवा घ्यावया उचित। ठरतो लोकांत तेणे सेव्य।।
त्याच्या हृदी शिवज्ञान झाले स्थिर। शिवसाक्षात्कार झाला त्याला।।
म्हणूनि तो शिष्य श्रीगुरूसमान। ठरे पूज्यमान जगतात।।
ज्या ज्ञाने गुरूला श्रेष्ठत्व लाभले। तेचि प्राप्त झाले शिष्यासही।।
शिवोऽहंभावाच्या अभ्यासेकरून। शिवभाव पूर्ण आला अंगी।।
म्हणूनि शुश्रूषु शिवाच्या समान। पूजनीय जाण ठरे जगी।।
शेष म्हणे सर्व जगताकडून। सेव्य होई पूर्ण सेव्यस्थली।।

## लिंगस्थलांतर्गत प्रसादिस्थल संपूर्ण



# लिंगस्थलांतर्गत प्राणलिंगिस्थल

## ७२. आत्मस्थल

३०१ (१)

श्रीगुरूने दिले दिव्य शिवज्ञान। तेणे आत्मलीन सेव्यस्थली।।
त्याचा मावळूनि पूर्ण जीवभाव। जागे आत्मभाव अंतर्यामी।।
'नव्हेच मी देह हाडा नि मांसाचा। असे तो काळाचा घास पक्का।।
त्याच्या पलीकडे तेजस्वी चिद्रूप। तेच खरे रूप माझे आहे।।
जन्म नाही मला मरणही नाही। व्याप्त मी सर्वही विश्वामध्ये।।
शिवतत्त्व मीच विश्वात भरलो। तरीही जहालो विश्वातीत'।।
शेष म्हणे असा पूर्ण आत्मभाव। म्हणूनीच नाव आत्मस्थली।।

३०२ (२)

केशाग्राच्या शत अंशासमान तो। जीवात्मा राहतो हृदयात।।
शुभाशुभ कर्मफलांस भोगीत। करी प्रकाशित शरीराला।।
गृही कोपऱ्यात तेवे दीपकळी। सर्वही उजळी घर जसे।।
तसा हृदयस्थ आत्म्याचा प्रकाश। राहे शरीरास व्यापूनिया।।
आत्मा जरी पंचभूतांचा आश्रय। तरी अणुभाव येई त्याला।।
आणव-मायीय-कार्मिक मलांनी। राहे तो वेढूनि सर्वकाळ।।
तेणे त्याच्याठायी येई जीवभाव। स्वत:लाच देह मानू लागे।।
कर्म करूनिया बंधनात पडे। सर्वदा भरडे भवचक्री।।
शेष म्हणे आत्मा मुळीचाच शुद्ध। पण होई बद्ध अज्ञानाने।।

३०३ (३)

निर्मल स्फटिक पारदर्शी शुद्ध। ठेविला जास्वंदफुलावरी।।
तर तो फुलाच्या रंगाने रंगला। दिसतो दृष्टीला सर्वांच्याच।।

पण तो मुळात नसेचि रंगीत। फुलाची संगत भोवे त्याला।।
तसा आत्म्याठायी नाही अभिमान। परि येई जाण देहामुळे।।
देह-अहंकारे भरूनि फुरफुरे। घाली जन्मफेरे पुन:पुन्हा।।
शेष म्हणे आत्मा शुद्ध बुद्ध मुक्त। पण दिसे व्याप्त संसारात।।

३०४ (४)

शरीररहित निष्कलंक पूर्ण। आत्मा विद्यमान सर्वठायी।।
मायेने कल्पित देही होई स्थिर। भ्रमतो संसारचक्री सदा।।
शिवासवे शक्ती, माया ती प्रकृती। सदैव उभी ती जीवापुढे।।
विश्व जरी मूळ शिवरूप आहे। तरी दिसताहे मायारूपे।।
विश्वरूपे जड आणिक लाघवी। रूपाने मोहवी जीवा तीच।।
आच्छादिला मेघे सूर्य तो दिसेना। प्रकाश मेघांना सूर्याचाच।।
तशी मायाशक्ती लपवी शिवाला। दिसे ती जीवाला शिवामुळे।।
तिनेच कल्पिल्या देही आत्मा राहे। सदा भ्रमताहे शेष म्हणे।।

३०५ (५)

आत्मा हा शिवांश मायादेही वसे। आणि भोगीतसे कर्मफळे।।
सहस्र दर्पणी बिंबे सूर्य एक। दिसती अनेक प्रतिबिंबे।।
तसे एक आत्मतत्त्व सर्व देही। व्यापूनिया राही जाणावे हे।।
प्राकृत शरीरेंद्रियांच्या पासून। असे पूर्ण भिन्न आत्मतत्त्व।।
'ब्रह्मरूप ते' हे जीवा होता ज्ञान। येई आत्मभान आत्मलाभे।।
आत्मा स्वभावत: शरीररहित। देहबंधे लिप्त नव्हे कधी।।
अज्ञान-कर्माने दिसे देहधारी। सुखदु:खे सारी भोगताना।।
आत्मा जीव नाही देव न गंधर्व। यक्ष राक्षस जीव तिर्यक् नव्हे।।



नव्हे तो स्थावर वृक्षवनस्पती। पुरुष नारी ती नाही नाही।।
शेष म्हणे धारण करी ज्या देहाला। जाई ओळखिला त्याच नावे।।

३०६ (६)

विश्व हीच जणू रंगभूमी एक। त्यावरी नाटक शिव करी।।
नाना जीवरूपे तोच होई पात्रे। चित्र नि विचित्रे असंख्य ते।।
पात्रे सर्व जणू बाहुल्यांच्या जाती। सूत्रदोरी हाती ठेवी स्वत:।।
ज्याचे जसे कर्म त्याला तसा जन्म। देई फलकर्म भोगवितो।।
प्रत्येकाची बुद्धी भिन्न धर्म पंथ। संकल्पाची जात भिन्न मार्ग।।
जीव पराधीन अल्पज्ञानी साचे। किंचित् कर्तृत्वाचे धनी होती।।
शंकराच्या लीलानाटकात सर्व। भूमिकाच जीव करिती ते।।
शेष म्हणे असे अखंड नाटक। शिव जगन्नायक करीताहे।।

३०७ (७)

जसे ज्याचे कर्म फळे। तसा त्याला जन्म मिळे।।
पुण्य फळताचि मग। जीव भोगी स्वर्गभोग।।
कोणा मिळे स्वर्गलोक। दैवी कोणाच्या नरक।।
मृत्युलोकात जन्मूनी। कोणी वाहे दु:खगोणी।।
मुळी होता न विश्रांत। भ्रमे घोर संसारात।।
मरे पुन्हा गर्भवास। असा अखंड प्रवास।।
त्रिमलांनी कल्पिलेले। आत्म्या जीवत्व मिळाले।।
सुखदु:खाचे गाठोडे। जीवा वाहाणेच पडे।।
शेष म्हणे ज्ञानामुळे। जीवा शिवत्व ते मिळे।।

## ७३. अन्तरात्मस्थल

३०८ (१)

गुरुबोधे नष्ट होता जीवभाव। अन्तरात्मभाव होई प्राप्त।।
जीव देही राहे तरी देहसंगे। त्याचा नच रंग लागू देई।।
अंतरात्मभाव प्राप्त होय त्याला। तेणे म्हणविला अंतरात्मा।।
आत्माच भोगितो सर्व सुखदुःखे। बोलती कौतुके असे जरी।।
शुद्धात्म्याला नच स्पर्शे कर्मभोग। भोगणे ते मग दूर आहे।।
गढूळ जलात सूर्य मळलेला। दिसे तरी त्याला लेप नाही।।
शेष म्हणे हेचि दृढ होई ज्ञान। असा ज्ञानवान अंतरात्मा।।

३०९ (२)

जीव आणि शिव यांच्या मध्यस्थली। अन्तरात्मस्थली वावरे तो।।
देही राहिल्याने अंगी जीवभाव। तरी शिवभाव गुरुबोधे।।
जीवभाव राहे होता बहिर्मुख। होता अंतर्मुख शिवभाव।।
जीव आणि शिव यांच्या मध्यावर। असे निरंतर दोन्ही भावी।।
परि जीवत्व हा मूळ भाव नाही। असे जाणीव ही परिपूर्ण।।
दिसे पडलेली जीवत्वाची मिठी। तरी दृढ पोटी शिवभाव।।
शेष म्हणे असा अन्तरात्मस्थली। राहे मध्यस्थली गुरुबोधे।।

३१० (३)

जन्मे कमळ जलात। जलापासून अलिप्त।।
पक्षी खोप्यातच राहे। पण वेगळा तो आहे।।
तसा अन्तरात्मा देही। तरी देहसंग नाही।।
पूर्णचंद्र नभातला। दिसे मेघे आच्छादिला।।



मेघापासून तो दूर। सर्व जाणती चतुर।।
तसे अहंममत्वादी। देहेंद्रियादी उपाधी।।
अन्तरामस्थलीप्रती। नच कधीही स्पर्शती।।
शेष म्हणे मुक्तात्मा तो। आत्मानंदात रमे तो।।

## ७४. परमात्मस्थल

३११ (१)

संसारकारण अज्ञान नाशले। सामरस्य झाले परात्म्याशी।।
म्हणून तयाला परमात्मस्थली। अशी संज्ञा दिली आगमांनी।।
सर्व आत्म्यांहून शिव श्रेष्ठ जाण। स्वतेजे व्यापून विश्वी आहे।।
ज्याच्या मायामहासागरी जन्मती। आणिक निमती ब्रह्मांडे ती।।
स्फुल्लिंग जन्मती जसे अग्नीतून। त्यातच विलीन सर्व होती।।
परमात्म्यापासून तसे होती जीव। पावती विलय त्यात पूर्ण।।
समुद्रात होई लाटांची उत्पत्ती। पुन्हा त्या जिरती समुद्रात।।
तशी सर्व तत्त्वे जन्मती ज्यातून। ज्यात विलीन तो परमात्मा।।
असे परमात्मरूप म्हणे शेष। वर्णिताही शेष राहेच ते।।

३१२ (२)

मलसंबंधरहित। विश्वा आधार समस्त।।
छत्तीसही तत्त्वांहून। श्रेष्ठ परमात्मा पूर्ण।।
जग तेजाने व्यापून। सूर्य प्रकाशे आपण।।
तसे आपुल्या शक्तींनी। विश्व राहे तो व्यापूनी।।
जगी तोच भासमान। विश्वमायाविलक्षण।।

मुक्तिवाटेने जो चाले। त्याच्या बुद्धीला उजळे।।
शेष म्हणे जगतात। सर्व परमात्मा व्याप्त।।

□

## ७५. निर्देहागमस्थल

३१३ (१)

देहधारी तरी देहबुद्धी नाही। म्हणूनि निर्देही स्थिती प्राप्त।।
अहंममतेला पिटाळून दुरी। पराहंता घरी आणियेली।।
ज्याने पराहंता आपलीशी केली। तयाला कसली देहप्रीती?।।
त्याला शरीराचा नाही अभिमान। आणि प्रेम जाण नसे तेही।।
चैतन्यसागरी त्याचे मन डुंबे। त्याला काय झोंबे देहसंग?।।
शेष म्हणे झाला निर्देही पुरता। त्याला देहचिंता नाही नाही।।

३१४ (२)

आत्मा नाही परिच्छिन्न। असे अखंड तो पूर्ण।।
असे करितो चिंतन। नाही इंद्रियबंधन।।
आत्म्याविण वस्तू अन्य। मोठी नाही ज्याला मान्य।।
त्याला पदार्थ प्राकृत। कसा करील मोहित?।।
महाकाश एक असे। घटी परिच्छिन्न भासे।।
तसे आत्मतत्त्व एक। देही दिसे ते अनेक।।
असे जाणे तो स्वत:ला। देह मानील कशाला?।।
मनी रुजता अद्वैत। देशोधडी होई द्वैत।।
शेष म्हणे राहे देही। पण पूर्ण तो विदेही।।

□



## ७६. निर्भावागमस्थल

३१५ (१)

आत्मरूपाविण अन्य भाव भिन्न। त्यांचे निरसन झाल्यावरी।।
इंद्रियविकारशून्य शुद्ध भाव। त्यालाच निर्भाव म्हणितले।।
ज्याच्याठायी रुजे निर्भाव संपूर्ण। तो निर्भावागमस्थली आहे।।
भावनेचा बाह्य काढता आधार। आत्म्याठायी स्थिर तीच होते।।
'ब्रह्म मीच आहे' अशा भावाठायी। 'आत्मा' नि 'मी' पाही वस्तू दोन।।
उरलेले आहे तेथे द्वैत थोडे। त्याच्यापलीकडे निर्भाव तो।।
'मी' आणिक 'ब्रह्म' याची न जाणीव। तो असे निर्भाव शेष म्हणे।।

३१६ (२)

द्वैताचा अभाव पूर्ण ब्रह्मभाव। त्यालाच निर्भाव संबोधिती।।
भाव शिवमय होता परिपूर्ण। मन होते मौन त्याचठायी।।
अन्य भावनेचे कारण नुरते। निर्भावागम ते स्थल जाणा।।
जातिवर्णाश्रम शरीरसंबंध। संसाराचा बंध नाही तेथे।।
त्याला भावनेचा संबंधच नाही। शिवभावे पाही सर्व सृष्टी।।
जरामृत्यु-क्षुधातृषेला न भितो। निमग्न सदा तो आत्मानंदी।।
शेष म्हणे असा निर्भावागम तो। जगी विचरतो स्वच्छंदाने।।

□

## ७७. नष्टागमस्थल

३१७ (१)

भेदशून्य महाशिवाद्वैत ज्ञान। तेथे उरेचि न त्रिपुटी ती।।
ज्ञेय ज्ञाता ज्ञान अशा त्रिपुटीला। तेथे न उरला अर्थ काही।।
जाणावे ते ज्ञेय, ज्ञान नसे जेथे। ज्ञान कसे तेथे असेल हो?।।

त्रिपुटीमय ते नष्ट झाले ज्ञान। स्थल हे म्हणून नष्टागम।।
शिवाद्वैते ज्याचे मन पूर्ण भरे। दिसेना दुसरे त्याला काही।।
अन्य पदार्थाची जाणीवच नाही। असा तो विदेही शेष म्हणे।।

३१८ (२)

'मी न कर्ता ज्ञाता देहरहित मी'। चिंतन नेहमी करितो जो।।
त्याच्याठायी ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान। असे भेदभान उरेचिना।।
रागद्वेषमुक्त स्वविमर्शात। विलीन विरक्त शिवयोगी।।
त्याने जाणावी ती वस्तू या जगात। नसे अस्तित्वात कोणतीच।।
जाणण्याची वस्तू जाणणारा 'मी' ही। यासह सर्वही लोपे ज्ञान।।
सागरतरंगन्यायाने हे विश्व। त्याला पूर्ण शिवरूप दिसे।।
शेष म्हणे शिवाविण अन्य काही। पाहातचि नाही शिवयोगी।।

## ७८. आदिप्रसादिस्थल

३१९ (१)

विश्वाधार आणि विश्वनियामक। असा शंभू एक 'आदि' आहे।।
शिवप्रसादाने विकाररहित। स्थिती ज्याला प्राप्त झाली असे।।
त्यालाच 'आदिप्रसादी' म्हणून। ओळखिती जन विवेकी ते।।
जन्मजन्मांतरी पुण्य साठविले। त्यामुळे गळाले भेद सर्व।।
त्याला मुक्ती देण्यासाठी आदिदेव। करी अनुग्रह त्याच्यावरी।।
शेष म्हणे तेणे आदिप्रसादी हे। मिळालेले आहे नाव त्याला।।

३२० (२)

शिवयोग्याला त्या सारे जगजाळे। भासेना निराळे शिवाविण।।
दृष्टीपुढे जे जे दृश्य उभे राहे। शिवरूप पाहे त्याच्यामध्ये।।



सागरावरती उठले तरंग। असती ते अंग सागराचे।।
तसे भिन्न भिन्न सारे जीव, सृष्टी। एक परमेष्ठी शिव आहे।।
शिवप्रसादाने अज्ञानाची ग्रंथी। भेदिताच मुक्ती उभी राहे।।
सूर्योदयाविना अंधार नाशेना। शिवकृपेविना मुक्ती नाही।।
आदिदेव कृपा करी जीवांवर। तेणे मुक्तिद्वार खुले होय।।
शेष म्हणे अनुग्रह हा स्वभाव। असा परशिव मुक्तिदाता।।

## ७९. अन्त्यप्रसादिस्थल

३२१ (१)

छत्तीस तत्त्वांच्या लयास आश्रय। असे परशिव तोच 'अन्त्य'।।
ज्याच्यामध्ये होई ब्रह्मांडांचा अंत। ब्रह्मांडांचे अन्त्यस्थल तेचि।।
शिव जसा 'आदि' सकल सृष्टीचा। तसा तो तियेचा 'अन्त्य' असे।।
आदि-मध्य-अन्त्य तोच एकमेव। गर्जताती सर्व शिवागम।।
सकल सृष्टीचा झाल्यावर अंत। शेष राहे 'अन्त्य' तत्त्वचि ते।।
अन्त्य त्या शिवाचा साक्षात्कार होतो। अन्त्यप्रसाद तो असे जाणा।।
शेष म्हणे मिळे प्रसाद तो ज्याला। अन्त्यप्रसादी त्याला नाव साजे।।

३२२ (२)

लयचिंतनात शिवयोगी मग्न। ज्या क्रमे उत्पन्न सृष्टी झाली।।
नभ वायू तेज जल पृथ्वी क्रम। सांगती सुजाण शास्त्रवेत्ते।।
पृथ्वीचा जलात जलाचा तेजात। तेजाचा वायूत लय होतो।।
वायू आकाशात आकाश मायेत। माया ती शिवात लय पावे।।
लयचिंतन हे करिता अशेष। अंती राहे शेष शिवतत्त्व।।

शिवतत्त्वाला त्या पाहणे आत्म्यात। हेच या स्थलात सार आहे।।
शेष म्हणे लयचिंतन करिता। मोक्ष ये आयता हातामध्ये।।

३२३ (३)

हा देव हा प्राणी ही नारी हा नर। भेदव्यवहार मायेचा हा।।
सामान्य दृष्टीला दिसती हे भेद। लाभली अभेददृष्टी ज्याला।।
मायाकल्पित हे भेद नातळती। सर्वही ते होती शिवरूप।।
मायाच शिवात लीन झाली जेथे। दिसतील तेथे भेद कसे?।।
अस्तित्वच नाही ज्ञेय प्रपंचास। ज्ञाता नि ज्ञानास पुसे कोण?।।
गाढ निद्रा येता वस्तुभान नसे। मुक्तात्म्यास तसे प्रपंचाचे।।
शेष म्हणे आहे शिवज्ञानी, पण। प्रपंचाचे भान हरपले।।

३२४ (४)

नभ जसे अविच्छिन्न। असे निर्विकार पूर्ण।।
तसा जीवन्मुक्त योगी। रूपे प्रकाशतो जगी।।
त्याला प्रपंचाशी काही। देणे घेणेच ते नाही।।
होऊनिया कृतकृत्य। रमे आत्मसुखी नित्य।।
झाला शिवाद्वैती लीन। हरे इंद्रियांचे भान।।
शेष म्हणे पूर्वपुण्ये। असा महात्मा पाहाणे।।

## ८०. सेव्यप्रसादिस्थल

३२५ (१)

श्रीगुरूच असे सर्वांसाठी सेव्य। असे परशिव प्रत्यक्ष तो।।
तयाच्या प्रसादे परमानंदरूप। होय आपोआप प्रकाशित।।



गुरुबोध हाच जाणावा प्रसाद। दोहोंत अभेद पूर्ण असे।।
गुरू नि प्रसाद अभिन्न मानतो। सेव्यप्रसादी तो म्हणविला।।
गुरू हाच शिव शिव हाच गुरू। यात नये करू भेद कधी।।
वाणीमनास जे तत्त्व अगोचर। त्यात निरंतर निमग्न जो।।
शिवयोग्याला त्या अन्य विषयांत। रती ती किंचित् असेचिना।।
शेष म्हणे ओठी अमृताची वाटी। तो का कांजीसाठी लाळ घोटे?।।

३२६ (२)

शिवानंदी झाला लीन। नाही कर्मांचे कारण।।
ज्याला प्राप्त शिवयोग। त्याला नको हठयोग।।
मंत्रयोग राजयोग। कशाला तो लययोग?।।
तपस्येचा न प्रयास। नको जप ध्यान ध्यास।।
शेष म्हणे निरंतर। आत्मचिंतनात चूर।।

**लिंगस्थलांतर्गत प्राणलिंगिस्थल संपूर्ण**

# लिंगस्थलांतर्गत शरणस्थल

## ८१. दीक्षापादोदकस्थल

३२७ (१)

गुरु-शिष्य भिन्न असे द्वैतज्ञान। जाई मावळून दीक्षेमुळे।।
गुरूच्या हृदयी वसे दिव्यानंद। प्रकटे सुखद शिष्यमनी।।
श्रीगुरु-शिष्याच्या आनंदाचे ऐक्य। दीक्षापादोदक तेचि जाणा।।
गुरू आणि शिष्य दोन ह्या उपाधी। परि निजानंदी एकरूप।।
दोन घटांमध्ये गंगाजल भिन्न। भासे परि जाण एकच ते।।
शेष म्हणे दोही आनंदाचे ऐक्य। निरूपिले देख स्थलात ह्या।।

३२८ (२)

गुरू हाच 'पाद' शिष्य हा 'उदक'। त्यांच्यात भावैक्य दीक्षेमुळे।।
निर्मल तो परानंद 'पाद' जाण। त्याचे पूर्ण ज्ञान 'उदक' ते।।
आनंद-ज्ञानाचे हृदयी जे ऐक्य। दीक्षापादोदक तेच आहे।।
दीक्षापादोदकसंपन्न तो योगी। अंतर्यामी भोगी ऐक्यसुख।।
परानंदभाव प्रकाशला मनी। पाहेना नेत्रांनी भेद कोठे।।
अपेक्षीना काही प्रपंच न पाही। असा दिव्यदेही महात्मा तो।।
ब्रह्मज्ञानामृतास्वादात तो दंग। नाही भवसंग शेष म्हणे।।

## ८२. शिक्षापादोदकस्थल

३२९ (१)

गुरुबोधे प्राप्त ज्ञानाचे मनन। तोच असे जाण शिक्षागुरू।।
ज्ञान नि मनन यांचे होता ऐक्य। पाझरते सुख अपरंपार।।
त्याच सुखा येथे शिक्षापादोदक। दिधले सुरेख नाव पाहा।।



निगम-आगम-महासागरास। लागे मंथायास युक्तिरवी।।
मंथन करिता शिवाद्वैतामृत। तेव्हा होय प्राप्त शिष्याप्रती।।
शेष म्हणे ज्याचे विशुद्ध अंतर। अमृत मधुर लाभे त्याला।।

३३० (२)

झरे शिवाद्वैतज्ञानचंद्रातून। परानंदपूर्ण चांदणे ते।।
तेणे मुक्तिरूपी रात्रीत उजळे। शिष्याचे आगळे हृदाकाश।।
चकोराची बाळे चांदण्यामधले। टिपती कोवळे अमृतकण।।
तसा शिष्य अति हळुवारपणे। ज्ञानाचे चांदणे अनुभवी।।
देशकालविवर्जित ज्ञानामृत-। साक्षात्कारे मुक्त होय पूर्ण।।
शेष म्हणे त्याला जाणण्यासारखे। पाहण्यासारखे काही नाही।।

३३१ (३)

ज्याचे घर उभे गंगानदीकाठी। तो का पाण्यासाठी खोदे कूप?।।
ज्याच्या ओठी नित्य अमृतचि पडे। तो का कांजीकडे पाहे कधी?।।
ज्याच्या घरी नित्य पक्वान्न भोजन। कशाला भिक्षान्न मागेल तो?।।
तसा ज्याला ब्रह्मानंदलाभ झाला। विषयसुखाला अपेक्षीना।।
रागद्वेष-लाटा नसती ज्यावरी। त्या सुखसागरी निमग्न जो।।
त्याच्या आनंदाला मर्यादा कसली। अवघी खुंटली बोली तेथे।।
शेष म्हणे गुरुकृपाचंद्रामुळे। त्याचे विकासले मनोपद्म।।

## ८३. ज्ञानपादोदकस्थल

३३२ (१)

शिवयोग्यास ये आनंदानुभूती। आणि राहे चित्ती दर्वळत।।
आनंद-ज्ञानाचे समरसपण। हेच असे ज्ञानपादोदक।।

स्पर्शे न अज्ञानराहू, निष्कलंक। प्रकाशतो एक ज्ञानचंद्र।।
अज्ञानाचे मेघ दूर होता ज्ञान-। सुधाकर पूर्ण प्रकटतो।।
मग निजानंदसागरा भरती। येऊनि तो वरती उधाणतो।।
शेष म्हणे ज्ञानचंद्र तो उजळे। मोहतम पळे पार दुरी।।

३३३ (२)

सूर्य ज्ञानाचा उजळे। मायारजनी मावळे।।
योगी व्यापार सोडून। होय निद्रेतच मग्न।।
हे तो नवलचि घडे। त्याची निद्रा नच मोडे।।
जेथे संसारव्यापार। तेथे जागा अज्ञ नर।।
जागा सर्व जनलोक। योगी भोगे निद्रासुख।।
शेष म्हणे याचा अर्थ। योगी संसारी अलिप्त।।

३३४ (३)

अनादी विद्या दूर होता क्षणी। योगी होय धनी आनंदाचा।।
प्रपंचरहित परम आनंद। त्याचा घे आस्वाद अंतर्यामी।।
निर्मल त्या निजस्वरूपात लीन। तेथे कसे भान संसाराचे?।।
कोठे ब्रह्मा विष्णु? रुद्र सूर्य कोण?। आत्मतेजासम नाही कोणी।।
ब्रह्मादी देवांची सुखे बिंदुवत्। क्षुद्र ती भासत त्याला सर्व।।
ज्यात अंशमात्र फक्त आहे सुख। विषयाचे सुख इच्छी लोक।।
शेष म्हणे मग शुद्ध चिदानंद। कोण तो सुबुद्ध अपेक्षीना?।।

## ८४. क्रियानिष्पत्तिस्थल

३३५ (१)

शिवयोगी झाला पूर्ण परकाय। त्याचे कर्मकार्य भासमान।।



अंधारात दोरी सर्पाकार भासे। पण साप नसे कधीच ती।।
कर्म करिताना दिसे जरी डोळा। तरी कर्मफळा आतळेना।।
वस्त्रांचा तो ढीग जळूनिया गेला। दिसे रचिलेला तसाच तो।।
तसा कर्माचार योग्याचा नुसता। दिसण्यापुरता उरलेला।।
धान्यबीज आधी अग्नीत भाजले। मग ते पेरले उगवेना।।
शेष म्हणे तसे त्याचे कर्म सारे। जन्माचे न ठरे कारण ते।।

३३६ (२)

जलाशयी चंद्रबिंब पडलेले। शतखंड झाले दिसे जरी।।
तरी तो विकार चंद्राठायी नाही। तसा योग्या नाही कर्मलेप।।
कर्मे ती घडती देहाच्या कडून। त्यात अभिमान गुंतेचिना।।
चंद्र नभी चाले भासे मेघांमुळे। चंद्र नच हाले भ्रमे मेघ।।
तसे देहसंबंधाने आरोपिले। कर्तृत्व सगळे आत्म्यावरी।।
आत्मा तो चालेना कर्मेही करीना। चेष्टा करी नाना देहचि तो।।
जीभ आस्वादिते तेल आणि घृत। पण कधी त्यात लिंपेचिना।।
शेष म्हणे आत्मा तसाच अलिप्त। वसतो देहात अकर्ता तो।।

३३७ (३)

कर्म केल्याविण जगी कोण राहे?। जो जो देह वाहे करी कर्म।।
चालणे बसणे उठणे झोपणे। कर्म हे टाळणे शक्य कोणा?।।
कर्मचक्र असे अखंड भ्रमते। शक्ती नसेच ते थांबवाया।।
पण कर्म करी देह, हे जो जाणे। यातून सुटणे शक्य त्याला।।
कर्म करणे हा शरीराचा धर्म। असे ज्याला वर्म सापडले।।
मग करी कर्मे फलापेक्षेविण। देई झुगारून कर्मबंध।।
शेष म्हणे ज्याच्या मनी नांदे शिव। कर्मफलभय नाही त्याला।।

## ८५. भावनिष्पत्तिस्थल

३३८ (१)

मनोवृत्तीमध्ये एक। शिव भरला व्यापक।।
वृत्तीस त्या भाव नाव। दिले ज्ञानियांनी सर्व।।
वृत्ती सर्व सांसारिक। त्यात भाववृत्ती एक।।
तिची चंचलता गळे। शिवाठायीच ती रुळे।।
मग भावनिष्पत्ति हे। नाव स्थितीस त्या आहे।।
भाव पक्व तो होऊन। योग्याठायी भासमान।।
दिसे, जशी शिंपेवर। चांदी भासे क्षणभर।।
भावनिष्पत्तिवान। तेणे त्यास मिळे नाम।।
शेष म्हणे योगियाने। भाव शिवात ठेवणे।।

३३९ (२)

शिवयोगी जरी पूर्ण ज्ञानी झाला। शिवभावनेला त्यागू नये।।
उल्लंघाया घोर संसारसागर। तीच होय थोर साहाय्यक।।
प्रकटतो जेव्हा काष्ठामध्ये अग्नी। काष्ठे ती जाळूनि स्वत: मिटे।।
तसा शिवभाव जन्मदु:ख नाशे। नंतर प्रवेशे शिवाठायी।।
निर्भाव योग्याचे हरे देहभान। विदेही होऊन भ्रमे सदा।।
मग दिशा हेच तयाचे अंबर। वस्त्रे देहावर असो नसो।।
भूक लागे पोटी शिते वेची उष्टी। पण नाही कष्टी त्याच्यामुळे।।
मुखे बोलेचना, कधी बोले शब्द। लोका असंबद्ध वाटती ते।।
विदेही योग्याचे भाषाव्याकरण। शहाणा तो कोण सुधारेल?।।
शेष म्हणे लागे ब्रह्मानंदी टाळी। देहाला सांभाळी तेथे कोण?।।



३४० (३)

काळ लोटता बहुत। साध्य पूर्ण होता प्राप्त।।
मग साधनाचे काही। प्रयोजन उरेनाही।।
होता शिवानंद प्राप्त। शिवभावाचे किंचित्।।
मग काय प्रयोजन। होय शिवात विलीन।।
होई संयमी चकित। स्वस्वरूपी प्रकाशित।।
भावाविण नव्हे ज्ञान। भाव नाही ज्ञानाविण।।
दोन्ही मुक्तीस कारण। शेष म्हणे घ्या जाणून।।

## ८६. ज्ञाननिष्पत्तिस्थल

३४१ (१)

ज्ञान्याने जाणावा असा प्रपंचात। कोणता पदार्थ असेचिना।।
जसे स्वप्नातील पदार्थाचे ज्ञान। जागृतीत पूर्ण नाश पावे।।
तसे व्यवहारज्ञान त्याचे सर्व। पावते विलय स्वप्नासम।।
जेथे मुळातच ज्ञेय नाही पुढे। तर त्याचे घडे ज्ञान कसे?।।
योग्याला मुळात प्रपंच न दिसे। होईलच कसे ज्ञान त्याचे?।।
स्वरूपज्ञानात व्यवहारज्ञान। जहाले विलीन त्याचे सर्व।।
शेष म्हणे तेणे ज्ञाननिष्पत्तिमान्। त्याला अभिधान दिले आहे।।

३४२ (२)

महानंदरूप परमशिवात। ज्याचे झाले चित्त लीन पूर्ण।।
त्याने जाणावे ते असे जगी काही। उरलेचि नाही निस्संशय।।

ज्याच्या दृष्टीपुढे उभा शिव शिव। तो न घेई नाव प्रपंचाचे।।
अखंड आनंदरूप शिव सत्य। त्याहून भिन्न मिथ्य, जाणे असे।।
शिव अनुस्यूत घटादी वस्तूंत। मिथ्या ती समस्त नामरूपे।।
विश्व उद्‌भवले शिवशक्तीतून। म्हणूनि ते पूर्ण ब्रह्मरूप।।
शेष म्हणे ज्ञेयज्ञाताव्यवहार। स्पर्शेना अंतर त्याचे कधी।।

## ८७. पिंडाकाशस्थल

३४३ (१)

मानवी शरीर हाच 'पिंड' आहे। त्यात वसताहे आकाश ते।।
अखंड आकाश पिंडात राहून। जाई न भंगून, एक असे।।
तसा सर्व देही आत्मा विद्यमान। एकच तो पूर्ण अखंडित।।
असाच विवेक असे योग्याठायी। ते हे स्थल पाही पिंडाकाश।।
घटात मठात आकाश राहते। परि न भंगते कधीच ते।।
तसा शरीरस्थ आत्मा दिसे भिन्न। त्याचे एकपण मोडेचना।।
त्याचे शुद्ध मने ध्यान करी त्यास। नाव पिंडाकाश शेष म्हणे।।

३४४ (२)

भिंती आणि खांब छत्तीस तत्त्वांचे। ज्यात हृदयाचे पद्मासन।।
ज्ञानदीपाने जे उजळून गेले। शरीर ते झाले शिवालय।।
प्रकाशरूपाने तेथे वसे शिव। त्याचा अनुभव गुरुकृपे।।
जेथे राहे देव तेथे दृढ भाव। त्यास लोक सर्व वंदिती ते।।
तसा शिवयोगियाचा वंदनीय। आणि पूजनीय ठरे देह।।
जीवदेहातील हृदयगुहेत। ज्ञानरूपे स्थित परशिव।।
शेष म्हणे ज्याला प्राप्त गुरुबोध। तयाला सन्निध शिव आहे।।



३४५ (३)

शिवयोग्याचे शरीर। सप्तधातूंचे नगर।।
शिव वसे तया स्थानी। शिवाची ती राजधानी।।
सूक्ष्माकाश मनोहर। हृदयच अंत:पुर।।
जसे जलात नितळ। बिंबे आकाश निर्मल।।
तसा सच्चिद्रूप विभु। तेथे प्रकाशतो शंभू।।
शिव उपाधिविहीन। सर्व शरीरी राहून।।
सर्वकाळ प्रकाशतो। शेष म्हणे भजावा तो।।

## ८८. बिंद्वाकाशस्थल

३४६ (१)

सृष्टिआधी विश्व असे सामावून। तत्त्वाला त्या नाम 'बिंदू' आहे।।
'बिंदू'नामे शिव 'नाद'नामे शक्ती। त्यांची 'कला'कृती विश्व असे।।
नाना रूपरंगे सुंदर नटले। असंख्य फुलले जीव ज्यात।।
विराट अद्‌भुत असे चराचर। याच्या मोहे संसारयात्रा घडे।।
शिवशक्तीची ही कलाकृती आभा। तिच्या रूपे उभा शिव पुढे।।
येथे आकाशाचे उपमान दिले। सूक्ष्म विवरिले शिवतत्त्व।।
म्हणून स्थलास नाव बिंद्वाकाश। शिव चिदाकाश शेष म्हणे।।

३४७ (२)

प्राणवायुरूपे सर्व जीवाठायी। प्राण एक राही व्यापूनिया।।
तसा सर्व जीवांहृदयी प्रकाशे। अहंरूपे वसे एक आत्मा।।
अग्नी एक असे मुळात अव्यक्त। तोच होय व्यक्त भिन्न रूपी।।

कधी विद्युल्लता कधी तो स्फुल्लिंग। होऊनिया जग जीव जाळी।।
तसा एक आत्मा सर्वही जीवांत। व्यक्त नि अव्यक्त रूपे वसे।।
प्रतिबिंब पडे शुद्ध दर्पणात। निर्मल चित्तात आत्मबिंब।।
एक सूर्य सर्व विश्व उजळतो। सर्वत्र राहतो आत्मा तसा।।
शेष म्हणे बिंदुस्वरूप शिवाने। जग पूर्णपणे व्यापिलेले।।

## ८९. महाकाशस्थल

३४८ (१)

पिंडाठायीचे आकाश। असे तेच महाकाश।।
भासे जरी भिन्न भिन्न। पण मुळात अभिन्न।।
नाही योग्याचे चैतन्य। भिन्न परमात्म्याहून।।
याची जाणीव तरल। हेच महाकाशस्थल।।
घट किंवा मठातले। नसे आकाश वेगळे।।
पिंड असो की ब्रह्मांड। आत्मा एक तो अखंड।।
शेष म्हणे अंतरात। दृढ व्हावे शिवाद्वैत।।

३४९ (२)

नये दाविता प्रमाणा। अगोचर वाणी-मना।।
सर्वतोमुखयुक्त। सर्व कालांच्या अतीत।।
सृष्टि-लयापलीकडे। कला-दृष्टीस न पडे।।
पराकाशरूप पूर्ण। सूर्यादींचे जन्मस्थान।।
आहे अनुभवगम्य। शिव नामे परब्रह्म।।
तोच आहे महालिंग। त्याच्याविण नाही जग।।
शेष म्हणे ब्रह्म पूर्ण। विश्वाचे ते अधिष्ठान।।



३५० (३)

अव्यक्त नि पराकाशरूप लिंगी। पावे शिवयोगी ऐक्य त्यात।।
ज्योतिर्मय ज्ञानरूप लिंगाप्रती। योगी संबोधिती ज्योतिर्लिंग।।
आत्मरूपज्ञाने निर्भेळ आनंद। लाभे निर्विवाद अतुल्य तो।।
परमानंदरूप आत्मचैतन्यास। ऋषी महाकाश संबोधिती।।
लाटा नि तरंग समुद्रापासून। नसतीच भिन्न कधीकाळी।।
वृक्षाहून भिन्न शाखा-पर्ण-फुले। नसती हे कळे सर्वांनाच।।
तसे जग झाले परशिवातून। त्याच्याहून भिन्न नाहीच ते।।
आकाशी असंख्य नक्षत्रे तेवती। तशी ब्रह्मांडे ती पराकाशी।।
जगज्जालरूपी चित्ररेखनास। भिंत महाकाश शेष म्हणे।।

## ९०. क्रियाप्रकाशस्थल

३५१ (१)

शिव परिपूर्ण ज्ञानाकाशरूप। मीही शिवरूप सत्य आहे।।
असे निरंतर करितो चिंतन। क्रियाप्रकाशवान् म्हणविला।।
क्रियेत ज्या मन स्थिरावे अधिक। तीच अत्यधिक महत्त्वाची।।
सर्वकाळ ध्याई परशिवरूप। तीच ज्ञानरूप मनोवृत्ती।।
वृत्तीच चिद्रूप होता मग चिंता। निरोधाची वृथा कशास ती?।।
ज्याच्या चित्ती दृढ प्रपंचच वसे। बाहेरही दिसे तोच मग।।
होता वृत्ती पूर्ण परब्रह्ममय। विश्व शिवमय शेष म्हणे।।

३५२ (२)

निष्कलंक निराकार तेज:पुंज। शिवात सहज विलीन जी।।

शिवयोग्याची जी ध्यानक्रियाशक्ती। शिवासमान ती तेजोरूप।।
ज्ञानवैराग्यादी गुणांनी मंडित। माया-गुणातीत शिवयोगी।।
परम शिवाचे षडैश्वर्य गुण। अंगात बाणून लाभे सिद्धी।।
बाहेरी पाहता दिसतो तटस्थ। उचंबळे आत शिवानंदे।।
गंधर्वनगरी जशी भासमान। तशा क्रिया जाण होती त्याच्या।।
शेष म्हणे क्रियाप्रकाशवान तो। अंतरी रमतो आत्मसुखे।।

## ९१. भावप्रकाशस्थल

३५३ (१)

लाटा-समुद्र अभिन्न। तसे भावना-चैतन्य।।
भावेविण कर्म नाही। आणि ज्ञानप्राप्ती तीही।।
परिपक्व होता फळ। उठे गंधाचा दर्वळ।।
शिवभाव पक्व होता। राहे प्रकाशत चित्ता।।
वृत्ती होणे शिवमय। तिला शिवभाव नाव।।
शिवरूप हा प्रपंच। मीही शिवरूप साच।।
असा दृढभाव मनी। मुक्त भवदोषांतूनी।।
शेष म्हणे त्याचे नेत्र। शिव पाहती सर्वत्र।।

३५४ (२)

शिवभाव स्थिर ज्याच्या मनोमनी। विषयांपासूनि अलिप्त तो।।
अंतरी उत्पन्न होती जे जे भाव। ते ते झाले सर्व शिवमय।।
मळविले तरी आकाश मळेना। आणिक रंगेना रंगानेही।।
तसा शिवयोगी प्रपंचव्यापारी। काही झाले तरी गुंतेचिना।।



अज्ञानशृंखला झाल्या पूर्ण ध्वस्त। इंद्रिये आसक्त शिवाठायी।।
पाहे ऐके चाखे स्पर्शे जे जे काही। सर्व असे पाही शिवचि ते।।
विश्व शिवरूप पाहूनि तो डोले। रागद्वेष झाले शिवात्मक।।
शेष म्हणे सूर्या ग्रासेना काळोख। अज्ञान न देख आत्म्याठायी।।

## ९२. ज्ञानप्रकाशस्थल

३५५ (१)

होईना लिंगांगज्ञान वाच्यार्थाने। मग लक्ष्यार्थाने जाणावे ते।।
सहज समजे वाच्यार्थ तो असे। जाणावा सायासे लक्ष्यार्थ तो।।
दोन घटांमध्ये आकाश संचले। दृष्टीस वेगळे दिसे पूर्ण।।
पण घटांतील आकाश ते एक। करावा विवेक लागे असा।।
आकाश फाटले भंगलेही नाही। घटांत ते राही एकत्वाने।।
तसा सर्व देहस्थ जीवांमध्ये आत्मा। त्याहून विश्वात्मा भिन्न नाही।।
असे सामरस्यज्ञान होता पूर्ण। त्याला नाव ज्ञानप्रकाश हे।।
शेष म्हणे असे जो विवेकी पुरुष। त्याच्या प्रत्ययास येई सारे।।

३५६ (२)

शिवयोग्या लक्ष्यार्थाचे ज्ञान झाले। म्हणूनि उरले नाही ज्ञेय।।
उपाधिज्ञानाने भेदभाव दूर। करिता येणार नाही कधी।।
दोन घटांतील आकाशाला एक। करणे अशक्य प्रयासाने।।
घटोपाधी दूर विवेके सारिता। एकत्व तत्त्वता दिसे मग।।
शिवजीवाठायी असे एकपण। घेतसे जाणून शिवयोगी।।
अंग लिंग भिन्न मानणे हे द्वैत। विवेके अद्वैत दिसे तेथे।।
शेष म्हणे त्यागूनिया द्वैतभान। शिवाद्वैत पूर्ण जाणावे हो।।

३५७ (३)

शिव नाही भेदज्ञानाचा विषय। चिदानंदमय सद्रूप तो।।
जीवशिवाठायी ऐक्यानुसंधान। करणे हे ज्ञान खरे आहे।।
अखंड आनंदरूप जगन्मय। त्रैलोक्य विलय ज्यात पावे।।
तेच ब्रह्म, त्याचे ज्ञान ब्रह्मज्ञान। होता विश्व पूर्ण ब्रह्मरूप।।
शिवाद्वैतज्ञान मोक्षाचे कारण। असा भाव पूर्ण योगियाचा।।
अन्य पाहेनाच शिवाव्यतिरिक्त। भेदभ्रांतिरहित प्रकाशतो।।
शेष म्हणे शिवयोग्याप्रती कदा। भवदु:खबाधा होणे नाही।।

**लिंगस्थलांतर्गत शरणस्थल संपूर्ण**



# लिंगस्थलांतर्गत ऐक्यस्थल

## ९३. स्वीकृतप्रसादैक्यस्थल

३५८ (१)

आत्मज्ञानप्राप्तीस्तव। शिष्य धरी गुरुपाय।।
त्याला बोधिती ब्रह्मैक्य। 'तत्त्वमसि' महावाक्य।।
'तत् त्वम् असि' हे जाण। शिव तूचि परिपूर्ण।।
सर्वज्ञ नि सर्वकर्ता। शिव ब्रह्मांडाचा भर्ता।।
अल्पकर्ता नि अल्पज्ञ। जीव, जाणती हे सुज्ञ।।
शिव मायाशक्तियुक्त। जीव अविद्येने व्याप्त।।
दोहोंमध्ये तो अभेद। कसा होईलच सिद्ध?।।
शेष म्हणे गुरू पूर्ण। करी शंकासमाधान।।

३५९ (२)

शिवासवे राहे शुद्ध मायाशक्ती। जीवाच्या भोवती अधोमाया।।
शिवजीवामध्ये असून अभेद। दिसे तेथे भेद मायेमुळे।।
नेत्रांवरी आले मायेचे पडळ। सारिता निर्मळ होय दृष्टी।।
बाह्यरूपी भेद दिसे, हा मुख्यार्थ। सारूनि लक्ष्यार्थ पाहावा लागे।।
बाहेरी पाहाता घट वेगळाले। आकाश संचले आत एक।।
तसे भिन्न देह, प्राणी, जड सृष्टी। जरी दिसे दृष्टीप्रती भिन्न।।
त्यामध्ये चैतन्यतत्त्व मात्र एक। करणे विवेक लक्ष्यार्थ हा।।
मुख्यार्थ-लक्ष्यार्थ विरूनि जाणीव। अनुभवा शिव एक येतो।।

शिवजीवैक्याचा ज्ञानप्रसाद हा। स्वीकारितो पाहा शिवयोगी।।
म्हणून स्वीकृतप्रसादैक्यस्थल। असे हे निर्मल शेष म्हणे।।

३६० (३)

द्वैतभूत झडपूनि जीवझाड। भेदबुद्धि बंड माजविते।।
हा वेगळा अन् तोही वेगळाच। डोळा दिसेनाच एकपण।।
भेदाचा उडवी प्रचंड धुरोळा। करिते आंधळा जीवात्म्याला।।
मग गुरुरूपे येऊनि मांत्रिक। अद्वैतबोधक मंत्र टाकी।।
शिष्यमनातील द्वैतभाव-भूत। घालवूनि मुक्त करी त्याला।।
शेष म्हणे गुरुबोधाने केवळ। निरसे प्रबळ भेदबुद्धी।।

३६१ (४)

प्रमेय प्रमाता आणिक प्रमाण। त्रिपुटीने ज्ञान प्राप्त होय।।
शिव हा 'प्रमेय' जीव हा 'प्रमाता'। शब्दादी तत्त्वता 'प्रमाणे' ती।।
पूर्ण ज्ञान होता सरूनि त्रिपुटी। उरते शेवटी शिवरूप।।
चिच्छक्तीने चाले त्रिपुटीव्यापार। तिचा साक्षात्कार झाल्यावरी।।
स्वरूपचिंतनी योगी होतो मग्न। पंचपाशबंधन तुटे मग।।
शेष म्हणे गुरुकृपेने पडळ। भेदाचे समूळ नाश पावे।।

३६२ (५)

अग्नीमध्ये काष्ठे अग्निरूप जसे। शिवमय तसे जग सर्व।।
मृत्तिकेची भांडी असती मृण्मय। तशी शिवमय पंचभूते।।
अखंड चिद्रूप हृदयकमलात। असे प्रकाशित महालिंग।।
त्यात करी लय चिंतन छत्तीस। तत्त्वांचे, न त्यास बाधक ती।।



अंतर्मुख चित्ते आत्मचिदाग्नीत। विषय पदार्थ होमितो तो।।
मग ते स्वीकारी प्रसाद म्हणून। त्यांचा किंचित् न लेप लागे।।
शेष म्हणे स्थल असा करी बोध। चित्ताने सावध जाणावा तो।।

## ९४. शिष्टोदनस्थल

३६३ (१)

भोजनानंतर ताटात जे अन्न। त्याला शिष्टोदन नाव असे।।
उरले ते 'शिष्ट' अन्न ते 'ओदन'। असा अर्थ जाण शब्दांचा या।।
शिवज्ञान झाल्यावरी मागे उरे। अधोमाया ती विरे चिल्लिंगात।।
स्वीकृतप्रसादी योगियालागून। शिष्टोदनासम असे माया।।
म्हणून मायेला शिष्टोदन नावे। स्थलात या आहे संबोधिले।।
शेष म्हणे येथे मायेचे वर्णन। तेणे शिष्टोदनस्थल आहे।।

३६४ (२)

मायेचे दर्शन स्पष्ट जीवा घडे। पाहाया न पडे त्रास काही।।
चर्मचक्षूंपुढे जे जे काही दिसे। ते ते सर्व असे मायारूप।।
शिवा दडवून तीच येते पुढे। सौंदर्याने वेडे करी जीवा।।
ढगाआड चंद्र तसा शिव मागे। माया लगबगे पुढे नाचे।।
तिला सारूनिया शिवास पाहणे। साधना करणे भाग पडे।।
आपुले मायावी रूपरंग दावी। जीवास भोगवी नाना भोग।।
घडवी चौऱ्यांशी योनी-महायात्रा। चालेनाच मात्रा तिच्यावरी।।
शेष म्हणे योगी उच्छिष्टासमान। तिला दे टाकून पूर्णत:।।

३६५ (३)

कलेपासूनिया पृथ्वीपर्यंत ती। तीस तत्त्वे होती मायापाश।।
मायापाशांनी हे विश्व बांधलेले। ज्ञानाने ते झाले स्वात्मरूप।।
परि त्या विश्वाचे माया जी कारण। उरलेली जाण अवशिष्ट।।
जीवन्मुक्तापुढे दासी होऊनिया। उभी राहे माया किंकरत्वे।।
विश्वसंमोहिनी सामर्थ्यशालिनी। जीवांस मोहिनी घालिते ती।।
ती न उभी राहे शिवयोग्यापुढे। मोहक रूपडे घेऊनिया।।
शेष म्हणे योगी शिवानंदी लीन। त्यांच्यापुढे दीन माया आहे।।

३६६ (४)

ज्योतिर्लिंगात चिद्रूप। जहाला जो एकरूप।।
तो जे भोगितो विषय। होती आत्म्यात ते लय।।
नामरूप हरवून। नदी सागरी विलीन।।
तसे विषय भोगिले। आत्म्याठायी ते विराले।।
किरणे आवरी सगळी। सूर्य डुबे अस्ताचली।।
तसे विषय भोगून। राहे शांत तो होऊन।।
शेष म्हणे शिवयोगी। स्वरूपाने सर्व भोगी।।

## ९५. चराचरलयस्थल

३६७ (१)

चराचर प्रपंचाचा लय होई। शिवयोग्याठायी शिवैक्य जो।।
विदेही तो चराचरविनाशक। नावे जाई देख संबोधिला।।
शिवाने निर्मिली चराचरसृष्टी। उपभोगासाठी जीवात्म्याच्या।।
जीवत्वाचा त्याग करण्याची वेळ। येताच अटळ लय तिचा।।



भोजनाने तृप्त झाल्यावरी पुन्हा। भोजनाची स्पृहा कशासाठी?।।
भोग नाही तेथे भोगाचे साधन। नसेच कारण राखण्याचे।।
शेष म्हणे आत्मज्ञाने तृप्त झाला। सृष्टीचे तयाला काम नाही।।

३६८ (२)

योगियाची वृत्ती अंतरात स्थिर। धावेना बाहेर कदापि ती।।
म्हणूनिया त्याच्यापुरते साचार। पावे चराचर लय जाणा।।
बाह्य प्रपंचाचा जीवा त्रास नाही। अंतरी जी राही वासना ती।।
वासनाप्रपंच ठरतो दु:खद। भ्रमवी विविध जन्मांत तो।।
नौकेच्या बाहेर जरी राहे जळ। ठरेना ते काळ प्रवाशांचा।।
नौकेत शिरता प्राणाला घातक। प्रपंचाची देख तशी कथा।।
शेष म्हणे मनी प्रपंच शिरता। मग जन्मव्यथा भोगणेच।।

३६९ (३)

जगताच्या प्रत्ययाचे जे कारण। माया नाशे पूर्ण अनादी ती।।
तिचा नाश होता तिचे कार्य जग। प्रत्ययास सांग येई कसे?।।
मेघ आकाशात होऊनि उत्पन्न। तेथेच विलीन होती पुन्हा।।
शब्दादी विषय तसे योगिमनी। उत्पन्न होऊनि लया जाती।।
स्वप्नीचा पदार्थ जागृतीत नसे। तसे ज्ञाने नाशे प्रपंचभान।।
जागृती स्वप्न नि सुषुप्ती लंघिल्या। योगी पोहोचला तुरीयेत।।
त्रिपुटीमय त्या प्रपंचापल्याड। जाता दृष्टिआड होई जग।।
स्तुतिध्यानातीत तुर्यातीतपदी। डोले आत्मानंदी शेष म्हणे।।

३७० (४)

स्वात्मरूपी झाला शिवसाक्षात्कार। त्याला नाही पर ब्रह्मांडात।।
आत्मरूपाहून भिन्न रूप शब्द। असा काही भेद जाणेचिना।।

मलरूपी शक्ती क्षय झाल्यामुळे। पाहतीना डोळे मायारूप।।
विश्व शिवाहून नसे कदा भिन्न। भासे परिच्छिन्न मायेमुळे।।
योगिया दिसती सर्व स्वात्मरूपे। सकलही लोपे चराचर।।
शेष म्हणे योगी चराचरलय। साधूनि चिन्मय जहाला तो।।

## ९६. भांडस्थल

३७१ (१)

अनंत ब्रह्मांडे जन्मती। राहाती नि लया जाती।।
त्यास आधार जी शक्ती। तिला 'भांड' संबोधिती।।
'भांड म्हणजेच भांडे। ज्यात वसती ब्रह्मांडे।।
राहे शिवासवे नित्य। शक्ती 'विमर्श' ती सत्य।।
करी विश्व प्रकाशित। भूतांसी ती साक्षिभूत।।
शिवकला ती साचार। तिचा ब्रह्मांडा आधार।।
शेष म्हणे तिचे ज्ञान। हेच 'भांडस्थल' जाण।।

३७२ (२)

शिवासवे राहे तीच 'कला' शक्ती। जीवासंगे 'भक्ती' शक्ती राहे।।
साधनेने जीव 'भक्ती' या शक्तीला। विकासितो 'कला' शक्तीमध्ये।।
'भक्ती' होता परिवर्तित 'कले'त। मग होई भक्त शिवरूप।।
विमर्शकलेस नाव महामाया। आणि शुद्धमाया, कुंडलिनी।।
तिच्यामुळे सर्व जग प्रकाशते। तादात्म्ये राहते शिवासवे।।
शिव आणि शक्ती जरी नामभेद। नांदतो अभेद पूर्णपणे।।
चंद्र आणि प्रभा, पुष्प आणि गंध। तसाच संबंध दोहोंमध्ये।।



शेष म्हणे डोळे दोन, दृष्टी एक। शिवशक्तिऐक्य तसे आहे।।

३७३ (३)

शिवात विमर्शशक्तिसंबंधाने। पराहंता बाणे, तिच्यामुळे।।
होय तो सर्वज्ञ सर्वकर्ता सर्व-। व्यापी आणि सर्वसाक्षी पूर्ण।।
विश्वाधार, महाज्ञानाने प्रकाशे। पराहंता असे तिला नाव।।
ठेवी शिवयोगी मायापाशमुक्त। विमर्शभांड्यात सर्व तत्त्वे।।
शेष म्हणे अंतर्मुख पूर्ण होतो। स्वस्वरूपात तो स्थिर सदा।।

## ९७. भाजनस्थल

३७४ (१)

ब्रह्मांडाच्या सृष्टिस्थितिविलयास। कारण विमर्शशक्ती आहे।।
ती ज्या शिवब्रह्मी होई प्रकाशित। 'भाजन' त्याप्रत नाव असे।।
वैचित्र्यपूर्ण ह्या विश्वाची निर्मिती। करी पराशक्ती शिवाधारे।।
ती ज्या शिवाठायी प्रतिष्ठित पूर्ण। तो 'विश्वभाजन' असे शिव।।
मूलाहंकाराचे रूप घेई शक्ती। झाली विश्वोत्पत्ती ज्याच्यामुळे।।
अहंकाररूपे स्थित ती ज्याठायी। तोच शिव पाही परबिंदू।।
त्याला परब्रह्म, महालिंग नावे। तत्त्व ते जाणावे शेष म्हणे।।

३७५ (२)

चंद्राठायी स्थिर राहते चांदणे। विश्व पूर्णपणे प्रकाशिते।।
तादात्म्याने शक्ती शिवाठायी राहे। विश्व प्रकाशे हे एकांशाने।।
'अ'कार हा शिव 'ह'कार ही शक्ती। असे सांगे श्रुती आगमही।।
शिवशक्तिमय असे परब्रह्म। वसते अहम् या पदामध्ये।।

शिवशक्त्यात्मक देशकालातीत। पराहंता प्राप्त केली ज्याने।।
योगी तो जहाला पूर्ण ब्रह्मरूप। प्रकाशे जगद्रूप होऊनिया।।
वृक्षजन्माआधी फुलेपर्णादी ती। बीजात असती सूक्ष्मरूपे।।
शेष म्हणे तसे योग्याच्या हृदयी। अहंरूपे राही चराचर।।

□

## ९८. अंगालेपस्थल

३७६ (१)

देशकालाची मर्यादा। शिवयोग्यास न कदा।।
चिदानंदमय रूपे। सदोदित तो प्रकाशे।।
असूनि तो देहरूप। कर्मापासून अलेप।।
'अंग अलेप' म्हणून। त्याला साजे अभिधान।।
उरे जोवरी प्रारब्ध। देही तोवरी तो बद्ध।।
पडे पद्मपत्रावर। थेंब ओघळे सत्वर।।
तसा शरीरव्यापार। त्याचे स्पर्शेना अंतर।।
अंगा लागू नेदी लेप। शेष म्हणे अंगालेप।।

३७७ (२)

शरीराकडून कर्म काही घडे। आतली न मोडे अलिप्तता।।
ब्रह्मांडामधील सर्व पदार्थांत। असे अवस्थित आत्मरूपे।।
भूत वर्तमान आणि भविष्यात। त्याचेच अस्तित्व भरलेले।।
दशदिशांकडे सदैव सन्मुख। विश्वतोमुख असा आहे।।
दिक्कालवस्तुदेशादी कुंपणे। तयास बंधने घालिती ना।।
अस्तित्व प्रकाश आनंद लक्षणे। यांनी पूर्णपणे मंडित तो।।



शेष म्हणे नाही कोणताही लेप। असे तो निर्लेप शिवयोगी।।

३७८ (३)

मेघ-धुराचा न आकाशाला स्पर्श। तशी कर्मे त्यास स्पर्शतीना।।
त्याला न विहित निषिद्ध ते कर्म। नाही विकल्प न वासनाही।।
घटमठादिक उपाधींच्या मुळे। आकाश भासले भिन्न जरी।।
तरी ते एकच, तशा देहोपाधी। ब्रह्मत्वाला कधी भंगतीना।।
जरी प्रपंचात दिसे गढलेला। तरी तो वेगळा कर्मांतून।।
तोच सर्व वस्तुरूपात भरला। भेद न उरला शेष म्हणे।।

□

## ९९. स्वपराज्ञस्थल

३७९ (१)

परब्रह्मात जो समरस झाला। भिन्न तो कोणाला समजेल?।।
स्वत: असो किंवा अन्य जीव कोणी। भिन्न शिवाहूनि मानीना तो।।
'मीच शिव आहे' अशी जी जाणीव। तेथे भेदभाव उरे थोडा।।
पण जेथे 'स्व' नि 'पर' न उरले। तेथे सर्व झाले शून्य भेद।।
कापूर विरतो वायूमध्ये जसा। जीव शिव तसा भेद गळे।।
जेथे जीव नाही आणि नाही शिव। स्व पर हे भाव तेथे कसे?।।
स्व आणिक पर भावांस तो अज्ञ। तेणे स्व-पराज्ञस्थल आहे।।
शेष म्हणे असे स्व-पर-अज्ञ तो। संपूर्ण नाशतो भेद तेथे।।

३८० (२)

तेथे बंध नाही आणिक मोक्षही। देवत्वाचा नाही अभिमान।।
सुखदु:ख नाही नाही ज्ञानाज्ञान। श्रेष्ठ आणि हीन नाही तेथे।।

मागे नाही पुढे दूर न समीप। सर्व एकरूप झाले तेथ।।
चिद्रूप शाश्वत आणिक सद्रूप। परब्रह्मरूप सर्वश्रेष्ठ।।
त्यात लीन त्याला थट्टेपुरताही। उरेना भावही आप पर।।
शेष म्हणे त्यास स्व-पर हे ज्ञान। नसे, झाला पूर्ण भेदमुक्त।।

## १००. भावाभावलयस्थल

३८१ (१)

मी-तूभाव जेथे पडतो गळून। केवळ ते शून्य उरे तेथे।।
शून्याचे ह्या संपादन करायास। करिती सायास साधनेचा।।
'शून्य' याचा अर्थ येथे 'परिपूर्ण'। 'अभाव' अमान्य अर्थ आहे।।
विश्वा अंतर्बाह्य उरे जे व्यापून। तेच येथे 'शून्य' परब्रह्म।।
'शरीरच आत्मा आहे' असा भाव। त्यास दिले नाव 'भाव' असे।।
'शरीर हा आत्मा नव्हे' ही जाणीव। तिलाच 'अभाव' संबोधिले।।
भाव नि अभाव उरती न जेथे। ते हे स्थल येथे शेष म्हणे।।

३८२ (२)

झाले मी-तूभाव शून्य। योगी चिदाकाशी मग्न।।
त्याला नाही भावाभाव। झाले निरर्थक सर्व।।
सुखदु:खातही नाही। त्याला भावाभाव काही।।
ज्याच्या अंतरी चित्ज्योत। झाली पूर्ण प्रकाशित।।
सद्रूप वा असद्रूप। त्याला दिसेनाच रूप।।
लिंगी पूर्ण ऐक्य झाला। भावाभाव विसरला।।
शेष म्हणे भावाभाव-। लयस्थल सार्थ नाव।।



## १०१. ज्ञानशून्यस्थल

३८३ (१)

द्वैतामुळे होय प्रपंचव्यापार। तसा व्यवहार ज्ञानाचाही।।
स्व आणिक पर उपस्थित जेथे। ज्ञान संभवते तेथे फक्त।।
'माझ्या स्वरूपाचे मज आहे ज्ञान'। म्हणे त्याचे ज्ञान सापेक्ष ते।।
स्वत:ला तो मानी अन्याहून भिन्न। तेथे वस्तू दोन मी तू अशा।।
जेथे भाव तेथे असतो अभाव। सिद्ध न अभाव भावाविण।।
'विश्व मी पाहिले' असे जो बोलला। मानिले विश्वाला भिन्न त्याने।।
ज्याच्यापुढे ब्रह्माविण वस्तू अन्य। नाही, त्याचे ज्ञान शून्य झाले।।
शेष म्हणे हेचि ज्ञानशून्यस्थल। जाणावे सकल विवेकाने।।

३८४ (२)

वेगळा मी आणि तूही तो वेगळा। असा न उरला भेद जेथे।।
'शिव तो आणि जीव मी' हे ज्ञान। उरले न कणभर तेथे।।
एका ज्योतीमध्ये मिळे दुजी ज्योत। तेथे कसे द्वैत उरले ते?।।
शिवात मी समरसलो हे ज्ञान। याची नाही जाण ते हे स्थल।।
जेथे ज्ञान गेले ज्ञेयात बुडून। तेच ज्ञानशून्यस्थल जाणा।।
शिवाठायी समरस होती जीव। गेले त्याचे नाव पुसूनि ते।।
अज्ञानाचे झाले आधीच खंडन। खंडले संपूर्ण ज्ञान आता।।
शेष म्हणे योगी हानिवृद्धीविण। ऐक्य तो समानरूपे होतो।।

३८५ (३)

घटाकाश आणि मठाकाश भिन्न। भासती परि न वेगळे ते।।
तशी जीव आणि परशिवाठायी। संभवत नाही भेदशंका।।

ज्ञेय ज्ञाता दोन वस्तू जेथे स्थिर। ज्ञानव्यवहार घडे तेथे।।
जेथे नाही ज्ञेय आणि नाही ज्ञाता। कशी ज्ञानसत्ता चाले तेथे?।।
शिवयोग्याठायी नसेच त्रिपुटी। विराले शेवटी ज्ञान तेणे।।
निर्विकार निराकार नि निस्सीम। असे नभासम ब्रह्म तेथे।।
शेष म्हणे योगी ब्रह्मरूप झाला। ज्ञानाचा सरला विषय तो।।

३८६ (४)

पृथ्वी आदी भूते, ग्रह नि तारका। देव मनुष्य का पशुपक्षी।।
अशा वस्तू नाही परब्रह्माठायी। मग ज्ञान होई कशामुळे?।।
मी-तूपणाचेच जेथे नाही नाव। तेथे भेदगाव दिसेल का?।।
सच्चिद्रूप ब्रह्म पूर्ण व्यापिलेले। तेथे न उरले दुजे काही।।
ज्ञेय ज्ञाता नाही तेणे ज्ञान शून्य। नाही इच्छादी गुण शून्य तेणे।।
आदि-मध्य-अंती सर्वत्र ते शून्य। दिशा-कालशून्य शून्यचि ते।।
ज्ञेय ज्ञान नाही प्रपंचाचे भान। म्हणूनि ते ज्ञान शून्य सर्व।।
जेथे एकरूप ज्ञेय-ज्ञाता-ज्ञान। तेथे ज्ञान शून्य शेष म्हणे।।

३८७ (५)

सच्चिदानंद नि अद्वितीय ब्रह्म। होऊनि शून्यासम प्रकाशते।।
नाही ज्ञान-इच्छा, संकल्परहित। धर्मादी पुरुषार्थ नाही जेथे।।
ज्याच्या पलीकडे नाही काही दुजे। असे तत्त्व ते जे निरुत्तर।।
चिद्रूप स्वप्रकाश अशा ज्योतिर्लिंगी। झाला शिवयोगी समरस।।
त्याला स्वस्वरूपज्ञानाविण अन्य। पदार्थाचे ज्ञान होणे नाही।।
त्याला कार्य नसे नाही ते कारण। नसे शेष काही, न शेषिभाव।।
करण्याजोगे ते त्याने सर्व केले। सर्व ते जाणले जाणण्याजोगे।।
त्याच्या पुढे मागे काही न उरले। लिंगांगैक्य झाले त्याला प्राप्त।।
जहाला कृतार्थ झाला परमुक्त। शिव तो अव्यक्त शेष म्हणे।।



३८८ (६)

समरसे पूर्ण 'लिंगा'मध्ये 'अंग'। जहाला अभंग शिवरूप।।
जन्ममरणाचे सरले गाऱ्हाणे। त्यास येणे जाणे नाही आता।।
प्राप्त करायास हेचि ऐक्यस्थल। लंघिली सकळ जन्मांतरे।।
पिंडस्थलातून ज्ञानशून्यस्थली। येण्यासाठी केली तपश्चर्या।।
गुरु-शिवकृपाप्रसाद लाभला। जन्मचि जहाला कृतार्थ हा।।
उमले सहज कमलाचे दल। तसे षट्स्थल प्रकाशले।।
शेष म्हणे त्याने मृत्यूच जिंकिला। जन्म ठरविला अखेरचा।

**लिंगस्थलांतर्गत ऐक्यस्थल संपूर्ण**

# उपसंहार

## शास्त्रप्रचाराचा आदेश

३८९

उपदेशिले जे रहस्य शिवाने। पूर्वी गूढपणे पार्वतीला।।
शिवानंदाचे जे करी प्रकाशन। स्वस्वरूपज्ञान बोधिते जे।।
तेचि शिवशास्त्र रेणुकाचार्यांनी। तन्मय होऊनि विवरिले।।
कर जोडूनिया ऐकती अगस्त्य। भाविती मनात कृतार्थता।।
सरता बोलणे जगद्‌गुरू मौन। झाले ध्यानमग्न सहजचि।।
कधी खळाळत धावे कधी संथ। लीन सागरात होई गंगा।।
तेथे पूर्ण शांत होऊनि ती राहे। रेणुकांशी लाहे शांती तशी।।
शेष म्हणे कर जोडूनि अगस्त्य। बोलती प्रशांत मृदू स्वरे।।

३९०

'गणश्रेष्ठा शिवयोगाचे रहस्य। जाणले विशेष आपणचि।।
केवळ दृष्टिक्षेपानेच पूर्ण। गळते बंधन संसाराचे।।
स्वच्छंदाचारात सर्वदा आनंदी। मन शिवानंदी डुंबलेले।।
तुमच्या मुखाने वीरशैवशास्त्र। जहालो पवित्र ऐकूनिया।।
मन पूर्ण धाले भ्रम पूर्ण गेला। सफल जहाला जन्म माझा।।
ऋषिकुळामध्ये ठरलो मी श्रेष्ठ। झाले पाश नष्ट सर्व माझे।।
माझे तपोफळ जणू पक्व झाले। कृतकृत्य केले गुरुदेवे'।।
शेष म्हणे ऋषिवचन ऐकिले। नेत्र उघडिले रेणुकांनी।।

३९१

म्हणती 'अगस्त्या ऋषिगणी श्रेष्ठ। तुझेच वरिष्ठ तपोबळ।।



गूढ शिवशास्त्र कराया श्रवण। अधिकारी कोण तुझ्याविना?।।
शिवानुग्रहास तूच पात्र एक। निरूपिले देख शास्त्र तेणे।।
जेथे श्रवणाची असते आवड। तेथे होते गोड कथनही।।
तूही प्रश्नजल शिंपत राहिला। तेणे बहरला शास्त्रतरू।।
प्राप्त करायास पूर्ण शिवज्ञान। याविण साधन नाही दुजे।।
भोग मोक्ष जना मिळावा यासाठी। करी परमेष्ठी उपदेश'।।
शेष म्हणे बोल रेणुकाचे गोड। धरूनि आवड ऐकती ते।।

३९२

'निगमागमांचे सारसर्वस्व ते। शास्त्रात पुरते साठले ह्या।।
ज्ञान क्रिया यांचे करी निरूपण। प्रकाशते पूर्ण शिवाद्वैत।।
वाराया जनांचे संसार-अरिष्ट। शास्त्र हे प्रकट करी लोकी।।
अधिकारी असा शिष्य निवडावा। त्यालाच करावा उपदेश।।
मूलतत्त्वाचीच ज्याला नसे जाण। तयाला हे ज्ञान देऊ नये।।
ज्याच्या मनी वसे जिज्ञासा निर्मळ। त्यालाच केवळ बोधावे हे।।
शिवाज्ञेने आलो यासाठी भूलोकी। प्रवर्ताया लोकी शिवाचार।।
ज्ञानाचा प्रवाह वाहावा अखंड। यासाठी निवड तुझी केली।।
शिवज्ञानबोधे उजळी त्रिखंड। तुजला उदंड आशीर्वाद'।।
शेष म्हणे असे रेणुक बोलून। क्षणी अंतर्धान पावले ते।।

## त्रिकोटिलिंगस्थापना

३९३

स्वेच्छे आचरण, शरीरधारण। आकाशगमन सिद्धिप्राप्त।।
रेणुकाचार्य ते झाले अंतर्धान। पर्वतावरून क्षणमात्रे।।
जेथे बिभीषण राज्य करी श्रेष्ठ। जहाले प्रविष्ट लंकेत त्या।।

'आले आले' अशी फुटताच हाक। धाविन्नले लोक दर्शनाला।।
भस्मविभूषित कर्पूराची कांती। कंठी झळकती रुद्रमाळा।।
मुखी विलसते सूर्यासम तेज। भाळावर साज त्रिपुंड्राचा।।
नेत्रांतून वाहे करुणेची गंगा। लोक-अंतरंगा भिजवीत।।
शेष म्हणे अशा स्वरूपासमोर। समग्र नगर नम्र झाले।।

३९४

आला बिभीषण लंकेचा नरेश। वंदी चरणांस भक्तिभावे।।
प्रार्थूनिया त्यांना राजगृही नेले। प्रेमे बैसविले सिंहासनी।।
यथासांग गण रेणुका पूजिले। आदरे सेविले पादोदक।।
दुसऱ्या आसनी विनयपूर्वक। बसूनि हस्तक जोडी दोन्ही।।
म्हणे 'गणेश्वरा, तुमच्या रूपाने। शंकराचे येणे झाले येथे।।
दर्शनाच्या साठी पुण्य शतकोटी। लागते ते गाठी होते माझ्या।।
तुझ्या पदस्पर्शे लंकेचा ह्या डंका। गाजे लोकी शंका नाही यात।।
झाली लंका तशी झाला वंश धन्य। आज पूर्वपुण्य फळा आले'।।
शेष म्हणे असा पुनःपुन्हा बोले। आपणचि डोले आनंदात।।

३९५

हसून बोलती जगद्गुरू मंद। 'जहाला आनंद स्वागताने।।
धर्मज्ञा तू धर्माचरणात रत। असशी विख्यात जाणतो मी।।
सुदृढ प्रशांत भक्ती प्रेममयी। तुझिया हृदयी स्थिर आहे।।
राक्षसेश्वरा तू शास्त्रांचा समस्त। पूर्ण रहस्यार्थ जाणतोस।।
प्रजाकल्याणात सदैव तू मग्न। आणि अग्रगण्य अध्यात्मात।।
षट्स्थलशास्त्र अगस्त्या बोधून। निघालो लक्षून कैलासाला।।



तुझिया कीर्तीचे वाटले नवल। वळले पाऊल लंकेकडे।।
मनातील इच्छा तुझी पुरवीन। माग वरदान आम्हाला तू।।
इच्छिशील तू जे असेल मंगल। सांग मनातील गुज तुझे'।।
शेष म्हणे बिभीषणे हे ऐकून। दो कर जोडून बोले तेव्हा।।

३९६

'गणेश्वरा लंका आगमन हाच। अनुग्रह साच आम्हावरी।।
पण माझी एक चरणी प्रार्थना। आली जर मना पुरवावी।।
लंकेश रावण माझा ज्येष्ठ भ्राता। सर्व शिवभक्तांमध्ये श्रेष्ठ।।
अतुल प्रतापी शत्रुबाधामुक्त। देव पराभूत केले त्याने।।
पण कालवशे मळले चारित्र्य। हरिली पवित्र सीता सती।।
दुर्भाग्याने रणी रामाने वधिला। विकल पडला भूमीवरी'।।
शेष म्हणे जगद्गुरूंच्या समोर। मोकळे अंतर केले त्याने।।

३९७

'राक्षसवंशात एक मी जिवंत। पाहूनि दुःखित स्वरे बोले।।
म्हणे बिभीषणा अज्ञाने मी ग्रस्त। थोरांशी बहुत द्रोह केला।।
विधीने लिहिले तसेचि घडले। नाही ओलांडिले दैव कुणी।।
लंकेत स्थापावी लिंगे नऊ कोटी। संकल्प शेवटी गेला नाही।।
सहा कोटी लिंगे स्वहस्ते स्थापिली। त्रिकोटी उरली स्थापायाची।।
माझा मृत्यू आता अटळचि आहे। काळ नुरलाहे माझ्या हाती।।
बिभीषणा कर संकल्प हा पूर्ण। भ्रात्यास वचन दिले तेव्हा।।
परि अद्यापही संकल्प अपूर्ण। प्रयत्न करून यश नाही।।
शब्द देऊनही मीच असमर्थ। सलते ही खंत मनामध्ये।।

गुरुदेवा आचार्य होऊनि आपण। संकल्प हा पूर्ण करवावा'।।
शेष म्हणे बिभीषणाची विनंती। क्षणी मानिली ती रेणुकांनी।।

३९८

बिभीषण झाला अतीव आनंदी। पुन:पुन्हा वंदी पद त्यांचे।।
मग शुभ तिथी मुहूर्त पाहून। सिद्धता संपूर्ण केली त्याने।।
लिंगस्थापनेला रेणुक आचार्य। होऊनिया कार्य सिद्धी नेले।।
लंकेमध्ये एकावेळी तीन कोटी। स्थापिली गोमटी शिवलिंगे।।
अशक्य जे बिभीषणास वाटले। सहजचि झाले कार्य सिद्ध।।
लंकानगरीची प्रजाही विस्मित। जहाली कृतार्थ पाहूनिया।।
बिभीषणा कृपाशीर्वाद दिधले। रेणुक पावले अंतर्धान।।
शेष म्हणे अत्यद्‌भुत महिमान। दर्शनाने जन धन्य झाले।।

३९९

शिवाद्वैतभावे सहज संचार। झाला महीवर रेणुकांचा।।
सप्तशत वर्षे राहिले प्रकट। आणि अप्रकट तेवढेच।।
कृपाकटाक्षाने चिंब केले जन। दाविला कल्याणमार्ग त्यांना।।
शिवाद्वैतज्ञान सर्वत्र प्रेरिले। जन उद्धरिले कितीतरी।।
त्रिमलनाशक सहवासे भक्त। केले कृतकृत्य अगणित।।
पाखंडी नास्तिक शास्त्रांस खंडिले। सिद्धांच्या जिंकिले समूहाला।।
वीरशैवशास्त्र स्थापिले सर्वत्र। जागली पवित्र शिवभक्ती।।
शेष म्हणे कार्य करूनि ते धाले। कोल्लिपाकी आले लीन व्हाया।।

## सोमेश्वरलिंगात ऐक्य

४००

जगद्‌गुरू आले ऐकताच जन। धावती चरण वंदावया।।



कंठात अर्पिल्या दिव्य पुष्पमाळा। धन्य झाले डोळा पाहूनिया।।
हीच लिंगातून प्रकटली मूर्ती। अशी कर्णी कीर्ती ऐकिलेली।।
जरी शतकांचे पडले अंतर। कथा निरंतर स्मृतिशेष।।
आले सोमनाथमंदिरात सर्व। समुदायासह जगद्‌गुरू।।
सोमनाथापुढे टेकूनि मस्तक। म्हणती 'बालक तुझे आहे।।
तुझ्यातून प्रकटलो कधीकाळी। त्रिलोकी प्रेरिली शिवभक्ती।।
आता लीन व्हाया आलो येथे नाथा। देवा सोमनाथा कृपाघना'।।
शेष म्हणे तेथे पाहती कौतुक। जमलेले लोक सभोवती।।

४०१

म्हणती 'देवाधिदेवा जगन्नाथा। तूच बा निर्माता ब्रह्मांडाचा।।
तूचि रे कारण स्थितिलयाप्रती। तुलाच सेविती ब्रह्माविष्णू।।
संसारनाटकभ्रांती तूच नाथा। दवडिशी भक्ताह्रदयीची।।
वेदागम गाती तुझेच वैभव। नाही महादेव तुझ्यासम।।
भवरोगवैद्य सर्वज्ञ स्वतंत्र। तूच रे पवित्र चिदाकाश।।
जगदाधार तू ज्योतिर्लिंगरूपे। नाना लीलारूपे तुझी नाथा।।
गुणातीत मलत्रयविनाशक। तीन वेद देख नेत्र तुझे।।
रक्षी मज, तवाज्ञेने महीवर। केला मी संचार आजवरी।।
आलो तुझ्याठायी व्हावयास लीन। देई मज स्थान त्वरे आता'।।
शेष म्हणे अशी केली विनवणी। दाटलेला मनी आर्तभाव।।

४०२

'घे घे मला सामावून। तुझ्या स्वरूपात पूर्ण।।
देई देवा अवकाश। करी रूपी समरस'।।
अशी रेणुकप्रार्थना। ऐके तोषे शिवराणा।।

होता प्रार्थना संपूर्ण। गेले मंदिर गर्जून।।
सोमेश्वरलिंगातून। स्वर आला निनादून।।
‘येरे येरे माझ्या बाळा। महानुभावा रे स्नेहाळा।।
तुझी भक्ती न्याहाळून। झालो अतीव प्रसन्न’।।
गर्जू लागल्या नभात। देवदुंदुभी क्षणात।।
झाली शिवगणदाटी। केली सुमनांची वृष्टी।।
अवघा कल्लोळच झाला। देह तेजामध्ये न्हाला।।
लागता न एक क्षण। झाले लिंगात विलीन।।
जसा वायूतच विरे। कापराचे नाव नुरे।।
शेष म्हणे तसे झाले। लिंगी रेणुक विराले।।

४०३

भक्तजन होते स्तुतिस्तोत्रे गात। घडले अद्भुत त्यांच्यापुढे।।
पाहाता पाहाता रेणुकाचा देह। झाला शून्यमय क्षणार्धात।।
कधी ऐकिले न पाहिले अद्भुत। जहाले विस्मित तेणे सर्व।।
तेव्हापासूनि ती शिवभक्ती श्रेष्ठ। ठरे सर्वोत्कृष्ट प्रमाणाने।।
वेदागमांनी जे प्रतिपादिलेले। सर्व ते बिंबले ग्रंथात या।।
एकोत्तरशत स्थलांनी हा युक्त। करी प्रकाशित षट्स्थले।।
असे चिंतामणी रत्न हे अमोल। दाविते सकल ज्ञाननिधी।।
उमलवी शिवज्ञानाचे पंकज। असा ग्रंथराज सूर्य जणू।।
सिद्धान्तांत सर्वश्रेष्ठ हा सिद्धान्त। म्हणूनि ‘सिद्धान्तशिखामणी’।।
ग्रंथ लिही किंवा घेई लिहवून। करवी श्रवण वा करी स्वत:।।
त्याला लाभे भुक्ती आणि तशी मुक्ती। देई हा सद्गती शेष म्हणे।।



## समारोप

४०४

जहाले अभंगलेखन संपूर्ण। धन्यच जीवन झाले माझे।।
काशीमहास्वामीजींनी आज्ञापिले। लेखन घेतले करवूनी।।
केला पारायणग्रंथ ओवीबद्ध। तोच आता सिद्ध अभंगांत।।
धन्याचा हा माल आणला वाहून। तेवढाच क्षण माझा आहे।।
माल वाहायास निवडिले मला। गौरवच झाला जणू माझा।।
बांधिले गाठीस हेच समाधान। सर्व कर्तेपण त्यांच्याकडे।।
खपूनि बांधिती गृह कारागीर। त्यांच्या नावे घर थोडे होते?।।
शेष म्हणे तशी माझी मन:स्थिती। निमित्त निर्मितीपुरतेच।।

४०५

काशीज्ञानपीठामध्ये हे संपूर्ण। अभंगलेखन सिद्ध झाले।।
काशीपीठावरी होऊनिया गेले। सर्वही वंदिले जगद्गुरू।।
पाळिले पोषिले आणि आज्ञापिले। हृदयी पाउले त्यांची माझ्या।।
ज्ञानसूर्य चंद्रशेखरांच्या पायी। ठेविली मी डोई भक्तिभावे।।
ग्रंथपाठकांचा अखेरचा जन्म। ठरावाच, पण माझा नको।।
पुन्हा गर्भवास हवा याचसाठी। घडावी कामाठी लेखनाची।।
शिखरी जाण्यात नाही समाधान। पायरीचा मान माझ्याकडे।।
शेषाने गुंफिली अभंगांची माळ। गुरुकृपाबळ त्याच्यापाठी।।
शेष म्हणे सेवा गोड ही मानावी। जगद्गुरुपायी समर्पिली।।

**श्रीसिद्धान्तशिखामणी अभंगगाथा संपूर्ण**

# परिशिष्ट

## पारिभाषिक संज्ञा

| | | |
|---|---|---|
| **त्रिविध शक्ती** | : | इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती |
| **त्रिविध दीक्षा** | : | वेधादीक्षा, क्रियादीक्षा, मांत्रीदीक्षा |
| **त्रिमल** | : | आणवमल, मायामल, कार्मिकमल |
| **भस्मनिर्मितीप्रक्रिया** | : | कल्प, अनुकल्प, उपकल्प, अकल्प |
| **शिवाची पंचमुखे** | : | सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष, ईशान |
| **पंचाचार्य** | : | रेवणाराध्य, मरुळाराध्य, एकोरामाराध्य, पंडिताराध्य, विश्वाराध्य |
| **पंचपीठे** | : | रंभापुरी, उज्जयिनी, केदार, श्रीशैल, काशी |
| **पंचाचार** | : | लिंगाचार, सदाचार, शिवाचार, गणाचार, भृत्याचार |
| **पंचसूतके** | : | जननसूतक, मरणसूतक, रज:सूतक, उच्छिष्टसूतक, जातिसूतक |
| **पंचक्लेश** | : | अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेश |
| **षट्स्थल** | : | भक्तस्थल, माहेश्वरस्थल, प्रसादिस्थल, प्राणलिंगिस्थल, शरणस्थल, ऐक्यस्थल |
| **षड्विध भक्ती** | : | श्रद्धाभक्ती, निष्ठाभक्ती, अवधानभक्ती, अनुभवभक्ती, आनंदभक्ती, समरसभक्ती |
| **षट्कला** | : | निवृत्ती, प्रतिष्ठा, विद्या, शांती, शांत्यतीत, शांत्यतीतोत्तरा |
| **सप्त स्नाने** | : | मांत्रस्नान, भौमस्नान, आग्नेयस्नान, वायव्यस्नान, दिव्यस्नान, वारुणस्नान, मानसस्नान |
| **अष्टावरण** | : | गुरू, लिंग, जंगम, भस्म, रुद्राक्ष, प्रसाद, पादोदक, मंत्र |



| | | |
|---|---|---|
| **अठ्ठावीस शिवागम** | : | १. कामिक, २. योगज, ३. चिन्त्य, ४. कारण, ५. अजित, ६. दीप्त, ७, सूक्ष्म, ८. सहस्र, ९. अंशुमान, १०. सुप्रभेद, ११. विजय, १२. निश्वास, १३. स्वायंभुव, १४. अनल, १५. वीर, १६. रौरव, १७. मकुट, १८. विमल, १९. चंद्रज्ञान, २०. बिम्ब, २१. प्रोद्‌गीत, २२. ललित, २३. सिद्ध, २४. संतान, २५. शर्वोक्त, २६. पारमेश्वर, २७. किरण, २८. वातुल. |

यांपैकी पहिले १० आगम शिवाने व पुढील १८ आगम रुद्राने उपदेशिलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **छत्तीस तत्त्वे** | : | १. शिव, २. शक्ती, ३. सदाशिव, ४. ईश्वर, ५. शुद्धविद्या (ही पाच शुद्ध तत्त्वे);<br>६. माया, ७. कला, ८. विद्या, ९. राग, १०. काल, ११. नियती, १२. पुरुष (ही सात शुद्धाशुद्ध तत्त्वे);<br>१३. प्रकृती, १४. महत्, १५. अहंकार, १६. मन, १७. श्रोत्र, १८. त्वक्, १९. चक्षू, २०. जिव्हा, २१. घ्राण, २२. वाक्, २३. पाणि, २४. पाद, २५. पायु, २६. उपस्थ, २७. शब्द, २८. स्पर्श, २९. रूप, ३०. रस, ३१. गंध, ३२. आकाश, ३३. वायू, ३४. अग्नी, ३५. जल, ३६. पृथ्वी (ही चोवीस अशुद्ध तत्त्वे). |

दृश्य व अदृश्य विश्व म्हणजे ३६ तत्त्वांचा समूह.

(अभंगगाथेतील विषय सुलभ व्हावा यासाठी येथे केवळ नोंदी केल्या आहेत. जिज्ञासू वाचकांनी 'श्रीसिद्धान्तशिखामणितत्त्वामृत' ग्रंथातून सविस्तर विवेचन पाहावे.)